नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ७३ * * नागपूर * | बुधवार, दिनांक ११ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## अपार्टमेंटच्या सातव्या मजल्यावर आग

### वडिलांसह दोन मुलांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
मंगळवारी सकाळी दिल्लीतील द्वारका सेक्टर-१३ येथील शब्द अपार्टमेंटच्या सातव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये आग लागली. एक वडील त्याच्या दोन मुलांसह फ्लॅटमध्ये अडकले. स्वतःला वाचवण्यासाठी, दोन्ही १० वर्षांच्या मुलांनी बाल्कनीतून उडी मारली. त्यांचे वडील यश यादव (३५) यांनीही त्यांच्यासोबत उडी मारली. तिघांनाही तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने कोणताही विलंब न करता बचाव कार्य सुरू केले. आगीचे कारण शोधले जात आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

### पक्षांची कथा की, राजकारणी व्यथा

सध्या महाराष्ट्रात महाबहुमत असलेले महायुती सरकार आसनस्थ आहे. त्या सरकार जवळ इतके प्रचंड बहुमत आहे की, त्या बहुमतामुळे सरकारला अजीर्ण होण्याची पाळी आलेली आहे. या तीन पक्षांच्या सरकार बरोबर एक चौथा पक्षही आहे. तो अपक्ष आमदारांचा आहे. काठावरचे बहुमत असले म्हणजे अपक्षांची चांदी असते. पण या ठिकाणी सगळे विरोधी पक्षच काठावर आहेत. सरकारमध्ये सामील असलेले दोन पक्ष हे मूळ पक्षातून निघालेले आहेत. सध्याच्या मूळ पक्षाचा ग्रास घेऊन ते सत्तासुख उपभोगत आहेत. यापैकी शिवसेना म्हणजे शिंदे सेना यांचे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतात. ती आज तरी चांगलीच फार्मात आहे. बाकी असलेली शिवसेना उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. उद्धवरावांना ही शिंदे यांची शिवसेना डोळ्यासमोर नकोशी आहे. मुंबई शहरात मराठी माणसांच्या हितासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी 1966 सालामध्ये आपल्या संघटनेचा पाया रचला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रगण्य नेते प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांनी आपल्या पुत्राच्या संघटनेचे नाव शिवसेना असे ठेवले. देशातील अनेक कौटुंबिक पक्ष सध्यातरी चार कुटुंबाकडे आहेत. त्यात तामिळनाडूचा द्रमुक असो, उत्तर प्रदेश मधील समाजवादी पक्ष असो किंवा बिहार मधील जनता दल असो. यासारखे कुटुंबप्रधान पक्ष त्या-त्या कुटुंबाच्या वारसदारांकडे वारसा हक्काने आलेले आहेत. आज महाराष्ट्रातील शिवसेना काय किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस काय, हे दोन्ही पक्ष मोठ्या बहुमताने बाहेर पडले. पण 'असुनी खास मालक घरचा' तो मात्र वळचणीवरच थांबला. आता कोणे एकेकाळी शिवसेनेचे भविष्य म्हणून ज्यांचे नाव घेतले जात होते. ते राज ठाकरे स्वर्गीय बाळासाहेब या भूतलावर असतानाच प्रचंड नाराज झाले. मग त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा पक्ष प्रसूत केला. या पक्षाने सुरुवातीला तेरा आमदार निवडून आणून चांगलाच दबदबा निर्माण केला होता. पण आता राजसाहेबांचा भाव आणि प्रभाव कायम असूनही निवडणुकीच्या रिंगणात त्यांना डाव काही साधता आलेला नाही. तिकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षात फूट पडल्यावर लोकसभेत मोठ्या साहेबांचा डंका वाजला. पण विधानसभेत त्याच पक्षाची लंका अगदी जळूनच गेली. आता त्याच पक्षांमध्ये बेरजेची भाषा केली जात आहे. ओरिजनल शिवसेनेला (बडे मनसे) मनसे आपल्याबरोबर हवा आहे. तिकडे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दोन्ही गटांना आता ऐक्य हवे आहे. या दोन्ही पक्षांच्या ऐक्यामध्ये सध्या ज्यांच्या हातात शिवसेना आहे. त्या एकनाथ शिंदे यांना दोन्ही पक्षांकडून फारशी विचारणा नाही, अशा वार्ता आहेत. अशा परिस्थितीत राजसाहेब आणि उद्धव साहेब यांचे मनोमिलन, युती किंवा एकत्रीकरण झाल्यावर भविष्य काळात काय काय होऊ शकते. याचे आडाखे व तडाखे सुरू आहेत. एकत्रीकरणवादी म्हणतात प्रचंड फरक पडेल. बाकीचे असे म्हणतात की, काहीच फरक पडणार नाही. आता या बाबतीतील खरेखोटे शिवसैनिक आणि मनसैनिकच जाणत असतील. तिकडे राष्ट्रवादी पक्षातील अध्यक्षपदाची खुर्ची ज्या जयंत पाटलांकडे आहे. त्यांनाही अध्यक्षपद रिकामे करावयाचे आहे. पण हे पद द्यावे कुणाकडे, याचा निर्णय होत नसल्यामुळे मोठ्या पवार साहेबांनी तीन महिने जयंतरावांना धीर धरण्यास सांगितलेले आहे. पण काही कार्यकर्ते इतके अधीर आहेत की, त्यामुळे त्यांनी पुरते बधीर होण्यापूर्वी काहीतरी चमत्कार होणे, सध्या गरजेचे वाटते. शिवसेनेचे बंधुद्वय आणि राष्ट्रवादी यांचे पक्षद्वय यांच्या बाबतीत सध्या घोळात घोळ चालू आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला. तर लोकसभा आणि विधानसभा यांच्यातील मित्रपक्ष आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मित्रपक्ष वेगवेगळे असतात. स्थानिक तडजोडी करून अनेक आघाड्या मोठमोठ्या पक्षांवर सहज विजय मिळवतात. असा आजवरचा आपला अनुभव आहे. महाराष्ट्र भाजपा मधील सर्वेसर्वा म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या बलाढ्य विजयामुळे आता त्या पक्षाकडून भरपूर अपेक्षा आहेत. येणाऱ्या निवडणुकीमध्ये या पक्षाची गत लोकसभेसारखी होऊ नये. म्हणून देवेंद्रजींना कंबर कसावी लागेल. ती त्यांनी कसली असेलच. त्यामुळे येत्या एक ते दीड महिन्यात महाराष्ट्रात किती आघाड्या व किती बिघाड्या आहेत किंवा होणार आहेत. याचे मनोरंजक किस्से धडाधड धडाधड बाहेर पडतील, यामध्ये तीळमात्र शंका नाही. अशावेळी भविष्याच्या पोटात आणि जनतेच्या गोटात जे काही शिजेल. त्याचे भक्षण करणे एवढेच आपल्या हाती आहे. बाकी अजून काय लिहावे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## राज्य अनुसूचित जाती आयोगास

# वैधानिक दर्जा!

### राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय : अधिवेशनात विधेयक सादर करणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याचा महत्त्वाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे अनुसूचित जाती आयोगाच्या कामकाजाला गती येणार असून आरक्षणाचे महत्त्वाचे प्रश्न सोडण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. राज्य मंत्रिमंडळाच्या या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, हे निर्णय राज्यातील सामाजिक न्याय, शिक्षण आणि महसूल व्यवस्थापन या तिन्ही क्षेत्रांवर परिणाम करणारे आहेत.

यामुळे राज्यातील मागासवर्गीय समाजाच्या हक्कांचे संरक्षण, वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत आणि राज्याच्या महसूलात वाढ साधण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत.



: राज्य मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय :

■ राज्यातील शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६,२५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १०,००० ची वाढ

■ राज्यात २००५ मध्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना
मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि नांदेड या पाच ठिकाणी शासकीय परिचर्या महाविद्यालयात बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरू आहे. या प्रत्येकी ठिकाणी ५० विद्यार्थी शिकतात. या विद्यार्थ्यांचा आंतरवासिता कालावधी सहा महिन्यांचा असतो. या विद्यार्थ्यांना दरमहा ८ हजार रुपये विद्यावेतन देण्यास मान्यता देण्यात आली.

■ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीने उपाय. विविध प्रकारच्या दरांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज घेण्यात आला, त्याअन्वये देशी आणि राज्यात तयार होणाऱ्या विदेशी मद्याच्या किमतीत वाढ होणार आहे.

## निवडणुकीनंतर नव्या नेतृत्वाला संधी

### शरद पवारांचे मोठे विधान


■ वृत्तसंस्था
पुणे, दि. १० :
पुण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापनदिन कार्यक्रम पार पडला. यावेळी अनेक प्रमुख नेत्यांनी भाषण करत शरद पवार यांच्याविषयी तसेच पक्षाच्या संघर्षाविषयी भाष्य केलं. त्यानंतर शरद पवारांनी पक्षातील नेतृत्व बदलावर देखील मोठे विधान केले आहे. निवडणुकीनंतर नव्या नेतृत्वाला संधी देणार असल्याचं शरद पवारांनी म्हटलं आहे.



शरद पवार म्हणाले, २६ वर्षांपूर्वी आपण एकत्र आलो आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापन करण्याचा निर्णय घेतला. जनतेचा प्रचंड मेळावा आणि पक्षाला उभारी आली. थोड्या दिवसातच महाराष्ट्राचा कारभार करण्यासाठी राष्ट्रवादीच्या सहकाऱ्यांना सामान्य जनतेने संधी दिली. लोकांची सेवा करायची संधी दिली. सामान्य माणसाला संधी दिली तर तोही कर्तृत्व दाखवू शकतो आणि राज्य चालवू शकतो. नावं घ्यायला अनेकांची नावं आहेत. जयंत पाटलांनी अर्थमंत्री म्हणून १० वर्षं काम केलं आहे.

ते म्हणाले, प्रमुख सहकाऱ्यांना सोबत घेऊन चर्चा करणार. राष्ट्रवादी पक्षाने सामान्य माणसाला संधी दिली आहे. निवडणुकीनंतर नव्या नेतृत्वाला संधी देणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. तसेच ५० टक्के महिलांना निवडून द्या, असे आवाहन देखील शरद पवारांनी केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकट्याने लढवायच्या की कशा, याचा विचार जिल्हा नेतृत्वाला सोबत घेऊन करू, विश्वास निर्माण करण्याच काम भगिनी सुद्धा करतात. आपल्याला ५० टक्के भगिनींना निवडून द्यायचे आहे. कर्तृत्वाचा वाटा पुरुषांचाच असतो यावर माझा विश्वास नाही. भगिनींना संधी मिळावी, असे ते म्हणाले.




## जयंत पाटलाकडून राजीनाम्याचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :
राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दोन्ही गटाचा वर्धापन दिनाचा कार्यक्रम मंगळवारी पुण्यात होत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यक्रमातून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा थेट राजीनामा देण्याचे संकेत दिले आहेत.



रोहित पवार यांच्या वक्तव्यानंतर जयंत पाटील यांनी शरद पवार यांना विनंती करत नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचे वक्तव्य केले. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला लवकरच नवीन प्रदेशाध्यक्ष मिळू शकतो, असे म्हटले जात आहे.

पुण्यात बोलताना रोहित पवार यांनी आपल्याकडे पक्षाचे कोणतेही पद नाही, अशी खंत व्यक्त केली. पक्षात काही खांदेपालट होणार का? असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, मी फक्त आमदार आहे. साधा कार्यकर्ता आहे.

दरम्यान, पवार साहेबांनी बरीच संधी दिली. सात वर्षांचा कालावधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी राजीनाम्याचे संकेत दिले.

## लोकसभा उपसभापती निवडणुकीची खरगेंची मोदींकडे मागणी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले आहे. यामध्ये त्यांनी लोकसभेच्या उपसभापती निवडीची प्रक्रिया सुरू करण्याची विनंती केली आहे.

स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच, हे पद सलग दोन लोकसभेसाठी रिक्त राहिले आहे. १७ व्या लोकसभेत एकही उपसभापती निवडला गेला नाही. ही चिंताजनक उदाहरणे सध्याच्या १८ व्या लोकसभेतही सुरू आहेत. हे भारताच्या लोकशाही राजकारणासाठी चांगले संकेत देत नाही आणि संविधानातील तरतुदींचे उल्लंघन करते, असे खरगेंनी म्हटले आहे.

## लोकलमधील गर्दी टाळण्यासाठी सरकारी कार्यालयांच्या वेळेत बदल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :
सोमवारी (९ जून) कसाराहून सीएसएमटीकडे जाणाऱ्या लोकलमधून पडून ४ प्रवाशांचा मृत्यू झाला. यानंतर आता लोकल प्रवासाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वाढलेल्या गर्दीमुळे अशी घटना घडल्याचे समोर आले आहे. अशातच आता वाढलेली गर्दी कमी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सरकारी कार्यालयांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले की, कालची घटना गंभीर आहे. मेट्रोचा विस्तार कमी असल्यामुळे लोकलमधील गर्दी जास्त आहे. लोकलला दरवाजे लावले तर व्हेंटीलेशनची व्यवस्था करावी लागेल हे सरकारला माहिती आहे. त्यामुळे भाडं न वाढवता एसी ट्रेन देण्याविषयी केंद्र सरकार विचार करत आहे.

पुढे बोलताना फडणवीसांनी सांगितले की, आगामी काळात कालसारखी घटना टाळण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करणार आहे. लोकलमधील गर्दी टाळण्यासाठी सरकारी कार्यालयांच्या वेळत बदल करण्यात आला आहे. मात्र खाजगी कार्यालयांमध्ये ते करणं थोडं कठीण आहे. कारण यामुळे कंपन्यांच्या नफा-तोट्यावर परिणाम होतो. मात्र आगामी काळात याबाबत निर्णय होऊ शकतो.

मुंब्रा लोकल अपघातात १३ जण जखमी झालेत. अपघातात जखमी असलेल्या चार रुग्णांवर कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार आहे.




आर्वी विधानसभा मतदार संघाचे तत्कालीन आमदार मा. श्री. दादारावजी केचे यांचे अथक प्रयत्नाने जिल्हा वार्षिक योजना (डी.पी.डी.सी.) सन २०२४-२५ अंतर्गत ५०५४, ३०५४ व तिर्थक्षेत्र विकास योजना आष्टी तालुक्यातील रस्ते, पुल, सभागृह या कामासाठी एकुण रू. ४ कोटी ५० लक्ष निधी मंजुर केलेल्या विकास कामाचे भुमीपुजन दिनांक ११ जुन २०२५ रोज बुधवारला मा. श्री. दादारावजी केचे आमदार विधान परीषद महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. श्री सुमितजी वानखडे, आमदार आर्वी विधानसभा क्षेत्र यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत सौ. सरिताताई वि. गाखरे माजी (जि.प.अध्यक्ष) वर्धा या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत खाली दर्शविलेल्या वेळेनुसार भुमीपुजन सोहळा संपन्न होईल.

तरी आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे हि विनंती.

| अ.क्र. | कामाचे नांव | किमत (कोटी रू.) | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | चिस्तुर येथे हनुमान मंदीर देवस्थान सभागृहाचे बांधकाम करणे. वा. आष्टी. | २० लक्ष | स.११.00 | चिस्तुर |
| २ | आनंदवाडी येचे विठ्ठल रूखमीनी देवस्थान सभागृहाचे बांधकाम करणे. ता. आष्टी. | २० लक्ष | स.११.३० | आनंदवाडी |
| ३ | खडकी येथे शंभुशेष बाबा सभागृहाचे बांधकाम करणे. ता. आष्टी | २० लक्ष | स.११.४५ | खडकी |
| ४ | परसोडा येथे सरस्वती महाराज देवस्थान सभागृहाचे बांधकाम करणे. ता. आष्टी. | २० लक्ष | दु.१२.00 | परसोडा |
| ५ | बेलोरा-अंबिकापूर प्रा.मा.४१ रस्ता बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.१२.३० | बेलोरा |
| ६ | जैतापूर पोचमार्ग प्रा.मा.१७ सरंक्षण भिंत बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.१२.४५ | जैतापूर |
| ७ | लहान आर्वी श्रीराम मंदीर ते पोरगव्हाण ग्रा.मा.४५ रस्ता बांधकाम करणे.ता. आष्टी | ३० लक्ष | दु.१.00 | लहान आर्वी श्रीराम मंदीर |
| ८ | सिंदीविहीरा पोचमार्ग ग्रा.मा.0३ सिमेंट रस्ता बांधकाम करणे. ता. आष्टी | २० लक्ष | दु.१.१५ | सिंदिविहीरा |
| ९ | मोई-मुबारकपूर ग्रा.मा.१८ आरसीडब्ल्यु पुलाचे बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.१.३० | मुबारकपूर |
| १० | आबाद किन्ही-मोई-सुसुंद्रा इजीमा ८५ रस्ता बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु १.४५ | मोई |
| ११ | जामगांव पोचमार्ग ग्रा.मा.१९ सिमेंट रस्ता बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.२.३० | जामगांव |
| १२ | माणिकवाडा-धाडी प्रा.मा.२१ रस्ता बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.३.00 | माणिकवाडा |
| १३ | माणिकवाडा-तायसावंगा इजिमा३ रस्ता डांबरीकरण करणे. ता. आष्टी | ६० लक्ष | दु.३.१५ | माणिकवाडा |
| १४ | माणिकवाडा-तायसावंगा इजिमा ३ रस्ता आरसीडब्ल्यु पुलाचे बांधकाम करणे. ता. आष्टी | ३० लक्ष | दु.३.३० | तारासावंगा |
| १५ | दुगवाडा-सालोरा-तारासावंगा इजिमा २ आरसीडब्ल्यु पुलाचे बांधकाम करणे ता. आष्टी | ३० लक्ष | दु.४.00 | दुगवाडा |
| १६ | साहुर लक्ष्मीनारायण देवस्थान सभागृहाचे बांधकाम करणे. ता. आष्टी | २० लक्ष | दु.४.३० | साहुर |

विनीत : भारतीय जनता पार्टी आष्टी तालुका



# आता खूप उशीर...



**मुंबई :** राज्यात सध्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीची चर्चा आहे. मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांकडून याबाबत संकेत देण्यात आले आहेत. काही राजकीय नेत्यांकडून ही युती महाराष्ट्राच्या फायद्याची ठरणार असल्याचे म्हटले जात आहे, तर काही नेत्यांनी यावर टीकाही केली आहे. अशातच आता शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या दीपाली सय्यद यांनीही ठाकरे बंधूंच्या युतीवर भाष्य केले आहे.

उद्धव आणि राज ठाकरेंच्या एकत्र येण्यावर दीपाली सय्यद यांनी म्हटले की, कुटुंबाच्या वादासाठी दोघे एकत्र येत असतील तर ही चांगली गोष्ट आहे. पण जर ते राजकारणासाठी एकत्र येत असतील तर ही जर आणि तर ची गोष्टी आहे.

भावा-भावांमध्ये जर भांडण असेल तर त्यांनी नक्कीच एकत्र यावं. पण जर राजकारणासाठी तुम्ही आता एकत्र येत आहेत तर तुम्ही स्वतःचा स्वार्थ पाहताय. तुम्ही स्वार्थासाठी एकत्र येतायेत. आता खूप उशीर झालेला आहे. युती खूप आधी व्हायला हवी होती. बाळासाहेबांच्या मनात पण ते होतं. पण तेव्हा तुम्ही युती केली नाही, असेही त्या म्हणाल्या. दीपाली सय्यद यांनी एकनाथ शिंदेंचे कौतुक करताना म्हटले की, बाळासाहेब ठाकरे गेल्यानंतर त्यांची पोकळी जर कोणी भरून काढली असेल तर ते आहेत एकनाथ शिंदे. नेता कसा असावा, जो रस्त्यावर उतरून गोरगरिबांचा विचार करणारा, त्यांच्या मनातले ऐकणारा आणि त्यांच्यासाठी काम करणारा नेता असला पाहिजे. हेच आम्हाला बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलं होतं.

दीपाली सय्यद यांनी उद्या शिवसेनेत मोठा पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती दिली आहे. हा पक्षप्रवेश महाराष्ट्राच्या हितासाठी असणार आहे. संजय राऊतांच्या जवळचे काही लोक पक्षप्रवेश करणार आहेत. याचा राज्याला फायदा होणार आहे अशी माहितीही सय्यद यांनी दिली आहे.

## शरद पवारांना मोठा धक्का सत्यजितसिंह पाटणकर भाजपात



**सातारा :** पाटण विधानसभा मतदारसंघातील शरद पवार गटाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. शरद पवार यांच्यासाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे.

पाटणकर यांच्या प्रवेशाच्या वेळी रवींद्र चव्हाण यांच्यासोबत खासदार उदयनराजे भोसले यांची देखील उपस्थिती होती.

सातारा जिल्ह्यातील पाटण विधानसभा मतदारसंघाचे एक महत्त्वाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर हे सुरवातीपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते म्हणून ओळखले जात होते. २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी अभिप्रेत तिकीट न मिळाल्याने अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला. पण विजयी होऊ शकले नाहीत.

स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा करत, सर्वांना विश्वासात घेऊन भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये सामील होणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त केली असून, त्यानुसार ते कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेऊन पुढे जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गुजराती कुटुंबाकडून मराठी भाषिकांना मारहाण

**मुंबई :** मुंबईच्या घाटकोपर या गुजराती समाजबहुल उपनगरात मराठी कुटुंबाला गुजराती कुटुंबाने मारहाण केल्याची घटना घडली.

घाटकोपरच्या रायगड चौक भागात मराठी भाषिक तसेच गुजराती समाजाची मोठी संख्या आहे. अनेक मराठी, गुजराती कुटुंबे एकमेकांच्या बाजूलाच राहतात. त्यात दोन कुटुंबात कुत्रा पाळण्यावरून जोरदार राडा झाला. गुजराती कुटुंब मराठी भाषिकांना घरात घुसून मारहाण केली. सुरुवातील एक व्यक्ती मराठी कुटुंबाच्या दारासमोर जाऊन वाद घालत होता. त्याच वेळी काही महिलाही त्याच्या बाजूने आल्या. गुजराती कुटुंब मराठी कुटुंबाच्या घरात घुसले. त्यानंतर मारहाण झाल्याचे बोलले जात आहे. कुणीही गुजराती कुटुंबाला रोखले नाही.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पात झोपडपट्टीवासीयांच्या संमतीची गरजच नाही...

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**



धारावी पुनर्विकास प्रकल्पाला सरकारी निर्णयांनी (जीआर) घालून दिलेल्या ठोस धोरणात्मक चौकटीचे आणि नियमांचे पाठबळ आहे. धारावीचा मास्टरप्लान २०१६ च्या विकास आराखड्यावर (डेव्हलपमेंट प्लॅन) आधारित आहे आणि मास्टरप्लॅन हा विकास आराखड्याशी सुसंगत आहे. त्यामुळे ह्यधारावी मास्टरप्लान टप्प्याटप्प्याने राबविला जाईल. अंमलबजावणी दरम्यान कोणतेही मोठे बदल प्रस्तावित केले गेले किंवा ज्या अशा नवीन बाबी ज्यांचा विकास आराखड्यात उल्लेख केला नाही किंवा विकास आराखड्याच्या विरुद्ध आहेत, तरच सूचना आणि हरकतींची प्रक्रिया आवश्यक ठरेल असे धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे (डीआरपी) मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) एसव्हीआर श्रीनिवास यांनी स्पष्ट केले आहे.

**बहुस्तरीय तळघर पार्किंग**

प्रत्येक धारावीकराला घर दिले जाईल त्यामुळे कुणालाही बेघर केले जाणार नाही. या प्रकल्पाचे उद्दिष्ट सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देणे हेच आहे. इतर सर्व आधुनिक गृहनिर्माण संस्थांप्रमाणे येथे बहुस्तरीय तळघर पार्किंग असेल. पोडियमच्या मजल्यांवर व्यवसाय आणि व्यावसायिक युनिट्स सामावून घेतल्या जातील.

लोक वरच्या मजल्यावर राहतील आणि खालच्या मजल्यावर त्यांचा व्यवसाय चालवू शकतील. म्हणून, आम्ही शक्य तितक्या प्रमाणात रहिवाशांची व्यावसायिक इको-सिस्टम टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे,ह्व असेही त्यांनी सांगितले आहे.

**माटुंगा रेल्वे जमिनीवर घरे**

माटुंगा रेल्वे जमिनीवर बांधकाम आधीच सुरू झाले आहे आणि रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी यांना योग्यरित्या सामावून घेतल्यानंतर तेथील इमारतीत धारावीकरांना सामावून घेतले जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

आम्हाला अपेक्षा आहे की पुढील दोन ते तीन वर्षांत या रेल्वे इमारती पूर्ण होतील. बरेच बांधकाम आणि विकास कामे ही समांतरपणे केली जातील. हा ब्राऊनेस्ट ऑफ ब्राऊनफिल्ड प्रकल्प आहे आणि येत्या काही महिन्यांत प्रकल्पाला अधिक गती मिळेल असेही या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# पैलवानाने सोडली ठाकरेंची साथ चंद्रहार पाटलांचा शिंदे गटात प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**



गेल्या अनेक दिवसांपासून सांगलीतील उद्धव ठाकरे गटाचे नेते चंद्रहार पाटील हे ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, अशी चर्चा रंगली होती. शेवटी आता चंद्रहार पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची साथ अधिकृतरित्या सोडली असून त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी त्यांनी मी पक्षवाढीसाठी काम करणार आहे, असे सांगितले.

पक्षप्रवेश झाल्यानंतर चंद्रहार पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधला. माझ्या पक्षप्रवेशासाठी ज्यांनी अट्टहासाने प्रयत्न केले. मी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली काम करावे, अशी राम रेपाळे, शरद कणसे काका यांची इच्छा होती. त्यांचे मी आभार मानतो, अशा भावना चंद्रहार पाटलांनी यावेळी पक्षप्रवेशावेळी व्यक्त केल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत चंद्रहार पाटील यांचा शिवसेनेत प्रवेश झाला. यावेळी इतरही बडे नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिंदेसेना प्रमुख एकनाथ शिंदे म्हणाले, सांगलीची माणसं चांगली असतात. चंद्रहार पाटील आज आपल्या पक्षात आले. मी तुमची अगोदरची जागा चुकली असं म्हणणार नाही. पण शेतकऱ्याच्या मुलाला पराभूत करण्यासाठी सर्वांनी एकजूट केली, असं तुम्ही सांगितलं. मीदेखील एक शेतकऱ्याचाच मुलगा आहे.

मी मुख्यमंत्री झाल्याचे अनेकांना पचनी पडलेलं नाही. सांगलीचा ढाण्या वाघ आता खऱ्या जंगलात आला आहे, वाघाचं कातडं पांघरून लांडगा वाघ होत नाही. ज्यांनी बाळासाहेबांचे विचार पायी तुडवले, त्यांना आता त्या कृतीची प्रचिती आली आहे. माझ्या पक्षात कोणीही नोकर नाही, मालक नाही. जो काम करेल तो पुढे जाईलत, असे सांगत त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना काम करत राहण्याचीही सूचना केली.

दरम्यान, २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेने चंद्रहार पाटील यांना सांगली या मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. या जागेसाठी काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना यांच्यात चांगलीच रस्सीखेच झाली होती.

शेवटपर्यंत दोन्ही पक्षांनी ही जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केला होता. शिवसेना माघार घेण्यास तयार नसल्याचे समजल्यानंतर शेवटी काँग्रेसने एक पाऊल मागे घेत ही जागा ठाकरेंना दिली होती. ही जागा जिंकण्यासाठी ठाकरेंनी चांगलीच ताकद लावली होती. मात्र चंद्रहार पाटलांना फक्त ५५ हजार मतं मिळाली होती.

# कुंभमेळा : पायाभूत सुविधांसाठी निधी द्या



## उपमुख्यमंत्री शिंदेंकडे मागणी

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १० :** नाशिक शहरात २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात आवश्यक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी राज्य शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

निवेदनात म्हटले की, महापालिकेने कुंभमेळ्याच्या तयारीसाठी पूल बांधणीच्या सहा मोठ्या प्रकल्पांसाठी निविदा प्रसिद्ध केल्या आहेत, ज्यांचे एकत्रित अंदाजित मूल्य ११८ कोटी आहे. महापालिकेने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या कामांसाठी काही आर्थिक तरतूद केली असली तरी या प्रकल्पांचा एकूण आवाका पाहता पालिकेच्या सध्याच्या आर्थिक क्षमतेपेक्षा तो खूप मोठा आहे.

कुंभमेळा प्रकल्पाला अद्याप शासनाची औपचारिक मंजुरी मिळालेली नाही. यामुळे निधीच्या उपलब्धतेबाबत अनिश्चितता निर्माण होते आणि प्रकल्पांच्या वेळेत पूर्ण होण्यावर परिणाम होऊ शकतो. त्यासाठी शासनाने पालिकेला पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे हगवणे बंधूंकडे शस्त्र परवाना

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**

वैष्णवी हगवणे हुंडाबळी मृत्यू प्रकरणातील आरोपी पती शशांक व दीर सुशील यांनी बनावट पुण्यातील रहिवासी असल्याची कागदपत्रे सादर करुन पुणे पोलिसांकडून बेकायदेशीर शस्त्र परवाना मिळवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

त्यांचा मित्र निलेश चव्हाण याने देखील आधीचा गुन्हा लपवून ठेऊन शस्त्र परवाना घेतल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी आरोपी विरुध्द गुन्हाही दाखल करण्यात आला. याप्रकरणात सुशील याचा ताबा कोथरूड पोलिसांनी घेतला असून त्याला आज न्यायालयात हजर केले जाणार आहे. तर शशांक हगवणे व निलेश चव्हाण यांचा देखील ताबा न्यायालयाचे आदेशानंतर वारजे पोलिस घेणार असल्याची माहिती पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली आहे.

वैष्णवी हगवणे हिचा पती शशांक आणि दीर सुशील हे पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यातल भुकूम गाव येथील रहिवासी वास्तव्यास आहेत. त्यांनी २०२२ मध्ये पुणे पोलिसांकडे शस्त्र परवाना मिळविण्यासाठी अर्ज केलेला होता. याप्रकरणात त्यांनी वारजे आणि कोथरूड परिसरात रहिवासी असल्याचा पोलीस ठाण्यात फ्लॅटचा भाडेकरार वास्तव्याचा पुरावा म्हणून पोलिसांकडे सादर केला होता. शशांक, सुशील आणि हगवणे कुटुंबीयांचा निकटवर्तीय व मित्र नीलेश चव्हाण यांनी एकाच वर्षी शस्त्र परवाने मिळवले होते. याप्रकरणाच्या तपासात दोघांनी शस्त्र परवान्यासाठी बनावट पत्ते दिल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे. केवळ दोन महिन्यापूर्वीचा फ्लॅट भाडेकरार देऊनही त्यांना शस्त्र परवाना कसा मिळाला असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# रुबीच्या तरुण डॉक्टरची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**

कामाच्या अतिताणामुळे रुबी रुग्णालयातील रेडिओलॉजिस्ट विभागात काम करणाऱ्या डॉ. श्याम व्होरा (२५, रा. भावनगर, गुजरात) याने गळफास घेऊन आत्महत्या केली. तो एमबीसीएस पदवी घेऊन एमडी करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दीड वर्षापूर्वी आला होता.

गेल्या दीड वर्षात सुट्टी मिळत नसल्याने त्याने रुबी रुग्णालयापासून जवळच असलेल्या ढोले पाटील चौकातील दामोदर भवन या वसतिगृहातील इमारतीमधील खोलीत आत्महत्या केली. त्याच्या कुटुंबीयांनी रुबी रुग्णालयातील रोडिओलॉजिस्ट विभागाचे प्रमुख डॉ. प्रणव महादेव यांच्यावर निशाणा साधत मुलाच्या आत्महत्येस ते कारणीभूत असल्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी डॉ. व्होरा याच्या कुटुंबीयांना माहिती दिल्यावर गुजरातमधील भावनगर येथून सकाळीच ते पुण्यात दाखल झाले. डॉ. व्होराचा मृतदेह शवागारात ठेवण्यात आला होता.

# माझ्या केसाला जरी धक्का लागला तर....

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**



लक्ष्मण हाकेंचा पुन्हा हल्लाबोल

ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर त्यांनी काही दिवसांपूर्वी टीका केली होती. अजित पवारांनी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याचा गंभीर आरोपही केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी तसेच आमदारांनी हाकेंवर पलटवार केला.आज देखील लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर निशाणा साधला.

माझ्या केसाला जरी धक्का लागला तर त्यास पवार कुटुंब, अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील, असा थेट इशाराच त्यांनी दिला आहे. लक्ष्मण हाके यांनी पोस्ट करत अजित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले, मला रोज महाराष्ट्रातून राष्ट्रवादीच्या पदाधिका?्यांचे धमक्या मिळू लागल्या असून मी गावगाड्यातील मेंढपाळाचा पोरगा आहे मी अशा धमक्यांना भीक घालत नाही. मात्र माज्या केसाला जरी धक्का लागला तरी त्यास पवार कुटुंबीय अजित पवार आणि रोहित पवार जबाबदार असतील.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, अजितदादा तुमच्या पिसाळलेल्या कुत्र्यांना आवर घाला. जर माज्या केसाला धक्का लागला तर तुम्हाला रस्त्यावर आणू. मी गोरगरीब ओबीसी समाजासाठी आणि त्यांच्या हक्क अधिकारांसाठी लढत असून अर्थ खात्याला गोचीडासारखा चिटकून बसलेला अजित पवार हा ओबीसी समाजाचा निधी देत नसल्याने माझा त्यांच्याशी वाद आहे, असे ते म्हणाले.

# डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १० :**

नामपूर-मालेगाव रस्त्यावरील अंबासन येथील निमधरा फाट्याजवळ डांबर वाहतूक करणाऱ्या डंपरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.

मालेगावहून डांबर घेऊन नामपूरच्या दिशेने भरधाव जाणारा डंपर वाहनाला ओव्हरटेक करीत असताना दुचाकीला कट लागल्याने दुचाकीस्वार अंकुश दीपक ठाकरे (२२) थेट चाकाखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. नातेवाइकांनी काही काळ रस्ता रोको आंदोलन केले.

# घोड्यांचे राजकारण

राजकीय क्षेत्रात जेव्हा जेव्हा विधानांची शर्यत असते तेव्हा कोणी ना कोणी नेता तोंडी घोडे दवढवतो. राजकारण हे पूर्वी वादविवाद, विचारसरणी आणि सेवेचे व्यासपीठ असायचे.

आता ते बदलत्या काळाचे शर्यत बनले आहे, जिथे प्रत्येक नेता स्वतःला घोड्यासारखे सर्वात वेगवान, बलवान आणि सर्वात सक्षम असल्याचे सिद्ध करण्याच्या शर्यतीत असतो. त्याने कार्यकर्त्याला ही घोडे म्हणायला सुरुवात केली आहे.

यावेळी एका काँग्रेस नेत्याची पाळी होती, ज्याने मध्य प्रदेशात संघटना विस्तारण्यासाठी आयोजित केलेल्या कामगार परिषदेत आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये घोड्यांच्या जाती शोधण्याबद्दल बोलताना घोड्यांची एक अद्भुत त्रिवेणी सादर केलीः एक लंगडा घोडा, एक शर्यतीचा घोडा आणि लग्नाचा घोडा.



**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**९४२२१२५६५६**

आता मला सांगा, जेव्हा एखादा नेता घोडा बोलतो तेव्हा घोडा देखील विचार करू लागतो.. भाऊ, मी कोणता?

त्यांच्या नेत्याचे म्हणणे ऐकून कार्यकर्ते कुजबुजू लागले आणि एकमेकांकडे पाहून ते अंदाज लावू लागले, मी कोणत्या प्रकारचा घोडा आहे आणि माझा शेजारी कोणत्या श्रेणीतील घोड्यात येतो.

कार्यकर्ता खबरीलाल विचार करू लागला, लंगडा घोडा - राजकारणातील असहाय्यतेचे प्रतीक. या श्रेणीत त्या सर्व नेत्यांचा समावेश आहे ज्यांना त्यांच्याच पक्षातील सदस्यांनी पोसले होते, परंतु ते मैदानात येताच त्यांनी गुडघे टेकले. ते पक्षाच्या पोस्टर्समध्ये दिसतात, परंतु जर ते जमिनीवर दिसले तर त्यांना त्यांचा चष्मा बदलावा लागतो. त्यांचे निवडणूक नशीब असे आहे की त्यांना पाहिल्यानंतर गाढवही त्यांना लाथ मारण्यास नकार देतो. मग कार्यकर्ता म्हणजे काय!

लंगडा घोडा म्हणजे ज्याला पक्षाचे श्रेष्ठी तिकीट देतात, परंतु जनता मतदान केंद्रावर पोहोचण्यापूर्वीच त्यांच्याकडे पाठ फिरवते. आणि जेव्हा ते हरतात तेव्हा ते म्हणतात - ईव्हीएममध्ये समस्या होती.

खबरीलालने मग दुसऱ्या घोड्याचा विचार केलाः रेस हॉर्स - निवडणूक क्षेत्रातील धावणारा. रेस हॉर्स हा राजकारणाचा चमकणारा तारा आहे जो सार्वजनिक सभांमध्ये, सोशल मीडियावरील ट्रेंडमध्ये गर्जना करतो आणि अँकरच्या वादविवाद कार्यक्रमांमध्ये वारंवार दिसून येतो.

जेव्हा हा घोडा निवडणूक लढवतो तेव्हा घोड्यासोबतच त्याचा संपूर्ण तबेला देखील प्रचारात सहभागी होतो. कधीकधी असा घोडा विरोधी पक्षाच्या तबेल्यावरून सत्ताधारी पक्षाच्या तबेल्यात उडी मारतो - अर्थातच, सार्वजनिक सेवेच्या नावाखाली. जिंकल्यानंतर, शर्यतीचा घोडा पाच वर्षे दिसू शकतो किंवा नाही, परंतु तो उद्घाटनाचा रिबन कापण्यासाठी नक्कीच येतो - तेही १५ कॅमेऱ्यांसह.

आता तिसऱ्या घोड्याची, म्हणजेच लग्नाचा घोडा - दिखाऊ पण महत्त्वाचा. म्हणजेच तो राजकारणाच्या सर्वात महत्त्वाच्या पण प्रतीकात्मक चेहऱ्यावर पूर्णपणे बसतो. निवडणुकीच्या वेळी, असा घोडा आघाडीवर असतो - तो रॅलीत डोलतो, हार घालतो, ढोलकीच्या तालावर नाचतो, परंतु प्रत्यक्षात लग्नाच्या मिरवणुकीचा डीजे दिशा ठरवतो.

हा घोडा परंपरेचे, अपेक्षांचे आणि कुछ तो करना ही है या भावनेचे प्रतीक आहे. पण लग्न (निवडणूक) संपताच, घोडा एका कोपऱ्यात बांधला जातो - कोणीही विचारतही नाही.

तर आता प्रश्न असा आहे की राजकारणात खरा घोडा कोण आहे? नेताजींच्या विधानामागील रणनीती काहीही असो, पण जनता विचार करत आहे - आपण एका लंगड्या घोड्यावर पैज लावत आहोत का? की आपण अशा शर्यतीच्या घोड्याला मतदान करत आहोत जो जिंकताच शर्यत सोडून जाईल? की आपण लग्नाच्या घोड्याकडे पाहत आहोत, जो फक्त मिरवणुकीसाठी आला आहे?

राजकारणाच्या या घोड्यांच्या शर्यतीत, मतदार हा खरा स्वार आहे. आता मतदारावर अवलंबून आहे की तो कोणत्या घोड्याला चाबूक मारायचा आहे - लंगडा घोडा, शर्यतीचा घोडा की लग्नाचा घोडा.

हे निवडणुकीचे मैदान आहे, सर्वत्र घोड्यांच्या रांगा आहेत, काही लंगडे घोडे आहेत, काही शर्यतीचे घोडे आहेत, काही लग्नाचे घोडे आहेत.

# लडेंगे भी और जितेंगे भी...

## खा. सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला विश्वास



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**

यशवंतराव चव्हाण यांचे विचार घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा भरारी घेईल. 'लडेंगे और जितेंगे', असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे अजित पवार यांच्यासोबत जाणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण राज्याचा दौरा करणार असल्याची घोषणा देखील त्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनाच्या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

शरद पवार आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र होणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहेत. याचा निर्णय सुप्रिया सुळे घेणार असल्याचे शरद पवार यांनी म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात काही घोषणा किंवा संकेत देतात का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र, सुळे यांनी आपण महात्मा गांधी, पंडित नेहरु, इंदिरा गांधी तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवरच पुढे जाणार असल्याचे सांगितले. तसेच स्वतःवर विश्वास ठेवला तर एक दिवस आपण नक्कीच जिंकणार असल्याचा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना आणि गेल्या २६ वर्षांची वाटचाल, ही सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या कष्टाने झालेली आहे. यासोबत संघर्ष हा येतच असतो. मात्र त्यामुळे निराश होण्याची आवश्यकता नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व आठ खासदारांची संसदेत दखल घेतली जाते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची दखल घेतल्याशिवाय देशातील एकही महत्त्वाचा निर्णय पूर्ण होत नसल्याचा दावा सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

**कर्जमाफी करण्याची मागणी**

शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफी करावी, ही मागणी आम्ही राजकारणासाठी करत नाही. तर राज्यातली परिस्थिती तशी असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. गरिबांचे आणि अनाथ मुलांचे पैसे देखील आज त्यांना मिळत नाहीत. अनेक योजना बंद होण्याची वेळ आली आहे. लाडक्या बहिणींचे नावे यादीतून काढली जात असल्याचा आरोप देखील सुळे यांनी केला आहे.

**राज्यभर दौरा करण्याची घोषणा**

सुप्रिया सुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्याचे संकेत देखील या वेळी दिले आहेत. पक्षांतर्गत बैठका, पक्ष वाढीसाठी प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. इतकेच नाही तर पुढच्या महिन्यापासून मी स्वतः राज्याचा दौरा करणार आहे. आज राज्याची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे, आज पासून पूर्ण ताकतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व सामाजिक प्रश्नासाठी पेटून उठेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# ठाकरे सेनेची महावितरण समोर निदर्शने

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. १० :




शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) च्या वतीने आज बुलढाणा चिखली राज्य मार्गावरील महावितरण कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी जास्तच आक्रमक झाल्याचे चित्र होते. महावितरणाच्या कारभारामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा मांडून शेतकऱ्यांचे वीज बील माफ झाले पाहिजे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आवश्यक ती रक्कम भरून पैसे भरून सहा महिने उलटले तरी सौर पंपाचे कनेक्शन कधी मिळणार? त्यासाठी मुहूर्त सापडणार काय, असा सवाल शिवसेना जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यासह महिला पदाधिकाऱ्यांनी विचारला. शहरी व ग्रामीण भागात देखील सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या मागणीसाठी महावितरणाच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यापूर्वी मुख्य द्वारातून प्रवेश करताना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी गगनभेदी घोषणा देत आपल्या आगमनाची वर्दी दिली. यानंतर महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. यात शेतकऱ्यांच्या, सामान्य वीज ग्राहकांच्या विविध मागण्यांचा समावेश होता. अधीक्षक अभियंत्यांनी तत्काळ कारवाईचे आश्वासन दिले.

यावेळी महिला आघाडी जिल्हा प्रमुख चंदा बढे,युवा सेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाळे, जिल्हा समन्वयक संदीप शेळके, जिल्हा संघटक डी. एस. लहाने, उपजिल्हाप्रमुख सुनील घाटे, माजी सभापती सुधाकर आघाव, तालुकाप्रमुख लखन गाडेकर, तालुकाप्रमुख विजय इंगळे, विजय इतवारे, अशोक मामा गव्हाणे, एडवोकेट सुमित सरदार, रवि राजपूत, गोविंद डांगर, गजानन उबरहंडे, सुनील गवते, समाधान बुधवत, अनिकेत गवळी, मोहम्मद सोफियान, रफिक शेठ, संजय शिंदे, संजय गवळी, भगवान नरोटे रंगनाथ नप्ते, कृष्णा वाघ मुजफ्फर शेख,आशिष थोरगण, मोहित राजपूत, संजय दर्डा, हरिभाऊ सिनकर, साहेबराव इतवारे, मुरली जेऊघाले,दीपक पिंपळे, मधुकर महाले, बबन खरे, संतोष नप्ते, गणेश रिंढे, निंबाजी काळवाघे, रमेश चवंड, राजू बोरसे, गुलाबराव व्यवहारे, संभाजी आघाव,अमोल जुमडे, लताताई टेकाळे, किरण पाटील, चांगदेव जाधव, प्रल्हाद काकडे, संजय चोरमुले, सोमनाथ शिरसाट, पंजाबराव गवई, संदीप जाधव, श्रावण बोरकर, प्रकाश गवळी व शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिरवा चारा निर्मितीसाठी "हायड्रोपोनिक स्ट्रक्चर"

## कृषी विद्यापीठाकडून विकसित, एकात्मिक कीड तंत्रज्ञानासाठी सामंजस्य करार



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने जनावरांसाठी हिरवा चारा निर्माण करण्याच्या दृष्टीने विकसित केलेल्या अत्याधुनिक हायड्रोपोनिक स्ट्रक्चर आणि इतर अभियांत्रिकी तंत्रज्ञानाच्या व्यापारीकरणासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाच्या कुलगुरू कार्यालयाच्या सभागृहात हा महत्त्वपूर्ण करार पार पडला.

हिरवा चारा हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनावरांना वर्षभर संतुलित आहार मिळावा यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले हायड्रोपोनिक स्ट्रक्चर मातीशिवाय, केवळ पाण्यात किंवा पोषक द्रवात हिरवा चारा तयार करण्यास सक्षम आहे. अवघ्या १०-१२ दिवसांत चारा उत्पादन घेतले जाऊ शकते. या सामंजस्य करार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. प्रमुख उपस्थितीत संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे, तसेच डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. महेंद्र देशमुख, डॉ. अशोक मस्के, डॉ. प्रमोद बकाने, डॉ. मृदुलता देशमुख, डॉ. अनिल कांबळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कमी जागा, वेळ, मनुष्यबळ आणि पाणी लागते वर्षभर चारा निर्मिती शक्य चाऱ्याची पाचकता वाढते, त्यामुळे जनावरांचे आरोग्य सुधारते दुष्काळी परिस्थितीत किंवा हिरवा चारा उपलब्ध नसेल तेव्हा हा पर्याय अत्यंत उपयोगी आहे.

# रानमित्रच्या वतीने मोफत भाजीपाला बियाणे वितरण

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :



पर्यावरण रक्षण व वृक्ष संवर्धन कार्यात अग्रेसर असणाऱ्या स्थानीय रानवारा चमूच्या वतीने आयोजित मोफत भाजीपाला बियाणे वितरण मोहिमेस पर्यावरण प्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोहिमेचा प्रारंभ मनपा आयुक्त डॉ सुनील लहाने यांच्या हस्ते करण्यात आला.

आज कीटकनाशक फवारलेला भाजीपाला व फळे सर्वत्र आढळतात. याचे अनेक दुष्परिणाम शरीरावर होत असतात. याच अनुषंगाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नागरिकांनी स्वतः सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला उगवावा व त्याची आवड लागावी या हेतूने टीम रानमित्र, अकोलाच्या वतीने मोफत भाजीपाला बियाणे वितरण मोहीम राबवण्यात आली. रानमित्रच्या संस्थापिका डॉ. पल्लवी दिवेकर यांच्या नेतृत्वात ही मोफत भाजीपाला बियाणे वितरण मोहीम राबवण्यात आली.

या वितरण मोहिमेचा प्रारंभ मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते व सहायक वन संरक्षक सुवर्णा इंगोले, इन्फ्लुएंसर करणसिंग ठाकूर व रानमित्रच्या संस्थापिका डॉ. पल्लवी दिवेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या लोकोपयोगी उपक्रमाचे कौतुक करीत डॉ. दिवेकर यांच्या या अभिनव उपक्रमास आपल्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी नागरिकांना रानमित्रच्या टीमने विविध प्रकारचे भाजीपाला बियाणे वितरण वितरित करून त्याची लागवड पद्धतीची शास्त्रीय माहिती दिली. यावेळी डॉ पल्लवी दिवेकर यांनी या उपक्रमाची माहिती देत पर्यावरण प्रेमी नागरिकांनी संस्थेच्या या मोहिमेचा लाभ घेत आपल्या परस बागेत याची लागवड करून आरोग्य व पर्यावरण सुदृढ ठेवण्याचे आवाहन केले. रानमित्रच्या या मोहिमेच्या यशासाठी रानमित्रचे पदाधिकारी निखिलेश दिवेकर, उपाध्यक्षा माधवी तायडे, सचिव पल्लवी डोंगरे, सहसचिव राजेश लोहिया, कार्यकारी सदस्य डॉ. पियुषा भागडे यांनी मेहनत घेतली. या मोहिमेत डॉ.वंदना बागडी, नितीन बक्षी, नीलेश देव, डॉ. तडस, डॉ. बेला राठी, सौरभ पोफळी, अजय सेंगर, श्याम गोटफोडे, महादेव मेहंगे, सचिन सरदार, विश्वजीत गवळी समवेत बहुसंख्य महिला पुरुष नागरिक उपस्थित होते.

# मराठा समाजाकडून ठरवून दिलेल्या आचारसंहितेनुसारच विवाह सोहळा



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :

अकोला- पाटील समाज वर-वधू सुचक केंद्राद्वारे गेल्या काही वर्षांपासूनच समाजातील गोरगरीब वर-वधूंचे विवाह आदर्श पद्धतीने लावण्यात येतात. अगदी ५० लोकांच्या उपस्थितीत तर कधी फक्त चहा पाण्यावर विवाह लावण्याची आदर्श परंपरा पाटील समाज वर-वधू सुचक केंद्राकडून गत काही वर्षांपासून सुरू करण्यात आलेली आहे.

त्यात आता पाटील समाजाद्वारे आदर्श विवाहासाठी आचारसंहिता निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाची आदर्श परंपरा व समाजाने निश्चित केलेली आचारसंहिता यानुसार शहरात विवाह पार पडला. पाटील समाज वर-वधू सूचक केंद्र अकोला, लग्न गाठी वेबसाईडच्या माध्यमातून आतापर्यंत ५८० विवाह जुळवण्यात आले आहेत. यावर्षी २८ आदर्श विवाह सोहळे फक्त चहा-फराळावर करण्यात आले. ८ जून रोजी दुर्गा ओंकार टोळे व हरीश सुधाकर दाने यांचा विवाह पाटील समाज वर-वधू सूचक केंद्र अकोला, लग्नगाठी संकेतस्थळाच्या माध्यमातून जुळवण्यात आला.

या सोयरीकमध्ये डॉ. अशोक ओळंबे, ॲड. संतोष गोळे, माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी मध्यस्थी करून अवघ्या ७ दिवसात विवाह पक्का करून मुला मुलीच्या घरी जेवण न करता मराठा समाजाने ठरवून दिलेली आचार संहिता पाळून हा विवाह अगदी साध्या पद्धतीने १०० लोकांच्या उपस्थितीत आर्य समाज शाळा हॉल येथे संपन्न करण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे शिवमय उत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
सिंदखेडराजा, दि. १० :



शूरवीर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अभिषेकाचा गौरवशाली दिन म्हणजे शिवराज्याभिषेक दिन झ हा दिवस राष्ट्रभक्ती, शौर्य व संस्कृतीचा जाज्वल्य तेजस्वी स्वरूपात सिंदखेडराजा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने उत्सवाच्या रूपात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम नुकतेच पार पडला. यावेळी जिजाऊंच्या जन्मस्थळ असलेल्या पवित्र पदस्पर्श लाभलेल्या राजवाड्या समोरील शिवपुतळ्याची स्वच्छता करून, फुलांच्या साजेश्या माळांनी सजावट करण्यात आली. ढोल-ताशांच्या गगनभेदी गजरात, राजमाता जिजाऊ यांना वंदन करत उपस्थितांनी रायगडावरील सिंहासनाचे स्मरण जागवले. नंतर महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व पुष्पहार अर्पण करताच, वातावरण "छत्रपती शिवाजी महाराज की जय!" या रणभेरीसदृश घोषणांनी थरारून गेले. फटाक्यांच्या आतषबाजीत गगनात उंचावलेले ते आवाज, जणू रायगडावरील सिंहासनच पुन्हा अधिष्ठित झाले, असा भास देणारे होते. या सोहळ्याला जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, देविदास ठाकरे, वैभव मीनासे, सिद्धार्थ जाधव, माधव मेहेत्रे, आदिल पठाण, दस्तगीर शेठ, ब्रम्हा पाडमुख, नंदू शेठ कुरुंगळ, श्याम मेहेत्रे, विकास ठाकरे, रोहित चौधरी, ओम कायंदे, अमर जाधव यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

# आठवडी बाजार परिसरात तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड, दि. १० :

शहरातील दोन गटात समोरासमोर झालेल्या हाणामारीत एका २३ वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना आठवडी बाजार परिसरात रात्री १२.३० वाजताच्या सुमारास घडली.तर दोन तरूण गंभीर जखमी झालेले आहे. अजहर शेख अकबर मृत तरूणाचे नाव असून शेख मुदशीर शेख जमीर (वय २७) व शेख आरिफ शेख निसार (वय २२)असे जखमींची नावे आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, मृत अजहर शेख अकबर याचा मोठा भाऊ शेख खालीद शेख अकबर याने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार रविवारी संध्याकाळी ताजपुरा वार्डात दोन गटामध्ये भांडण झाले होते. दोन्ही गटाचे परत रात्री आठवडी बाजारात भांडण झाले.

# संत्रा उत्पादक शेतकरी नुकसानीपासून वंचित

■ महासागर प्रतिनिधी,
उमरा, दि. १० :

अकोट तालुक्यातील उमरा महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित आहे. संत्रा विमा परताव्यासाठी शासनाचे उदासीन धारेण कारणीभूत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

संत्रा मृग बहार विमा २०२४ चा परतावा गत एका वषार्पासून शेतकऱ्यांना मिळालेला नाही. याबाबत शेतकऱ्यांनी अनेकदा पाठपुरावा करून सुद्धा शासनाने सदर बाबीची तिळभर देखील दाखल घेतली नाही. विमा परताव्याचा मुद्दा खरीप पूर्व आढावा बैठकीत पालकमंत्री आकाश कुंडकर यांच्या अध्यक्षतेत चांगलाच गाजला होता. त्यांनी तात्काळ विमा परतावा देण्याचे निर्देश संबंधित कंपनीला दिले होते.

कृषिमंत्र्याची सदर बाबी विषयी चर्चा करण्याच्या आश्वासन सुद्धा उमरा महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिले होते. मात्र शासनाच्या निर्देशांला वाटाण्याच्या अक्षता दाखवत सदर विमा कंपनी ही फक्त शेतकऱ्यांकडून पैसे जमा करण्याकरिताच आहे असा आरोप शेतकऱ्यांनी केला. ९ कोटी ४९ लक्ष रुपयाचा परतावा का देण्यात येत नाही, असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. गेल्या तीन वषार्पासून संत्रा उत्पादन रोगराई तर कधी निसर्गाच्या अनियमित पणामुळे संकटात आहे.

# कार्यालय नगर परिषद वाडी

## तह जिल्हा नागपूर (ग्रामीण) नागपूर.

Email:-comcwadi@gmail.com

जा.क्र/नपवा/स्ववपापुवि/ ७६४/२०२५ दि. :१०/०६/२०२५

**जाहीर ई-निविदा सुचना-१/२०२५-२६**

मुख्याधिकारी नगर परिषद वाडी ता. जि. नागपुर यांच्या वतीने नगर परिषद परिसरातील मोठे नाले /नाल्या साफसफाईचे व इतर कामे करण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा दि. ११/०६/२०२५ रोजी प्रसिध्द केलेली आहे. वरील कामाबाबत संपुर्ण माहीती व इतर माहीती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी नोंद घ्यावी.

स्वा/-
(डॉ. ऋचा धाबर्डे)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

## संत मुक्ताई यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा, दि. १० :

संत मुक्ताबाईच्या आषाढी वारी पालखीला ६ जून रोजी सुरुवात झाली असून ८ जून रोजी पालखी मोताळा येथे मुक्कामी आली होती. दरम्यान, आज ९ जून रोजी सकाळी पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी शहरात ठिकठिकाणी पालखीचे भाविकांकडून स्वागत करण्यात आले आहे. संत मुक्ताबाई पालखीला ६ जून रोजी मुक्ताईनगर येथून सुरुवात झाली असून ३ जुलै रोजी पालखी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. ८ जून रोजी संध्याकाळी पालखीचे मोताळ्यात आगमन झाले. यावेळी पालखी मार्गावर भाविकांच्या वतीने रांगोळ्या काढून स्वागत करण्यात आले. प्रा. मामलकर आणी ज्ञानेश्वर वाघ यांच्या हस्ते मुक्ताईची आरती करण्यात आली.

कार्यालय

# नगर पंचायत बहदुरा

## ता.जि. नागपुर

Email: np.bahadura14@gmail.com

जा.क्र.न.प.ब./६०७३/२०२५ दिनांक ९/६/२०२५

**जाहिर सुचना**

नगर पंचायत बहादुरा क्षेत्रातील सर्व नागरिकांना सुचीत करण्यात येते की, ज्या नागरिकांचे रिकामे प्लॉट आहेत त्यांनी आपले प्लॉटवर ७ दिवसाचे आत भरण भरणा करण्यात यावे तसेच रिकामे प्लॉटवर वाढ्लेली झाडे झुडुपे काढुन प्लॉट स्वच्छ करण्यात यावा. काम पुर्ण झाल्यावर स्वच्छ प्लॉट चे फॉटो नगर पंचायत बहादुरा कार्यालयात जमा करण्यात यावे. अन्यथा आपणाले प्लॉटचे मालमत्ता कर रद्द करुन सदर मालमात्ता नगर पंचायत बहादुराच्या कब्जामध्ये घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रशासक
नगर पंचायत बहादुरा

# हरी गोविंद इंटरनॅशनल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १२५, वर्धमान नगर, राधा कृष्ण मंदिराजवळ, नागपूर-०८. EMAIL : hgil.ngp@gmail.com
WEBSITE: www.hgil.in PH: 09373126605 CIN: L99999MH1989PLC050528

**पोस्टल बॅलटच्या सूचनेसाठी शुक्रवार संक्षिप्त पत्र**

१० जून २०२५ रोजीच्या पोस्टल मतदानाच्या सूचनेला (पोस्टल मतदान सूचना) पुढे पाठवून आणि बीएसई लिमिटेडने हरी गोविंद इंटरनॅशनल लिमिटेड (कंपनी) ला ५ जून २०२५ रोजीच्या पत्रव्यवहारात दिलेल्या भाष्यांशी सुसंगत राहून (शुद्धीपत्र) हा शुद्धीपत्र जारी केला आहे.

हे शुद्धीपत्रक कंपनीच्या सदस्यांना स्पष्टीकरणात्मक विधानाशी संबंधित खुलाशांबद्दल स्पष्टीकरण आणि माहिती देण्याच्या उद्देशाने जारी केले आहे. आयटम क्रमांक ३: पॉइंट क्रमांक २ (ii) प्रेफरन्सियल इश्यूचा उद्देश/उद्देश आणि पॉइंट क्रमांक (vi) आणि (xviii) मूल्यांकन अहवालाच्या लिंकसाठी आणि अनुपालन प्रमाणपत्र आणि (xiii) वाटपकर्त्यांकडे असलेल्या पोस्ट प्रेफरेंशियल इश्यू कॅपिटलची टक्केवारी (%) आणि परिणामी नियंत्रणात बदल, जर असेल तर, आणि (xxii) येथे अधिक स्पष्टपणे वर्णन केल्याप्रमाणे, शाजू थॉमस आणि लिंटा पी जोस यांच्या प्रेफरेंशियल इश्यूच्या प्रस्तावित वाटपकर्त्यांची सध्याची स्थिती.

१. पोस्टल बॅलट नोटीसच्या ठरावाच्या मुद्दा क्रमांक ३ च्या स्पष्टीकरणात्मक विधानाच्या मुद्दा क्रमांक २ (ii) चे शुद्धिपत्रक - प्राधान्यक्रमाच्या मुद्द्याचा उद्देश/उद्देश:

प्रेफरेंशियल इश्यूमधून मिळणारे उत्पन्न आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळमध्ये नवीन स्टोअर्स उघडून आमच्या रिटेल फूटप्रिंटचा विस्तार करण्यासाठी वापरला जाईल तसेच कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याची माहिती खालील तक्त्यात दिली आहे, तथापि, या निधीचा वापर नियामक मंजुरी मिळाल्यानंतरच सुरू होईल. दरम्यान, लागू असलेल्या नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार, निधी शेड्यूल्ड कमर्शियल बँकेत मुदत ठेवींमध्ये ठेवला जाईल किंवा इष्टतम परताव्यासाठी लिक्विड/म्युच्युअल फंडमध्ये गुंतवला जाईल.

एकूण उत्पन्नाचा वापर आणि वापराच्या वेळेची गणना:

| अ. क्र | विशेष | वापरण्यासाठी एकूण अंदाजे रक्कम (रु. कोटीमध्ये) | निधीच्या वापरासाठी टाइमलाइन |
|---|---|---|---|
| 1 | नवीन स्टोअरसाठी नागरी कार्य | ६,०००,००० | नियामक मान्यता मिळाल्यापासून १२ महिन्यांच्या आत |
| 2 | नवीन स्टोअरसाठी अंतर्गत काम | ९,४५०,००० | |
| 3 | कार्यालयीन उपकरणे | २,४००,००० | |
| 4 | भाडे जमा | ४,८००,००० | |
| 5 | कार्यरत भांडवल | १५,१००,००० | |
| | एकूण | ३७,७५०,००० | |

टीप: उभारलेला निधी १०० कोटी रुपयांपेक्षा कमी असल्याने, निधीच्या वापरावर लक्ष ठेवण्यासाठी देखरेख एजन्सी नियुक्त करण्याची आवश्यकता नाही.

२. पोस्टल बॅलट नोटीसच्या ठरावाच्या आयटम क्रमांक ३ च्या स्पष्टीकरणात्मक विधानाच्या मुद्दा क्रमांक २ (vi) परिच्छेद ३ आणि ५ (मूल्यांकन अहवालासाठी विशिष्ट लिंक) चे शुद्धीपत्र - नोंदणीकृत मूल्यनिर्धारकाच्या अहवालासह किंमत ज्या आधारावर निश्चित केली गेली आहे:

परिच्छेद ३: सेबी आयसीडीआर नियमावलीच्या नियमावली १६५ नुसार प्राधान्यक्रमित इश्यूसाठी किमान किंमत निश्चित करणारे प्रमाणपत्र स्वतंत्र नोंदणीकृत मूल्यमापनकर्ता श्री. सुमन कुमार वर्मा (नोंदणी क्रमांक बीबी/आरव्ही/०५/२०१९/१२३७६) यांच्याकडून घेण्यात आले आहे आणि ते कंपनीच्या वेबसाइटवर https://hgil.in/wp-content/uploads/2025/05/Valuation-Report1.pdf. उपलब्ध करून दिले जाईल आणि प्रकाशित केले जाईल. १४ मे २०२५ च्या मूल्यांकन अहवालानुसार, मूल्यनिर्मात्याने शिफारस केलेले प्रति शेअर वाजवी मूल्य प्रति शेअर रु. १०/- आहे.

परिच्छेद ५: सेबी (आयसीडीआर) नियमावली, २०१८ च्या नियम १६६अ (१) आणि त्यानंतरच्या सुधारणांचे पालन करून, स्वतंत्र नोंदणीकृत मूल्यमापनकर्ता, श्री. सुमन कुमार वर्मा (नोंदणी क्रमांक बीबीआय/आरव्ही/०५/२०१९/१२३७६) यांच्याकडून प्रमाणपत्र घेण्यात आले आहे आणि त्यांनी कंपनीच्या इक्विटी शेअर्सचे उचित मूल्य प्रति शेअर १०/- असे शिफारसित केले आहे. सदर मूल्यांकन अहवाल कंपनीच्या वेबसाइट https://hgil.in/wp-content/uploads/2025/05/Valuation-Report1.pdf. वर उपलब्ध करून प्रकाशित केला जाईल.

३. स्पष्टीकरणात्मक विधानाचे शुद्धीपत्रक मुद्दा क्रमांक २ (xviii) अनुपालन प्रमाणपत्रासाठी विशिष्ट लिंक ठरावाचे अनुपालन प्रमाणपत्र पोस्टल मतदान सूचनेचा मुद्दा क्रमांक ३ - प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीकडून प्रमाणपत्र:

प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी मेसर्स एसपीएसएन अँड असोसिएट्स पीअर रिव्ह्यू क्रमांक: ६१३८/२०२४ कडून प्रमाणपत्र, भागीदार श्रीमती संध्या रवी नायर (सदस्यता क्रमांक एफ१३१८०, सीओपी १४४२७) सेबी (आयसीडीआर) नियमावलीच्या अध्याय पाच, नियमावली १६३ (२) अंतर्गत आवश्यक असलेल्या सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (इश्यू ऑफ कॅपिटल अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१८ च्या आवश्यकतांनुसार इक्विटी शेअर्सचा प्रस्तावित प्रेफरन्सियल इश्यू केला जात आहे हे प्रमाणित करणे प्राप्त झाले आहे. हे प्रमाणपत्र कंपनीच्या https://hgil.in/wp-content/uploads/2025/05/ICDR-Certificate-of-Compliance.pdf वर देखील उपलब्ध असेल.

४. पोस्टल मतदान सूचनेच्या निर्णयाच्या मुद्दा क्रमांक २ (Xiii) च्या स्पष्टीकरणात्मक विधानाचे शुद्धीपत्र - पोस्ट प्रेफरेंशियल इश्यू भांडवलाची टक्केवारी (%) जी वाटपकर्त्यांकडे असू शकते आणि प्रेफरेंशियल इश्यूमुळे नियंत्रणात बदल, जर असेल तर:

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, वाटपकर्त्यांकडे पोस्ट प्रेफरेंशियल इश्यू कॅपिटलची टक्केवारी (%) असू शकते आणि वरील इश्यू आणि इक्विटी शेअर्सच्या वाटपानुसार कंपनीच्या व्यवस्थापनात किंवा नियंत्रणात बदल होईल.

५. पोस्टल मतदान सूचनेच्या ठरावाच्या मुद्दा क्रमांक २ (xxii) च्या स्पष्टीकरणात्मक विधानाचे शुद्धीपत्र - प्रस्तावित वाटपधारक पदाच्या प्राधान्यक्रमाची सद्यस्थिती आणि प्रस्तावित स्थिती:

प्रस्तावित वाटप प्रवर्तकांना तसेच गैर-प्रवर्तकांनाही केले जाईल आणि त्याची माहिती खाली दिली आहे:

| अ. क्र | प्रस्तावित वाटपधारकाचे नाव | प्रस्तावित वाटपधारकाची सध्याची स्थिती | प्राधान्यक्रम जारी झाल्यानंतर प्रस्तावित वाटपधारकाची प्रस्तावित स्थिती |
|---|---|---|---|
| 1 | शाजू थॉमस | गैर-प्रवर्तक | प्रस्तावित प्रवर्तक |
| 2 | लीनता पी जोस | गैर-प्रवर्तक | प्रस्तावित प्रवर्तक |
| 3 | कविचरला काशी रत्नम | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 4 | कविचेरला ए एस व्ही रमणा | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 5 | साविर पॉवर अँड ऑटोमेशन प्रायव्हेट लिमिटेड | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 6 | रितू अतुल चौहान | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 7 | कल्पना देवी जैन | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 8 | अजित कुमार | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 9 | दैझम अग्रवाल | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 10 | मिमेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 11 | समीप सतीश उचिल | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 12 | रचना समीर पारेख | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 13 | संतोष जे पांडे | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |
| 14 | शिवा दुबे | गैर-प्रवर्तक | गैर-प्रवर्तक |

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
हरी गोविंद इंटरनॅशनल लि. साठी
स्वा/-
जुगलकिशोर मणियार
पूर्णवेळ दिग्दर्शक
डीन: ०००९४२३७

ठिकाण : नागपूर
तारीख: १० जून २०२५

# उन्माद आणि बेपर्वाई...

**इंडिया कॉलिंग**

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्जला हरवून तब्बल १८ वर्षानंतर आयपीएलचा चषक जिंकल्याचा सर्व देशात फटाके वाजले. मध्यरात्रीपर्यंत देशातील कोट्यवधी क्रिकेट प्रेमी टीव्हीच्या पडद्यावर प्रत्येक चेंडूनंतर काय होणार हे मोठ्या उत्सुकतेने पाहत होते. अगदी शेवटच्या षटकापर्यंत ही उत्सुकता कायम होती. केवळ बंगळुरूच नव्हे तर महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, अहिल्यानगरमध्ये जल्लोष झाला. दिल्लीपासून गल्लीपर्यंत क्रिकेटप्रेमींनी विराटचा जयघोष केला. आदल्या रात्री विजय मिळवला व दुसऱ्याच दिवशी बंगळुरूमध्ये विजयी टीमच्या जंगी स्वागताचा सोहळा ठरविण्यात आला. बंगळुरू विधानसौध ते चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक, विधानसौधमध्ये सत्कार आणि स्टेडियमवर हजारो लोकांच्या साक्षीने विजयी सोहळा असा कार्यक्रम ठरविण्यात आला.

मुळातच हा कार्यक्रम घाईघाईने ठरवला गेला. इतक्या कमी वेळात त्याचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था व विजयोत्सवाची तयारी शक्य होती काय? याचा रॉयल चॅलेंजर्स, कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन आणि राज्यात सत्तेवर असलेल्या सिद्धरामय्या सरकारनेही कोणताच गांभीर्याने विचार केला नसावा.

आपल्या राज्याचा संघ १८ वर्षांनी आयपीएल जिंकला, त्याच्या विजयाचे श्रेय आपणच घेतले पाहिजे, तेही झटपट आणि लगेचच असा विचार त्यांनी केला असावा. कारण या संघातील विराट कोहलीसह अन्य खेळाडूंना लगेचच कुठे ना कुठे बाहेर जायचे होते...

चिन्नास्वामी स्टेडियम हे बंगळूरुच्या अतिशय गजबजलेल्या भागात आहे. स्टेडियमची प्रेक्षकांची क्षमता पस्तीस हजार आहे. विराटची विजयी टीम तिथे येण्यापूर्वीच स्टेडियममध्ये साठ-सत्तर हजार लोक घुसले होते आणि स्टेडियमबाहेर किमान तीन ते साडेतीन लाखांची खचाखच गर्दी होती. तीन-चार लाख लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी तेथे केवळ चौदाशे पोलीस होते.

आपल्या विजयी टीमला बघण्यासाठी आलेल्या महापूराएवढ्या गर्दीला कोणालाही आवरण शक्य झाले नाही. स्टेडियमच्या क्षमतेपेक्षा दुप्पट लोक घुसल्यामुळे स्टेडियमचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते, त्याचा परिणाम दरवाजे तोडून लोकांनी आत घुसण्याचा प्रयत्न केला.

मग दुसरे काय होणार... तुफान चेंगराचेंगरी, तुडवातुडवी... त्यात अकरा जणांचा बळी गेला आणि पन्नासहून अधिक जखमी झाले. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू संघाच्या विजयोत्सवाला गालबोट लागले. विजयोत्सवाचे शोकांतिकेत रूपांतर झाले...

भारताने पाकिस्तानवर हवाई व क्षेपणास्त्रांचे हल्ले करून एका रात्रीत दहशतवादी तळ नेस्तनाबूत केले, शंभर दहशतवादी यमसदनाला पाठवले. पाकिस्तानच्या हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले, शस्त्रसंधी झाल्यावर भाजपाने देशभर ऑपरेशन सिंदूर यात्रा काढल्या, विजयोत्सव साजरा केला पण कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.

युद्धातील विजयानंतर, निवडणुकीच्या निकालानंतर किंवा खेळातील चषक जिंकल्यानंतर देशात-विदेशातही विजयी मिरवणुका निघतात. विजयीवीरांना प्रत्यक्ष बघायला मिळावे म्हणून विजयोत्सव पाहण्यासाठी हजारो-लाखो लोक जमतात पण नियोजन नसेल किंवा गर्दीचे उन्माद चढला असेल, तर त्याच विजयाला गालबोट लागते अशीही अनेक उदाहरणे आहेत.

याच वर्षी उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे कुंभमध्ये संगमात स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक आले होते. पण २९ जानेवारी रोजी लाखोंच्या चेंगराचेंगरीत ४० जणांचा मृत्यू झाला व ६० जखमी झाले. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला व १५ जखमी झाले.

यातले बहुतेक प्रयागराजला जाणारे होते. दि. ३ मे २०२५ रोजी गोव्यात देवीच्या उत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला व १०० जखमी झाले. गर्दीवर नियंत्रण ठेवता न आल्याने या दुर्घटना घडल्या.

अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने १९७१ मध्ये वेस्ट इंडिजच्या विरोधात कसोटी मालिका प्रथमच जिंकली. भारतीय टीम मुंबईत आली तेव्हा तिच्या स्वागताला सांताक्रूझ विमानतळावर भल्या पहाटे हजारो लोक जमले होते. या टीमची खुल्या बसमधून मिरवणूक निघाली व रस्त्यावर दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या हजारो मुंबईकरांनी आपल्या विजयीवीरांवर पुष्पवृष्टी केली.

कपिल देवच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये भारतीय संघाने वन डे विश्वचषक जिंकला. तेव्हा भारतीय टीमची मुंबईत विजयी मिरवणूक निघाली होती. सन २००७ मध्ये महेंद्र सिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला, त्यानंतरही मुंबई विमानतळावरून वानखेडे स्टेडियमपर्यंत विजयी मिरवणूक निघाली होती.

सन २०११ मध्ये टीम इंडियाने मुंबईतच विश्व चषक जिंकला तेव्हाही मुंबईत क्रिकेट प्रेमींनी मोठा उत्सव साजरा केला होता. सन २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकून मुंबईत परतल्यावर याच शहरात मोठी विजयी मिरवणूक निघाली होती.

या मिरवणुकीत तर चार-पाच लाख सहभागी झाले होते. मरिन डाइव्हवर एवढी गर्दी होती की नेहमी दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी टीम इंडियाला चार तास लागले. गर्दीत धक्काबुक्की काहींना किरकोळ दुखापत झाली किंवा काहींची श्वास कोंडला त्यांना त्वरित वैद्यकीय उपचार मिळाले. लाखोंच्या गर्दीतही एक रुग्णवाहिका जात असताना लोक वाट करून देत होते, असे व्हीडिओ व्हायरल झाले होते.

मुंबईत सुरळीतपणे पार पडले ते बंगळूरुला का जमले नाही? मुंबई पोलीस, मुंबई क्रिकेट असोसिएशन, राज्य सरकार, मुंबई महापालिका यांच्यात असलेला समन्वय हा महत्त्वाचा होता. मग बंगळूरुमधील अशा यंत्रणांमध्ये परस्पर सुसंवाद, समन्वय नव्हता की फाजिल आत्मविश्वास सरकार, पोलीस व प्रशासनाला नडला?

बंगळूरु पोलिसांनी चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगचेंगरीत अकरा जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु, डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट प्रा. लि. आणि कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशन यांच्या विरोधात गुन्हे नोंदवले आहेत. रॉयल चॅलेंजर्सच्या चार व डीएनए इव्हेंट कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी तर बंगळूरुचे पोलीस कमिशनर बी. दयानंद व चार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक (इंटेलिजन्स) हेमंत निंबाळकर यांची तत्काळ बदली केली आहे. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव के. गोविंदराज यांना पदावरून मुक्त केले आहे.

बंगळूरु दुर्घटनेचा तपास सीआयडीकडे सोपवला असून न्यायालयीन चौकशीचे आदेश निघाले आहेत.

विराट कोहलीच्या टीमच्या विजयी मिरवणुकीला व स्टेडियममधील विजयोत्सवाला हजर राहण्यासाठी किती लोक येतील याचा अंदाज पोलिसांना बांधता आला नाही. चार लाख लोक जमले याची कुणी कल्पनाही केली नव्हती.

हे सर्व लोक, तरुण मुले, विद्यार्थी घरी किंवा ऑफिसमध्ये सांगून सवरून किंवा सुट्टी रजा घेऊन आले होते का? आपले कामधंदे सोडून ही लाखोंची गर्दी आपल्या हिरोंना बघायला जमते याचा दुसरा अर्थ काय? हे सर्व कामधंदे, नोकरी, नसलेले लोक होते का? बंगळूरु हे देशातील मोठे आयटी सीटी आहे.

कॉर्पोरेट कंपन्यांची तिथे मोठी गर्दी आहे. मग या शहराला किमान शिस्त, नियोजन, सुरक्षितता काहीच नाही का? आयपीएल चषक जिंकल्यावर बंगळूरुला घाईघाईने विजयोत्सव साजरा करण्याचा निर्णय कुणाचा? विजयी मिरवणूक व स्टेडियममध्ये विजयोत्सव कुणी ठरवला? पोलिसांकडे परवानगीसाठी अर्ज कुणी केला?

पोलिसांनी विजयोत्सवाला व मिरवणुकीला नकार दिला असताना त्यांच्यावर दबाव कोणी आणला? दि. ३ जून बुधवार ऐवजी ८ जून रविवारी विजयोत्सव साजरा करावा अशी सूचना पोलिसांनी केली असताना पुन्हा ३ जून (वर्किंग डे) चा हट्ट कोणाचा? स्टेडियमवर विजयोत्सवासाठी मोफत पास वेबसाईटवर मिळतील असे आवाहन कोणी केले?

स्टेडियमबाहेर तीन-चार लाख लोकांची अनियंत्रित गर्दी असताना विधानसौधमध्ये सत्कार समारंभ कसा चालू होता? पोलिसांची संख्या, रुग्ण वाहिका, औषधोपचार, वाहतूक नियंत्रण, ही सारी इव्हेंट मॅनेजमेंट कुठे होती? उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यामार्फत आरसीबीचे पदाधिकारी पोलिसांवर दबाव आणत होते हे खरे काय? विजयोत्सवासाठी वेळ अपुरा आहे, असे पोलीस सतत सांगत असताना त्यांची सूचना धुडकावण्याचे काम सरकारमधील कुणाचे?

निलंबित पोलीस कमिशनर बी. दयानंद यांनीच विधानसौधमध्ये कार्यक्रम घेऊन नये असे म्हटले होते, पण मुख्यमंत्री कार्यालयातून त्यांच्यावर दबाव आणला गेला हे खरे काय? श्रेय घेण्यासाठी अतिघाईने विजयोत्सव आयोजित करायचा व शोकांतिका घडल्यावर पोलीस व प्रशासनातील वरिष्ठांचा बळी द्यायचा असा हा प्रकार आहे.

आयपीएल हे निव्वळ क्रिकेट नसून हा बिझनेस आहे हे काही लपून राहिलेले नाही. सर्वाधिक पैसे व सर्वाधिक टीआरपी हाच उद्देश आहे. टीमचे मालक खेळाडूंना पैसे देऊन विकत घेतात आणि मैदानात चिअर्स गर्ल्सही पैसे घेऊनच नाचतात.

या सामन्यांचे प्रक्षेपण करताना टीव्ही चॅनेल्समधील टीआरपीची जीवघेणी स्पर्धा असते. टी- शर्टस, टोप्यांपासून ते व्यापारी जाहिरातींची कोट्यवधींची उलाढाल असते. आयपीए हा खेळ आहे अशी कागदोपत्री नोंद असल्याने त्याच्या उत्पन्नावर कोणताही सरकारी कर नाही. ताकदवान राजकारणी व बडेबडे उद्योगसमूह यांचा आयपीएलशी संबंध असल्याने बाहेर काय घडते, याविषयी त्यांना कोण जाब विचारणार? ■ ■

# साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी.

साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत.

साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली.

१९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे.

त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतक?यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

---

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५**

■ ■ ■

# बिहार मधील राजकीय समीकरणे

बिहार मध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप यांच्या दृष्टीने या निवडणुका अतिशय महत्त्वाच्या असणार आहेत.

२०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राजदचा विजय थोडक्यात हुकला होता.त्या निवडणुकीत राजदला ७५ जागा मिळाल्या होत्या आणि राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला ११० जागा मिळाल्या होत्या.भाजपाला ७४ जागा मिळाल्या होत्या, तर भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला १२५ जागा मिळाल्या होत्या.

२४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत साध्या बहुमतासाठी १२२ जागांची गरज असताना, भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआने १२५ जागा जिंकून काठावरचे बहुमत मिळविले होते. राजदकरता ही निवडणूक अशासाठी महत्वाची आहे की, गेल्यावेळी सत्तेवर येण्याची थोडक्यात हुकलेली संधी यावेळी त्यांना साधायची आहे.तर भाजपा आजवर एकदाही स्वबळावर बिहार मध्ये सत्तेवर आलेली नाही, त्यामुळे स्वबळावर बहुमत मिळवण्याचा भाजपाचा प्रयत्न राहील.

नितीशकुमार गेली दोन दशके बिहारचे मुख्यमंत्री आहेत. कधी भाजपा बरोबर तर कधी राजद बरोबर समझोता करून त्यांनी आपली मुख्यमंत्री पदाची खुर्ची टिकवली आहे.आपली मुख्यमंत्री पदाची खुर्ची टिकवण्यासाठी त्यांना आजवर बऱ्याच कसरती कराव्या लागल्या आहेत. त्यामुळेच त्यांना बिहार मध्ये पलटूराम या नावाने संबोधले जाते. मात्र अलिकडे त्यांची प्रकृती ठीक नसते.त्यांचा विसरभोळेपणा वाढला आहे.असे असले तरी भाजपाला बिहार मध्ये, नितीशकुमार यांच्याशिवाय पर्याय नाही.

बिहारमध्ये नितीशकुमार अद्याप आपला प्रभाव राखून आहेत.विशेषतः अतिमागास जाती, मुस्लिम समाज आणि महिला यांच्यामध्ये ते अतिशय लोकप्रिय आहेत. त्यामुळेच कमीपणा घेऊन भाजपाने त्यांना मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर बसवले. खरे पाहता २०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला ७४ जागांवर विजय मिळाला होता,तर नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाला फक्त ४३ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे संख्या बळाच्या जोरावर भाजपाला मुख्यमंत्रीपद मिळायला हवे होते, परंतु राजकीय समीकरणे लक्षात घेऊन भाजपाने नितीशकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवले होते.

२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला १९ टक्के तर संयुक्त जनता दलाला १५ टक्के मते मिळाली होती. लोकजनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान यांनी त्या निवडणुकीत स्वतंत्रपणे निवडणूक लढवल्याने त्याचा मोठा फटका संयुक्त जनता दलाला बसला होता. लोकजनशक्ती पक्षाने जवळ जवळ २५ जागांवर संयुक्त जनता दलाचे नुकसान घडवून आणले होते.



अभय गोखले

राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला बहुमताचा आकडा गाठता आला नाही, याचे कारण, महाआघाडीच्या जागा वाटपात कॉंग्रेसला, क्षमतेपेक्षा जास्त जागा सोडण्यात आल्या होत्या. जागा वाटपात कॉंग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या, त्यापैकी कॉंग्रेसला फक्त १९ जागा जिंकता आल्याने, महाआघाडीला मोठा फटका बसला होता.

जर कॉंग्रेसला कमी जागा सोडण्यात आल्या असत्या तर राजदला जास्त जागा लढवता आल्या असत्या आणि निवडणुकीतील राजदचा स्ट्राईक रेट लक्षात घेता, महाआघाडीला जास्त जागा मिळाल्या असत्या आणि कदाचित महाआघाडी सत्तेवरही आली असती.

या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत, नोकरीच्या शोधात बिहार मधून होणारे स्थलांतर, बेरोजगारी, महागाई, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था परिस्थिती इत्यादी मुद्दे विरोधी पक्षांकडून मांडण्यात येतील, तर रालोआ कडून ऑपरेशन सिंदूरचा मुद्दा प्रामुख्याने मांडला जाईल.त्याशिवाय राजद प्रणित महाआघाडी सत्तेवर आल्यास बिहारमध्ये पुन्हा जंगल राज येईल अशी भीती भाजपा प्रणित रालोआकडून मतदारांना दाखवण्यात येईल.

लालुप्रसाद यादव यांनी राजदची स्थापना केल्यानंतर, निवडणुकीत यश मिळवण्यासाठी त्यांनी आपले मुस्लिम - यादव समीकरण व्यवस्थितपणे वापरले.त्या जोडीला आता तेजस्वी यादव यांनी ओबीसी आणि दलीत समाजाला काही प्रमाणात आपल्याकडे वळवल्याने राजदची स्थिती मजबूत दिसत आहे.

मात्र महाआघाडीतील कॉंग्रेसच्या कामगिरीवर महाआघाडीच्या यशाचे समीकरण अवलंबून रहाणार आहे.१९९० च्या दशकात कॉंग्रेसने लालुप्रसाद यादव यांच्या पक्षाशी युती केल्यानंतर, बिहार मध्ये कॉंग्रेसच्या घसरगुंडीला सुरूवात झाली, ती अद्याप सुरूच आहे. लालुप्रसाद यादव जेवढ्या जागा सोडतील तेवढ्या जागांवर कॉंग्रेसने समाधान मानल्याने बिहारमध्ये कॉंग्रेसची वाढ खुंटली.याखेपेस कदाचीत कॉंग्रेसला गेल्या खेपेच्या तुलनेत कमी जागांवर लढावे लागेल.

महाआघाडी आणि रालोआ यांच्याशिवाय आणखी एक फॅक्टर बिहार विधानसभा निवडणुकीत महत्वाचा असणार आहे, तो म्हणजे प्रशांत किशोर फॅक्टर. प्रशांत किशोर यांनी काही दिवसांपूर्वी जनसुराज पक्षाची स्थापना केली असून, त्यांच्या पक्षाला महिला, युवक आणि मुस्लिम समाजाकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांना विधानसभा निवडणुकीत फारसे यश मिळण्याची शक्यता नसली तरी ते महाआघाडी आणि रालोआ यांची गणीते बिघडवू शकतील.

■ ■ ■

## न्यायालयाने या बाबतीतही लक्ष घालावे!



सुधारित नियमावलीनुसार छोट्या आकाराच्या प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्ती बनवण्यावर, तसेच त्यांची व्यावसायिक विक्री करण्यावर कोणतीही बंदी नसून त्यांचे विसर्जन मात्र केवळ कृत्रिम तलावातच करावे लागेल, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

त्यामुळे पीओपी मुर्त्या बनवणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून पीओपीवरील बंदीचा निर्णय लागू केला होता. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकांनी या वर्षी पीओपीवर बंदी असल्याचे आदेश काढले होते.

त्याविरोधात मूर्तीकार संघटनेने मुंबईत बैठक घेऊन न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला होता. पीओपीवरील बंदी उठवतांना न्यायालयाने पीओपीच्या प्रत्येक मूर्तीच्या मागच्या बाजूला लाल रंगाची खूण असणे अनिवार्य आहे, अशी अट घातली आहे.

मुळात गणेश चतुर्थी हा पूर्वापार चालत आलेला धार्मिक सण आहे. या सणाशी अनेकांच्या आस्था जोडल्या गेल्या आहेत. गणेश चतुर्थीच्या दिवशी आपण घरी श्री गणेशाची केवळ मूर्ती आणत नसून त्यानिमित्ताने साक्षात गणरायच आपल्या घरी विराजमान झाले आहेत या भावाने गणेशभक्त घरी आणलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतो, तिचे मनोभावे पूजन करतो, प्रतिदिन गोडाचा नैवेद्य अर्पण करतो.

गणपती आपल्या घरी येणार याची सिद्धता एक महिना आधीपासूनच सुरु असते. गणरायाला आसनस्थ करण्यासाठी मखर कोणते बनवावे, त्याच्यासाठी दागिने कोणते आणावेत, वस्त्र, फुले कोणती आणावीत याची सिद्धता प्रत्येक जण अगदी मनापासून करत असतो. त्यामुळे हा सण आणि उत्सव प्रत्येक गणेश भक्ताच्या आस्थेशी जोडला गेलेला आहे. श्री गणेश मूर्ती घरी आणताना ती कशी आणावी, तिची प्राणप्रतिष्ठा कशी करावी, तिची नियमित पूजा कशी करावी, उत्तरपूजा करून विसर्जन कसे आणि कोठे करावे या सर्वांसंदर्भात धर्मशास्त्र काय सांगते या गोष्टीही विचारात घ्यायला हव्यात.

गणेश मूर्ती मातीची असावी कि पीओपीची, तिचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात करावे कि कृत्रिम तलावांत या सर्वांसंदर्भात शास्त्र काय सांगते हेसुद्धा विचारात घ्यायला हवे.

धर्मशास्त्रानुसार प्राणप्रतिष्ठा करून मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्तीमध्ये श्री गणेशाची पवित्रके सामावलेली असतात त्यामुळे तिचे विसर्जन वाहत्या पाण्यात करावे जेणेकरून ही पवित्रके सर्वदूर पसरतील.

मात्र न्यायालयाने पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे सक्तीचे केले आहे. शहरांसारख्या ठिकाणी मागील काही वर्षांपासून श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव बांधले जातात. या उपक्रमासाठी महापालिका साहाय्य करते. या उपक्रमात गेल्या काही वर्षांत अनेक ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे.

कृत्रिम हौदात विसर्जित केलेल्या मुर्त्यांचा वापर खाणी बुजवण्यासाठी आणि विटा तयार करण्यासाठी केला जात असल्याचेही लक्षात आले आहे. श्रद्धेने घरी आणलेल्या आणि मनोभावे पुजलेल्या श्री गणेश मूर्तींची अशा प्रकारे केली जाणारी विटंबना योग्य नाही. न्यायालयाने या बाबींकडेही लक्ष घालावे.

---

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

**वाचक लिहितात**

### सैन्याचे खच्चीकरण करू नका!

पहलगाव आतंकी हमल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले, त्या अंतर्गत ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील आतंकी ठिकाने नष्ट केले, तसेच पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हमल्यांना सुद्धा भारतीय सेनेने निष्काम केले,

यामध्ये पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, त्याचे व्हिडिओ सर्व वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित झाले. पाकिस्तान अनेक दशकांपासून भारतामध्ये आतंकवादी पाठवून निष्पाप नागरिकांचे बळी घेत आहे, आतंकवादाचा भारतासह अन्य देशांना सुद्धा त्रास आहे, या पार्श्वभूमीवर भारताने आतंकवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेतली, यापुढे आतंकवाद खपवून घेतल्या जाणार नाही, हे पाकसह जगाला दाखवून दिले.

आतंकवादाचा जगातून बिमोड व्हावा, तसेच पाक पुरस्कृत आतंकवादाचा खरा चेहरा जगासमोर यावा, आतंकवाद विरोधी या लढाईत भारताला अन्य देशाचे समर्थन मिळावे, यासाठी विदेश नीतीच्या अंतर्गत भारताने सर्व दलीय प्रतिनिधी मंडळ पहिल्यांदाच विदेश दौऱ्यावर पाठवले, मात्र विरोधी पक्ष आपली राजकीय पोळी भाजण्यात व्यस्त आहे, पहलगाम हल्ल्याच्या प्रत्यूत्तरात भारताने केलेल्या कारवाईमध्ये भारताचे किती नुकसान झाले, याची माहिती घेण्यामध्ये विरोधकांना रस आहे, अशी माहिती विचारणे म्हणजे भारतीय लष्करावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय, यामुळे सैनिकांचे खच्चीकरण होऊ शकते, खरे तर भारतीय सैनिकांमुळे आज आपण शांत झोपू शकतो.

आज युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वांनी देशहितासाठी एकत्र येऊन सैन्याचे मनोबल वाढवण्याची आवश्यकता आहे, मात्र काही विरोधी पक्ष आपले राजकीय डावपेच खेळत आहे, अशा लोकांपासून जनतेने सावध राहावे, राजकीय पक्षांनी देशहितासाठी राजकारण जरूर करावे, मात्र सैनिकांचे खच्चीकरण होणार, असे गढूळ राजकारण करू नये, असे जनतेला वाटते, कारण भारतीय लष्कर प्रमुखांनी सुद्धा म्हटले आहे की, जेव्हा युद्ध होत असते, तेव्हा नुकसान दोन्ही देशांचे असते.

■ **दत्तात्रय फोकमारे**
**यवतमाळ. 7447797335**

### भक्तांची वारी आनंदित करण्यासाठी उपाययोजना असाव्यात!

वारी ही केवळ वारकऱ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी श्रद्धेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वारकरी भक्त मंडळी पारंपरिक दिंडीच्या माध्यमातून निरपेक्षपणे पायी वारी करतात. धार्मिक श्रद्धा, शिस्तबद्धता आणि भक्तिभावाने पार पडणा?या या वारीत हजारो भाविक सहभागी होतात. हा आध्यात्मिक सोहळा अनुभवण्यासाठी वारीच्या मार्गावर अनेक श्रद्धाळू दर्शनाच्या प्रतीक्षेत असतात.

अशा वेळी अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी उद्भवते. काही भागांमध्ये वारकऱ्यांना नैसर्गिक बदल आणि इतर अडचणींना सामोरे जावे लागते. हे टाळण्यासाठी रस्त्यांवर पादचारी उड्डाणपूल (स्कायवॉक) उभारण्यात यावा, पालखी तळांवरील विद्युत रोहित्र संरक्षित करण्यात यावेत, तसेच शौचालयांसाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था असावी. पिण्याचे शुद्ध पाणी, विद्युत सुविधा आणि निवाऱ्याची योग्य व्यवस्था या सर्व सुविधा पालखी सोहळ्याच्या मुक्काम काळात वारकऱ्यांना मिळाव्यात.

या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी लोणंद (जि. सातारा) येथील प्रशासनाला वरील सूचना सादर केल्या. मात्र या उपाययोजना केवळ लोणंदपुरत्याच मर्यादित न राहता संपूर्ण पालखी मार्गावर राबविल्या जाव्यात, ही सर्व विठ्ठल भक्तांची अपेक्षा आहे.

वरील उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास वारकऱ्यांचा वारी अनुभव अधिक आनंददायी आणि सुसज्ज होईल. वारकरी आपली साधना म्हणून कोणतीही तक्रार न करता सगळी परिस्थिती आनंदाने स्वीकारतात. मात्र, त्यांना सुविधा पुरविल्यास स्थानिक जनता आणि प्रशासनासाठीही ती एक साधनाच ठरेल.

■ **हृषीकेश हरदास**
**वर्धा.**



## फूड ॲलर्जी आहे की नाही कसे ओळखावे?

आपल्यापैकी अनेकांना धुळीची, धुराची, तसेच पदार्थांची ॲलर्जी होत असते. त्यात असे अनेकजण आहेत जे वेगवेगळे खाद्यपदार्थ खाण्याचे शौकीन आहेत. अशातच काही लोकांना प्रत्येक अन्नपदार्थ खायला आवडत नाही, कारण त्यांना विशिष्ट पदार्थांची ॲलर्जी असते. याला फूड ॲलर्जी म्हणतात.

अनेकांना हे माहित नसते आपण खालेल्या कोणत्या पदार्थांमुळे आपल्या ॲलर्जी होत असते. तर ॲलर्जीची लक्षणे सहसा खाल्ल्यानंतर काही मिनिटांपासून ते दोन तासांत दिसून येतात, परंतु लोकं त्याला आजार मानतात आणि त्यानुसार डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेत असतात.

ॲलर्जी कोणत्याही वयात होऊ शकते. म्हणजे एखाद्या बाळा जन्मतः ॲलर्जी होते. अनेक प्रकरणांमध्ये, लोकांना वर्षानुवर्षे माहित नसते की त्यांना विशिष्ट प्रकारच्या अन्नाची ?लर्जी आहे. याला सायलेंट ॲलर्जी म्हणतात. कारण या सायलेंट ॲलर्जीमध्ये तुम्हाला लक्षणे खूप उशिरा दिसून येतात, परंतु जर काही खाल्ल्यानंतर तुम्हाला पोटात गॅस, अपचन, चेहऱ्यावर मुरुम यासारखी लक्षणे दिसली तर ही त्या अन्नाच्या ॲलर्जीची लक्षणे आहेत. हे लक्षात ठेऊन तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. त्यानुसार उपचार करावे.

जर काही खाल्ल्यानंतर काही तासांत त्वचेवर खाज सुटणे किंवा अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी, चेहरा, ओठ, जीभ किंवा घसा सूज येणे, पोटदुखी, उलट्या किंवा जुलाब, चक्कर येणे अशी लक्षणे दिसली तर ती अन्नाची ॲलर्जी असू शकते. ते ओळखण्यासाठी तुम्ही काही चाचण्या करू शकता.

यासाठी स्किन प्रिक टेस्ट केली जाते. यामध्ये तुम्हाल नेमक्या कोणत्या पदार्थांच्या सेवनाने ॲलर्जीची समस्या होत आहे हे समजण्यासाठी अन्नपदार्थाची थोडीशी मात्रा शरीराच्या कोणत्याही भागावर लावली जाते आणि त्वचेला हलकेच टोचले जाते.

जर तिथे सूज किंवा लालसरपणा असेल तर ते ॲलर्जीचे लक्षण असू शकते. याशिवाय, रक्त तपासणी केली जाते. यामध्ये, इम्युनोग्लोबुलिन ई (आयजीई) अँटीबॉडीचे प्रमाण मोजले जाते, जे ॲलर्जीची प्रतिक्रिया दर्शवते.

फुड ॲलर्जीवर उपचार घेण्यासाठी तुम्ही ॲलर्जिस्ट आणि आहारतज्ञ दोघांचाही सल्ला घ्यावा. हे डॉक्टर ॲलर्जी ओळखतील आणि समस्येनुसार तुमच्यासाठी आहार चार्ट देखील तयार करतील.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### वट पोर्णिमा महत्व

कुटूंबांचा आधारस्तंभ
वट पोर्णिमा सण
एकमेकांशी एकनिष्ठ
राहण्याच्या संस्काराची
देतो आम्हा शिकवण..

भारतीय संस्कृतीत
नैतिकतेला अधिष्ठान
भोगवादी प्रवृत्तीला
नसते मुळी प्राधान्य..

विश्वास सामंजस्य
समर्पणाचे जिथे जुळते
सुख शांती समाधान
त्या कुटूंबात सदैव नांदते!

# लाईफस्टाईल नवीन मोहिमेद्वारा तमन्ना भाटियास सहभागी करून सर्वात मोठ्या विक्रीची घोषणा

**नागपूर, १० जून :** लाईफस्टाईल, भारतातील आघाडीच्या फॅशन डेस्टिनेशनपैकी एक असलेला लाईफस्टाईल, त्यांचा अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असणारा एंड ऑफ सीझन सेल (EOSS) सादर करत आहे, जे ग्राहकांना फॅशन-फॉरवर्ड उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवर ५०% पर्यंतची सूट देत आहे. याव्यतिरिक्त, एचडीएफसी क्रेडिट कार्ड धारकांसाठी एक विशेष ऑफर असून यात त्यांना त्वरित १०%* ची सूट मिळते. * अटी व शर्ती लागू.

या सीझनमध्ये आणखी उत्तेजनापूर्ण बनवत, लाईफस्टाईल ने या मोहिमेसाठी विशेषतः तमन्ना भाटियासोबत भागीदारी केली आहे. सहज नैसर्गिक आकर्षण व मोहक गुण संपूर्ण भारताला ओळखली जाणारी, तमन्ना नवीन मोहिमेत ग्लॅमर आणि तिची व्यक्तिमत्त्वाशी समरसता असलेली अद्वितीय मिश्रण घेऊन येते. अग्रगण्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्समधील नवीनतम ट्रेंड आणि फॅशन पर्यायांच्या विस्तृत निवडीसह, हा लाईफस्टाईल सेल फॅशन बद्दल चोखंदळ असणाऱ्या ग्राहकांना अतुलनीय किंमतीत विस्तृत श्रेणीत वस्त्रांचा संग्रह देऊ करते.

या सीझनच्या संग्रहात, उन्हाळ्यासाठी ताज्या व सुसज्ज असलेल्या डिझाईन्स आणि अभिजात वस्तूंचा मिलाप केला आहे, जे प्रीमियम स्टाइल किंवा दैनंदिन फॅशन शोधणाऱ्या प्रत्येक खरेदीदारासाठी काहीतरी नक्कीच देऊ करते. ही विक्री आणखी समयोचित बनवणारी गोष्ट म्हणजे अधिक सहजपणे उपलब्ध असणारी अशी ही लाईफस्टाईल प्रीमियम व उच्च-फॅशन उत्पादने जी फॅशन जगात बदल घडवत आहेत आणि मूल्य व शैली एकत्र आणणारे स्थान निर्माण करत आहे.



इतकेच नाही तर, तमन्ना भाटियाचा नवीम जाहिरात चित्रपट हा लाईफस्टाईलच्या काही आवडत्या ब्रँड्सच्या रूपाचा एक चैतन्यशील, उच्च दर्जाचा शोकेस आहे. ही संकल्पना तिच्या वैविध्यपूर्ण प्रतिभेवर प्रकाश टाकते - मग तो एक आकर्षक काळ्या रंगाचा पोशाख असो किंवा सणासुदीची पारंपारिक वेशभूषा असो, तमन्ना सहजतेने प्रत्येक रूप सहजतेने अंगिकारते. हा चित्रपट सीझनचा उत्साह टिपतो, भविष्यातील फॅशनचे कल आणि तिचे अनन्य वैशिष्ट्यपूर्ण आकर्षण यांचा मिलाप करतो.

लाईफस्टाईल प्रवक्त्याचे वक्तव्य - आमची मोहीम लाईफस्टाईलच्या एंड ऑफ सीझन सेलद्वारे ग्राहकांना नवीनतम फॅशन ट्रेंडचा शोध घेण्यास आमंत्रित करते. स्टाइल आणि सुलभतेचा मिलाप घडवणाऱ्या संग्रहाद्वारे, तमन्ना मोहिम सजीव बनवते व प्रत्येकाला आपली वैयक्तिक अनोखी शैली आत्मविश्वासाने व्यक्त करण्यास प्रेरित करते. रितेश मिश्रा - अध्यक्ष - उप-सीईओ.

भारतीय अभिनेत्री तमन्ना भाटिया म्हणाली, माझा विश्वास आहे की फॅशन म्हणजे फक्त ट्रेंडच नाही तर तुम्ही कोण आहात हे व्यक्त करणे आहे. लाईफस्टाईलच्या सेलमध्ये मला आवडणार वैशिष्ट्ये म्हणजे ती प्रत्येकासाठी प्रीमियम, ऑन-ट्रेंड फॅशन सुलभ करते तसेच लोकांना आत्मविश्वासाने त्यांचे व्यक्तिमत्व स्वीकारण्यास सक्षम करते.

लाईफस्टाईलचा हा सेल ट्रेंडसेटरना ३०० हून अधिक टॉप ब्रँड्समधील नवीनतम फॅशन्स खरेदी करण्याची एक उत्तम संधी देते - ज्यात बीबा, ग्लोबल देसी, जॅक अँड जोन्स, इंडियन टेरेन, पार्क अव्हेन्यू, पेपे जीन्स, AND, मेलेंज, जिंजर, FORCA, CODE, प्यूमा, अँडिडास, फॉसिल, अरमानी एक्सचेंज, मेबेलाइन, लॉरियाल आणि बरेच काही समाविष्ट आहेत.

ग्राहक या सीझनमध्ये आवश्यक असलेले कपडे, सौंदर्य प्रसाधने, घड्याळे, सुगंध, पादत्राणे, हँडबॅग्ज आणि अ‍ॅक्सेसरीज हे सर्व काही आकर्षक किमतीत निवडू शकतात.

# प्रीमियमायझेशन आणि टेक अपग्रेड्समुळे नागपूरमध्ये ॲमेझॉन इंडियाची तिच्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स श्रेणीमध्ये झाली वाढ

**नागपूर, १० जून :** नागपुरमधील ग्राहक प्रीमियम तंत्रज्ञानाला मोठ्या प्रमाणात पसंती दर्शवत आहेत, ज्यामुळे कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि अप्लायंसेस यांसाठी उच्च वाढीचा विभाग म्हणून हे शहर लवकरच ओळखले जाणार आहे. अत्याधुनिक स्मार्टफोन आणि स्मार्ट उपकरणांपासून ते इमर्सिव्ह मनोरंजन उत्पादने आणि मोठ्या घरगुती उपकरणांपर्यंत, खरेदीदार वैशिष्ट्यपूर्ण, उच्च-कार्यक्षमता असलेल्या उपायांची निवड वाढत्या प्रमाणात करत आहेत.

ॲमेझॉन इंडियाच्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्सच्या संचालक झेबा खान म्हणाल्या, भारत आता केवळ तंत्रज्ञानाचा अवलंबच करत नाही आहे, तर तो स्वतःच्या तत्वांवर - स्मार्ट, वेगवान, अधिक वैयक्तिक आणि महत्त्वाचे म्हणजे अधिक परवडणाऱ्या - तंत्रज्ञानाची मागणी करत आहे.




Amazon.in वर, आम्ही हे परिवर्तन प्रत्यक्ष पाहत आहोत, ग्राहक दैनंदिन जीवन सुधारणाऱ्या उत्पादनांकडे अपग्रेड करत आहेत. या बदलामुळे वाढती आशा आणि गुणवत्ता तसेच नवकल्पकता आणि कनेक्टिव्हिटी यांची भरपूर पसंती असल्याचे दिसून येते. विस्तृत निवड, उत्तम मूल्य आणि विश्वासार्ह सेवांद्वारे ग्राहकांना आत्मविश्वासाने खरेदी करण्यास मदत करणाऱ्या या उत्पादनांना उपलब्ध करून देणे यावर आमचा भर आहे.

नागपूर शहर संपूर्ण भारतात तंत्रज्ञानाच्या वापरासाठी एक गती निर्माण करत आहे. स्मार्टफोन विक्रीत दुहेरी अंकी वाढ झाली आहे, या विभागात १.६ पट वाढ झाली आहे आणि ३०,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीची विक्री झाली आहे. नागपूरमध्ये मोठ्या उपकरणांच्या विक्रीत १.५ पट वाढ झाली आहे, ज्यामध्ये ग्राहकांची प्रीमियम कूलिंग आणि स्टोरेज सोल्यूशन यांना पसंती असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. २-टन एसी, डबल-डोअर रेफ्रिजरेटर आणि उच्च-क्षमतेच्या वॉशिंग मशीनच्या मागणीमुळे रेफ्रिजरेटरची १.६५ पट वाढ नोंदवली गेली आणि एअर कंडिशनर्सची १.४ पट वाढ नोंदवली गेली.

# आयुश आर्ट अँड बुलियनची महसूल व नफ्यामध्ये लक्षणिय वाढ

## १.८१ कोटी रुपयांचा कंपनीला निव्वळ नफा

**नागपूर, १० जून :** आयुश आर्ट अँड बुलियन लि. ही पूर्वीची एकेएम क्रिएशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या २०२५ च्या अर्ध वार्षिक आणि २०२५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणाचे एकत्रित वित्तीय निकाल घोषित केले आहेत. कंपनीने महसूल आणि नफ्यामध्ये लक्षणिय वाढ नोंदवली आहे. हे कंपनीचे शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन आणि वाढीकडे लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन प्रतिबिंबित करते.

दरम्यान, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीने कामकाजामधून ७३.७७ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला असून २०२४ मध्ये ७.३३ कोटी रुपयांच्या नोंदवलेल्या रकमेच्या तुलनेत प्रती वर्ष १० पट वाढ आहे. तर कंपनीला २०२४ या वर्षाच्या २६ लाख रुपयांच्या निव्वळ नफ्याच्या तुलनेत १.८१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. म्हणजेच प्रती वर्ष जवळपास ७०० टक्क्यांची वाढ आहे. वित्तीय वर्ष २४ मधील ०.२१ रुपयांच्या तुलनेत प्रति शेअर (ईपीएस) १.८१ रुपयांची कमाई नोंदविली गेली. गेल्या वर्षात विक्री सीएजीआरने १०४ आणि ६२ टक्केच्या निव्वळ नफ्यात गेल्या पाच वर्षात मजबूत वाढीसह कंपनी कर्जमुक्त झाली आहे. मार्च २०२५ पर्यंतच्या प्रमोटर ग्रुपचे प्रमाण २०.७१% (३१.७० लाख शेअर्स) आहे.

आयुश आर्ट अँड बुलियन लि. या कंपनीच्या व्यवस्थापनाने म्हटले आहे की, आर्थिक वर्ष म्हणजे आयुश आर्ट आणि बुलियन लि.साठी एक परिवर्तनात्मक वर्ष आहे, मजबूत महसूल वाढ आणि नफ्यात महत्त्वपूर्ण सुधारणा झाली आहे. ही कामगिरी आमच्या सामरिक उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीचा, आमच्या समर्पित कार्यसंघाच्या दीर्घकालीनतेची अंमलबजावणी करीत आहे. आमच्या भागधारकांसाठी वाढ आणि नाविन्याचा प्रवास सुरू ठेवत आहे.

३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या अर्ध्या वर्षासाठी (१ ऑक्टोबर, २०२४- १ मार्च, २०२५) कंपनीने एकूण उत्पन्न ४७.१९ कोटी रुपये नोंदवले. तर २०२५ (एप्रिल १, २०२४-सप्टेंबर २०२४) मध्ये २६.५८ कोटी रुपये होते. ही वाढ प्रती वर्ष ७७ टक्के होती. २०२५ या दोन अर्ध वार्षिक वर्षातील निव्वळ नफा १.५६ कोटी रुपये नोंदवला गेला. हाच नफा २०२५ घ्या पहिल्या अर्ध वर्षात २४लाख रुपये होता. ईपीएस २०२५ साठी अर्ध वर्षात ०.१७ च्या तुलनेत २०२५ च्या दोन अर्ध वार्षिक वर्षात ईपीएस १.०२ रुपये नोंदवला गेला आहे.

आयुश आर्ट अँड बुलियन लि.ची २००९ मध्ये स्थापना झाली. ज्याला पूर्वी एकेएम क्रिएशन्स लि. म्हणून ओळखले जाते, ही बुलियन ट्रेडिंग अँड आर्ट विभागांमध्ये कार्यरत सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे. स्थिर, वाढ-केंद्रित भविष्य तयार करण्यासाठी कंपनी आपल्या नवीन व्यवसायाच्या दिशेने फायदा घेत आहे.

# पॉलिसीबझारसोबत भागीदारी करून एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर

**नागपूर, १० जून :** स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाईफ) ने पॉलिसीबझारसोबत भागीदारी करून एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर केला आहे. हा एक नवीन, उच्च-संभाव्यता संपन्न इक्विटी फंड असून तो त्यांच्या युलिप पेन्शन प्रॉडक्ट एसयूडी लाइफ पेन्शन प्लस साठी डिझाइन करण्यात आला आहे. हा नाविन्यपूर्ण फंड ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी एक धोरणात्मक मार्ग देऊन सक्षम करण्यासाठी सज्ज आहे, ज्याचा उद्देश त्यांच्या निवृत्ती बचतीला लक्षणीयरीत्या बळकटी देणे आणि अधिक लवचिक आर्थिक भविष्य घडविण्यास मदत करणारे उत्कृष्ट परतावे देणे आहे.

एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड, टॉप ३०० कंपन्यांमधून निवडलेल्या ५० उच्च-प्रदर्शन करणाऱ्या स्टॉक्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवर केंद्रित दृष्टिकोन करतो. हा फंड वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, भांडवली वस्तू आणि पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, तंत्रज्ञान, तेल, धातू व खाणकाम, ऑटोमोबाईल्स व त्यांच्या सहाय्यक वस्तू आणि बांधकाम व रिअल्टी यांसारख्या महत्त्वाच्या आणि जलद वाढणाऱ्या क्षेत्रांमध्ये रणनीतीनुसार विविधता आणतो.



बाजारातील सतत बदलणाऱ्या संधींशी सुसंगत राहण्यासाठी, या फंडाचा पोर्टफोलिओ प्रत्येक तिमाहीत धोरणात्मक पद्धतीने नव्याने समायोजित केला जातो, जेणेकरून त्याची उपयुक्तता आणि कामगिरी कायम राहते.

लाँचविषयी बोलताना स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अभय तिवारी म्हणाले, एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंडद्वारे आम्ही आमच्या ग्राहकांसाठी एक रणनीतिक मालमत्ता सादर करत आहोत. दीर्घकालीन निवृत्ती नियोजनासाठी खास डिझाइन केलेल्या उच्च-कार्यक्षमता गुंतवणूक पर्यायांची आम्ही वचनबद्धतेने आखणी करतो, आणि हा फंड त्याचाच स्पष्ट प्रतिबिंब आहे. आम्हाला विश्वास आहे की हा फंड आमच्या ग्राहकांना त्यांच्या आर्थिक भविष्याला अधिक मजबूत करण्यासाठी एक प्रभावी साधन ठरेल.

पॉलिसीबझारचे लाइफ इन्शुरन्स विभागाचे चीफ बिझनेस ऑफिसर विवेक जैन म्हणाले, भारतात निवृत्ती नियोजन हे अनेकदा सावध बचती आणि बाजार-संलग्न वाढीच्या अपेक्षांमधील संतुलन म्हणून पाहिले जाते. बदलत्या आकांक्षा आणि आर्थिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, आता अधिक स्मार्ट आणि गतिशील उपाययोजनांची गरज वाढत आहे. ही गरज ओळखूनच, पॉलिसीबझारने एसयूडी लाइफसोबत भागीदारी करत एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स पेन्शन फंड सादर केला आहे हा त्यांच्या युलीप पेन्शन प्रॉडक्ट 'एसयूडी लाइफ पेन्शन प्लस' साठी डिझाइन केलेला उच्च संभाव्यता असलेला इक्विटी फंड आहे. हा भारताच्या उच्च-वाढीच्या क्षेत्रांचा लाभ घेण्यासाठी डिझाइन केलेला आणि दीर्घकालीन स्थिरतेला प्राधान्य देणारा आपल्या प्रकारातील पहिलाच इक्विटी फंड आहे. आम्ही ग्राहकांना असा निवृत्ती निधी उभारण्यासाठी सक्षम करत आहोत, जो केवळ सुरक्षितच नसेल तर भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत देखील असेल.

# आकर्षक किंमत आणि सुबक डिझाईन्ससह पीएनजी ज्वेलर्स सादर करीत आहेत नवा हिरेजडित हार

**नागपूर, १० जून :** महाराष्ट्रातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्स यांनी त्यांच्या नवीन डायमंड ज्वेलरी मोहिमेअंतर्गत एक अत्याधुनिक आणि सौंदर्यपूर्ण नैसर्गिक हिरेजडित हार सादर केला आहे. या हाराची किंमत फक्त रुपये २,२५,०००/- असून त्यामध्ये आधुनिकतेची झलक आणि कलात्मक कारागिरीचा उत्तम मिलाप असून कुशल कारागिरांच्या कारागिरीतून हा हार साकार झाला आहेत.



पिवळ्या आणि गुलाबी सोन्यात उपलब्ध असलेला हा हार फुलांच्या प्रेरणेतून तयार झालेला असून त्यात पारंपरिक सौंदर्य आणि आधुनिक डिझाइन यांचे सुंदर मिश्रण आढळते. कमी सोन्याचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या डिझाइनमुळे हाराचे वजन हलके असून त्यात वापरलेले हिरे अधिक उठून दिसतात, जे प्रत्येक प्रसंगासाठी योग्य आणि स्टायलिश पर्याय ठरतात.


नैसर्गिक हिऱ्यांची मूळची चमक यात जपली गेली असून त्याला सुसंगत खास अशी या दागिन्यांची रचना करण्यात आली आहे, जी प्रत्येक प्रसंगासाठी तसेच कार्यालयीन वापरासाठी, प्रियजनांना भेट देण्यासाठी उपयोगी ठरेल. तसेच आपल्या वैयक्तिक दागिन्यांच्या संग्रहातही यामुळे अनोखी भर पडेल.

ग्राहकांच्या मागणीनुसार पीएनजी ज्वेलर्सने परवडणाऱ्या किंमतीत हिरेजडित दागिन्यांची ही नवी श्रेणी पुन्हा सादर केली आहे, याद्वारे स्टाईल आणि दर्जामध्ये कोणतीही तडजोड न करता ग्राहकांना निवड करणे सोयीचे होईल. ही खास ऑफर २ जून ते ३० जून २०२५ दरम्यान पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे.

# पडद्यावरील पित्याचा प्रत्यक्षात पितृत्वाचा अनुभव: सोनी सबवरील कलाकार फादर्स डेच्या निमित्ताने साजरे करत आहेत पितृत्व

**मुंबई, १० जून :** फादर्स डे चे औचित्य साधून सोनी सबवरील कलाकार पितृत्वाविषयी त्यांचे व्यक्तिगत अनुभव आणि विचार शेअर करत आहेत- पित्याची भूमिका जितकी सार्थकता देणारी असते, तितकीच आव्हानात्मक देखील असते. अभिनेता जयेश मोरे, सुमित राघवन, आरव चौधरी आणि जयेश भारभाया सांगत आहेत पितृत्वासोबत त्यांना मिळालेला आनंद, जबाबदाऱ्या आणि धडा! त्यांच्या मुलांशी असलेले त्यांचे नाते कसे खास आहे, त्यांच्यात कोणती मूल्ये रुजवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो आणि पितृत्वामुळे पडद्यावर आणि पडद्याच्या मागे त्यांचा दृष्टिकोन कसा बदलला याविषयी हे कलाकार मोकळेपणाने बोलत आहेत.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, मी जर कामात नसेन, तर फादर्स डे मी घरी माझ्या मुलांसोबत साजरा करतो. मला वाटते की मी एक सक्रिय पिता आहे- घरी आणि पडद्यावरील माझ्या सखी आणि अथर्व या मुलांसाठी देखील. माझ्या आयुष्यात माझ्या वडिलांशी माझे घट्ट नाते आहे. माझ्यासाठी ते माझे सुपरहीरो आहेत. मला माहीत आहे, असे सांगणारा मी काही पहिला मुलगा नाही! पण ते खरोखर एक नायक आहेत, ज्यांनी माझे व्यक्तिमत्व घडवले आहे. माझ्या चाहत्यांना मी हेच सांगेन की, आपल्या माता-पित्याचा नेहमी आदर करा कारण ते आपले गुरु असतात. आपण त्यांना प्रेम दिले पाहिजे आणि त्यांची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे.




वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा आरव चौधरी म्हणतो, माझ्या मते, पितृत्व ही पुरुषाला मिळालेली सर्वात दमदार आणि विनम्र करणारी भूमिका आहे. पितृत्व म्हणजे केवळ संरक्षण आणि पोषण नाही, तर सचोटी, संयम आणि सहानुभूतीने एखादे आयुष्य घडवणे. मला वाटते पित्याने स्वतःचे उदाहरण देऊन मुलाला मार्गदर्शन करायचे असते. आपल्या कृतीमधून धैर्य दाखवून द्यायचे असते. आणि हे देखील शिकवायचे असते की, खरी ताकद ही दया आणि मूक लवचिकतेत असते. आपली मूल्ये आणि निवडी यामधून आपण जो वारसा पुढे नेतो, तोच आपल्या मुलांमध्ये रुजतो. हनुमानाचा पिता केसरीची भूमिका करताना मी अभिमान अनुभवतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बापोद्राची भूमिका करणारा जयेश भारभाया म्हणतो, बापोद्रा म्हणून मी जरा भडक आणि हेकट असलो तरी माझी मुलगी प्रार्थना हिच्या बाबतीत मात्र माझ्यातला हळुवारपणा दिसून येतो. पडद्यावरच्या आमच्या नात्यात प्रेम, काळजी आणि एक मूक समजूतदारपणा आहे. हे खास होण्याचे कारण म्हणजे पडद्याच्या मागे देखील आमचे नाते असेच आहे. शूटिंग करताना आमच्यात एक आपलेपणा आणि मोकळेपणा असतो. मला ती खरोखर माझी मुलगी असल्यासारखीच वाटते. या फादर्स डे च्या निमित्ताने मी माझी ही भावना व्यक्त करू इच्छितो की मला या गोष्टीचा आनंद वाटतो की, मला या मालिकेत अशा एका पित्याची भूमिका करण्याची संधी मिळाली आहे, ज्याच्यात वेगवेगळे स्तर आहेत. त्याचा एक भावनिक प्रवास आहे आणि पडद्यावर आणि पडद्याच्या मागे देखील मला पितृत्व अनुभवण्याची संधी ही भूमिका देते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा जयेश मोरे म्हणतो, या मालिकेत सुरुवातीला माझी व्यक्तिरेखा चांगल्या पित्याची नव्हती. पण जेव्हा त्याला आपली मुले अश्विन, चिराग आणि दीप्ती यांना आधार देण्याचे महत्त्व उमगले, त्यानंतर त्याच्या स्वभावात परिवर्तन आले. सुरुवातीला दिलीपमध्ये नकारात्मक छटा होत्या पण आज तो त्याच्या कुटुंबाचा खंबीर आधार बनला आहे. या फादर्स डे च्या निमित्ताने, मला दिलीपचा सगळा प्रवास आठवला. पडद्याच्या मागे देखील या सगळ्या कलाकारांशी माझे छान नाते आहे. खास करून देशना, जी माझी सगळ्यात धाकटी मुलगी आहे, तिच्याशी माझे अधिक घट्ट नाते आहे. बऱ्याचदा ती परीक्षेच्या वेळी देखील माझे मार्गदर्शन घेते. खरोखर या सेटवर मी दुसरे कुटुंब मिळवले आहे, असे मला वाटते.

# शब्दकोडे क्रमांक २१३४




आडवे शब्द :-
१) मर्कट
३) व्यायाम
६) नावात केलेला बदल
११) मागणी, विनंती
१२) तालु क्याचे वसुलीचे काम
१४) विधानसभा, लोकसभा येथील लोकप्रतिनिधी
१८) रात्र
१९) वडाचे झाड
२०) पगार
२१) छोटी विश्रांती
२३) शपथ
२४) पटल
२६) घरोघर
२८) वर-वधुची मिरवणूक
३०) सूर्य
३२) उंट हाकणारा
३४) दीपोत्सव
३६) सौंदर्य
३८) गढूळ (प्रा. म.)
४०) पायाच्या तळव्याचा एक भाग
४१) नवरा मुलगा
४३) एक प्रकारचे लोकरीचे कापड
४५) वर्ण
४७) प्रेत
४९) किराणा व्यापारी
५०) खरडून काढलेला भाग
५१) आप्तजन
५३) वाळा
५४) मोठा हातोडा
५५) चरबी
५७) चमक, मुरगळा
६०) चक्कर, मूर्च्छा, भोवळ
६१) आल्याच्या रसाची वडी
६३) पाप
६४) परतफेड
६६) भला, छान
६७) सैन्याला मालपुरवठा
६९) सुसर
७०) गोव्याची राजधानी
७२) सत्ता, अधिकार, कैफ
७३) पवित्र
७४) कारस्थान
७६) जन्मदाता
७८) पुष्पगुच्छ
७९) कळलाव्या मुनी
८०) कर्णेंद्रिय
८१) धातूची तार काढणारा
८२) शंभर
८३) रक्षण करणारा

उभे शब्द :-
२) लेखणी
४) प्राणी आणि विदुषक यांचा खेळ
५) सिद्ध
६) विविध
७) लोकनाट्य
८) दारूचा एक प्रकार
९) कडक व चिवट
१०) हिंदुस्थान
१३) त्वरित
१४) संगीतातील तान
१५) वैरी, खटला दाखल करणारा
१६) घराणे, कुल
१७) वडिलांचे आई-वडील (हिं )
१८) आश्रय, थारा
२२) छाया
२५) होळीच्या सणातील हडळीचे सोंग
२७) धपाटा, चापट
२९) मोठा डेरेदार वृक्ष
३१) आर्जव, विनंती
३३) चावट
३५) धाक, जरब
३७) पंख
३८) अफूचे बी
३९) अव्याहत, सतत
४१) देवाशी केलेला करार
४२) देवघेव
४४) लाडात वाढलेला
४६) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
४८) लेख लिहिणारा
५२) चुकीचे(हिं )
५६) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५८) छोटी लढाई
५९) चानी
६१) झुकझुकगाडी
६२) मनोरंजन
६३) पाय, चरण
६४) घागरा
६५) संतापी
६८) मनाला टोचणारे दुःख
७१) आयुष्य
७३) पळस
७५) पालव
७६) बारा महिन्याचा काळ
७७) वेल
७९) श्वसनेंद्रिय
८०) कावळा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# युरेका फोर्बज् तर्फे स्वच्छ, आरोग्यदायी भारतासाठी श्रद्धा कपूरची ब्रँड ॲम्बेसडर म्हणून नियुक्ती

**नागपूर, १० जून :** आरोग्य आणि स्वच्छता उद्योगातील भारतातील आघाडीची कंपनी युरेका फोर्बज लिमिटेडने त्यांच्या प्रतिष्ठेच्या व्हॅक्युम क्लिनर्सच्या श्रेणीसाठी अभिनेत्री श्रद्धा कपूरला ब्रँड ॲम्बेसडर म्हणून घोषित केले आहे. चार दशकांहून अधिक काळ लाखो भारतीय घरांमध्ये विश्वासार्हतेने सेवा देणाऱ्या या कॅटेगरी लीडरच्या या सहयोगामुळे युरेका फोर्बज्च्या स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी घेतलेल्या वचनबद्धतेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे.




व्हॅक्युम क्लिनिंगच्या क्षेत्रात बाजारपेठेतील अग्रणी आणि चार दशकांहून अधिक काळ जपलेल्या परंपरेसह युरेका फोर्बज्ने भारतीय घरांमध्ये नेहमीच अत्याधुनिक गृह स्वच्छता तंत्रज्ञान आणले असून त्याला अतुलनीय सर्व्हिस नेटवर्कचा आधार आहे. नवीन फोर्बज ज्स्मार्ट क्लिन रोबोटिक व्हॅक्युम क्लिनर्स शक्तिशाली सक्शन आणि वेट मॉपिंग यांचे एकत्रीकरण करून सहजतेने फरशी चकाचक करतात. AI आणि नेक्स्ट-जेन LiDAR तंत्रज्ञानाद्वारेही स्मार्टउपकरणे अचूकता, बुद्धिमत्ता आणि अतुलनीय सुविधा पुरवितात. श्रद्धा कपूरसोबत भागीदारी करताना युरेका फोर्बज्चे उद्दिष्ट आजच्या तरुण, शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे आहे. ते स्मार्ट आणि आरोग्यदायी जीवन शैलीला महत्त्व देतात. या भागीदारीद्वारे युरेका फोर्बज घरांना स्वच्छ आणि आरोग्यदायी उपाय सुविधांनी सक्षम करणे हे आपले ध्येय अधिक बळकट करत आहे.


## आज का अंदाज

बुधवार ११ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ६७९ | १६८ | १७८ | २३४ | १६६ | २६६ | १७७ | ११६ |
| ११० | २३० | ३५८ | ४५० | २२९ | ६९९ | ७८० | ४७७ |
| २०० | ३४८ | २७७ | ३६० | ३०० | ११२ | ३३९ | ५६७ |
| २४ | ५४ | ६३ | ९१ | ३२ | ४२ | ५७ | ८१ |
| २७ | ५७ | ६४ | ९३ | ३६ | ४६ | ५९ | ८७ |
| २० | ५० | ६८ | ९८ | ३० | ४० | ५१ | ८९ |

**११ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४६ | ७६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष:** आजचा दिवस पुन्हा एकदा लक्ष केंद्रित करण्यासाठी आहे. तुमच्यासाठी सर्वात महत्त्वाचे काय आहे, याची यादी करा आणि त्यावर काम करा. यामुळे तुम्हाला योग्य दिशा मिळेल.

**वृषभ :** आज मकर राशीच्या व्यक्तींनी भूतकाळात झालेल्या गोष्टींवर विचार करण्याऐवजी भविष्यात तुमच्यासाठी काय संधी आहेत, यावर लक्ष केंद्रित करा. कामाचा ताण आणि चिंता करणे टाळा.

**मिथुन :** शांतता आणि संयमाने वागल्यास अनेक समस्या आपोआप सुटतील. तूळ राशीच्या व्यक्तींनी आज आपण ठरवलेल्या सर्व गोष्टी वेळेवर पूर्ण होत नाहीत. त्यामुळे निराश होऊ नका.

**कर्क :** आज एखाद्या कामात अपयश किंवा अनपेक्षित अडथळा येऊ शकतो, पण त्यामुळे खचून जाऊ नका. लक्षात ठेवा, जेव्हा एक दरवाजा बंद होतो, तेव्हा दुसरा नक्कीच उघडतो.

**सिंह :** सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास येणाजया प्रत्येक संधीचे सोने कराल. तुमच्या आयुष्यात येणाजया चांगल्या गोष्टींसाठी आणि नवीन संधींसाठी कायमच तयार राहा. तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा.

**कन्या :** आज तुमची नेतृत्व करण्याची क्षमता दिसून येईल. दैनंदिन धावपळीतून थोडा वेळ काढून तुमच्या दीर्घकालीन ध्येयांचा विचार करा. तुम्ही योग्य मार्गावर आहात की नाही, हे तपासा.

**तुळ :** प्रत्येकमजण आपल्या अपेक्षेप्रमाणे वागेलच असे नाही, ही गोष्ट स्वीकारल्यास नात्यांमधील तणाव कमी होईल. सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास दिवस आनंदात जाईल.

**वृश्चिक :** जीवनातील या नैसर्गिक प्रक्रियेवर विश्वास ठेवा. लवकरच एक नवी आणि चांगली संधी तुम्हाला मिळणार आहे, त्यासाठी तयार रहा. आजचा दिवस प्रेम, आपुलकी आणि ऊर्जेने भरलेला असेल.

**धनु :** आजचा दिवस आत्मचिंतनासाठी उत्तम आहे. तुमच्यासाठी यश म्हणजे नक्की काय, याचा शांतपणे विचार करा. तुम्ही ज्या ध्येयांच्या मागे धावत आहात, त्यामुळे तुम्हाला आनंद आणि समाधान मिळेल.

**मकर :** आज तुम्ही इतरांना बदलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी परिस्थिती जशी आहे तशी स्वीकारा. यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. गोष्टी समजून घेण्याची तुमची क्षमता वाढेल.

**कुंभ :** तुमच्या आजूबाजूला अनेक चांगल्या गोष्टी घडत आहेत, त्याकडे लक्ष द्या आणि सकारात्मक राहा. बदलाची प्रक्रिया कधीकधी तणावपूर्ण असू शकते, पण हे तात्पुरते आहे हे लक्षात ठेवा.

**मीन :** जेव्हा तुमचे ध्येय तुमच्या खजया गरजांशी जुळलेले असते, तेव्हाच तुम्हाला यशाचा खरा आनंद मिळतो. तुमच्या मनात जोडीदाराच्या प्रेमाबद्दल काही शंका असेल, तर ती आज दूर होईल.

# बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १० :

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून प्रहारच्या कार्यकर्त्यांनी पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे, त्यामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण वाढला आहे.

बच्चू कडू यांनी गुरूकूंज मोझरी येथे गेल्या तीन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यकर्त्यांनी जलाशयात उड्या घेतल्या, असे प्रहारच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रहारचे पंधरा ते वीस कार्यकर्ते पूर्णा धरणाच्या जलाशयात घोषणा देत उभे आहेत.



राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांच्या उत्कर्षाकरिता स्वतंत्र आर्थिक महामंडळ, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ, शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी १० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला ५० रुपये तर म्हशीसाठी ६० रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा.

कांद्याचे दर स्थिर राहावेत याकरिता ४० रुपये दर होईस्तोवर निर्यात बंदी लागू करू नये, अशा मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा तिसरा दिवस आहे.

शिवसेना ठाकरे गटाने बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार गजानन लवटे यांनी गुरूकूंज मोझरी येथे पोहचून उपोषणस्थळी बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्या समवेत संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी हेही होते. आंदोलनाच्या प्रत्येक पायरीवर बच्चू कडू यांची साथ देण्याचा निर्णय गजानन लवटे यांनी जाहीर केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत बच्चू कडू यांची भेट घेणार असल्याचे संकेत गजानन लवटे यांनी दिले.

परभणीचे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार डॉ. राहुल पाटील यांनीही बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी आणि शेतमालाला हमीभावाच्या वर २० टक्के अनुदान देण्यात यावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहे

# पर्यावरणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करणे आवश्यक : सुहासिनी धोत्रे

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :

वटपौर्णिमेच्या पावन-पर्वावर टिळक पार्क येथे वृक्षारोपण करण्यात आले. एक वर्ष संगोपन करून दाखवतील अशा नागरिकांना झाड पालकत्व म्हणून देण्यात आले. पर्यावरणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण व वृक्षसंपोपन करणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्ष संवर्धन अभियानाला महत्त्व दिले असून, या अभियानामध्ये प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा असे आवाहन भाजपच्या ज्येष्ठ नेत्या सुवासिनी संजय धोत्रे यांनी याप्रसंगी केले. मातृशक्तीला सन्मान देण्याचा परंपरा केवळ सनातन धर्मामध्ये आहे. मातृशक्ती ही समाज निर्माण करणारी दिशादर्शक आहे. हिच शक्ती परिवार व राष्ट्राचा सर्वांगिण विकास-कल्याण करणारी आहे. मा दुर्गा शारदा, माँ साहेब जिजाऊ, माता रमाई, सावित्रीबाई फुले यांचे कार्य, विचार प्रेरणादायी आहेत, असेही सुहासिनी धोत्रे म्हणाल्या.



कार्यक्रमाला मंजुषा सावरकर, चंदा शर्मा, सुमन गावंडे, राहुल देशमुख, सारिका जयस्वाल, निकिता देशमुख, ममता सारडा, योग शिक्षक डॉ.सुहास काटे, योगशिक्षिका सुनीता कावरे या प्रामुख्याने उपस्थित होत्या.

प्रमुख उपस्थितीत टिळक पार्क येथे परिसरातील नागरिकांना झाडांचे वाटप करण्यात आले. तसेच वृक्षारोपणही करण्यात आले. माजी नगरसेवक राहुल देशमुख यांनी झाडे देऊन त्याचे एक वर्ष संगोपन करून दाखवतील अशा नागरिकांना झाड पालकत्व म्हणून देण्यात आले. उपस्थित नागरिकांना पर्यावरणाचे महत्त्व महिलांना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी किशोर बांधवकर, अशोक राऊत, चंद्रशेखर फुलझडे प्रदीप दादा बांधवकर, शिवाजी कराळे, प्रदीप बारड, अजय वर्मा, श्रवण भिसे उपस्थित होते. पर्यावरणाच्या असंतुलामुळे आज नैसर्गिक आपत्ती येत आहेत. हे संकट जागतिक स्तरावरील आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्ष संवर्धन अभियानाला महत्त्व दिले आहे. अभियानामध्ये प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा असे आवाहन सुहासिनी धोत्रे यांनी केले. यांनी स्वीकारले पालकत्त्व प्रभागात सांस्कृतिक भवन, आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरण होत आहे. त्यामुळे नागरिकांनी जबाबदारीने मोठ्या संख्येने विकास संवाद सभेला यावे. यात प्रकाश जाधव, थोटे दांपत्य, नलिनी वानखडे, साधना चौरसिया सीमा थोटे, वैशाली मावळे, अनिता नुतिवार, वर्षा ठाकरे, सुरेखा जाधव, प्रतिभा भोजने, वंदना चिंचोळकर यांनी केले आहे.

# अनोळखी मृतदेहांचाही नातेवाईक ठरणारा माणूस पराग गवई
## आठ अनोळखी मृतांवर केले स्वखर्चाने अंत्यसंस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :

मानवतेच्या नात्याने मृतांवर अंत्यसंस्कार करणारे, त्यांचे शेवटचे सोबती ठरणारे आणि अनोळखी मृतांचाही """नातेवाईक""" होणारे सामाजिक कार्यकर्ते पराग गवई यांनी आठवड्यात आठ अनोळखी मृतदेहांवर स्वखर्चाने अंत्यसंस्कार करून पुन्हा एकदा समाजापुढे मानवतेचा आदर्श ठेवला आहे.



अकोला जिल्ह्यातील एमआयडीसी, अकोट फाईल, रामदास पेठ, सिटी कोतवाली, मुर्तिजापूर शहर, बोरगाव मंजू, जुने शहर पोलीस स्टेशन अशा विविध पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या आठ दिवसांमध्ये अपघात, आजार किंवा इतर कारणांनी मृत्युमुखी पडलेले आठ अनोळखी मृतदेह शहरातील मोहता मिल स्मशानभूमी येथे विधिवत विधी करून अंत्यसंस्कार करण्यात आले. या मृतांमध्ये सेवालाल राठोड, प्रकाश यादव, तसेच रेल्वे अपघातात मृत झालेला अंदाजे ६० वर्ष वयाचा इसम, रस्ते अपघातातील ५० वर्षीय अनोळखी पुरुष, उपचारादरम्यान मरण पावलेला ६० वर्षीय इसम, ७० वर्षीय, ६५ वर्षीय व ४९ वर्षीय अनोळखी पुरुषांचा समावेश होता.

शवविच्छेदनानंतर उरलेली मृतदेहांची जबाबदारी सरकारकडून सोडली गेली तरी पराग गवई ती आपली मानून त्यांच्यावर सन्मानपूर्वक शेवटचा विधी करतात. या सामाजिक कार्यासंदर्भात बोलताना पराग गवई म्हणाले, "कोणताही मृतदेह बेवारस राहू नये, हीच माझी माणुसकीची भावना आहे. मृत झालेल्या व्यक्तीला सन्मानाने निरोप देणं हे समाजाचं कर्तव्य आहे.

# उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव जामोद, दि. १० :

पंकज देशमुख मृत्यू प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी आज ९ मे रोजी न्याय जन आंदोलन समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. भाजप कार्यकर्ता स्व. पंकज देशमुख, यांनी ३ मे रोजी त्यांच्या वायाळ शिवारातील शेतात लहान झाडाला फाशी घेतल्याचे प्रथम दर्शनी दाखविले आहे. स्थानिक पोलीस प्रशासनाने या मृत्युची चौफेर बाजुने तपासणी न करता एकतर्फी आत्महत्या असल्याचे पत्रकारांना सांगितले. परंतु स्व. पंकज देशमुख यांचे कुटुंब व नातेवाइक यांचे त्यांची हत्या झाल्याचे मत व्यक्त केले. तसेच जळगाव जामोद ते अकोला हा प्रवास दोन तासांचा असताना पाच तासाचा करण्यात आला. त्यामुळे स्थानिक पोलिस प्रशानासनावर जनतेचा व कुटुंबाचा विश्वास राहिला नाही.

# २०२७ पर्यंत विदर्भ राज्य मिळवणारच

■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा, दि. १० :

भारताच्या संविधानातील कलम ३ प्रमाणे विदर्भ राज्य निर्माण करणे हा केंद्र सरकारचा व संसदेचा अधिकार आहे. राज्य सरकारने कितीही कोल्हेकुई केली तरी काहीही उपयोग नाही व विदर्भाचे राज्य आम्ही मिळवून घेऊच अशी हुंकार विदर्भ आंदोलन समितीने भंडारा येथे आयोजित मेळाव्यात भरली.



स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्हयामध्ये गावा-गावात आंदोलनाची धग वाढविण्याकरीता प्रभावी प्रचार प्रसार करण्याच्या दृष्टीने बालाजी लॉन, साई मंदिराच्या बाजूला, भंडारा येथे दि. ७ जून २०२५ ला पूर्व विदर्भाचा विदर्भ राज्य निर्माण मेळावा आयोजित करण्यात आला. या तीन जिल्ह्याच्या मेळाव्याला गोंदिया जिल्ह्यातून असंख्य कार्यकर्ता पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्याचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप बोलताना म्हणाले की, १९९७ साली भाजपने भुवनेश्वरला राष्ट्रीय कार्यकारिणी मध्ये विदर्भाचा ठराव केला. लगेच अटलजींनी छत्तीसगड, उत्तरांचल व झारखंड ही तीन नवी राज्य निर्माण केली. परंतु तेव्हा केंद्रात शिवसेना सत्तेत असल्यामुळे त्यांच्या धाकाने अटलजींनी विदर्भ दिला नाही. २०१४ च्या महाराष्ट्रातील निवडणुकीत भाजपाने विदर्भातील जनतेला विदर्भाच्या नावाने मते मागीतली व विदर्भातील जनतेने त्यांचेवर विश्वास ठेवून भाजपाचे ४४ आमदार निवडून दिले. पुन्हा राज्यात शिवसेना-भाजपचे सरकार आले व पुन्हा शिवसेनेच्या विरोधामुळे केंद्राने विदर्भ दिला नाही.

दोन्ही वेळेस भाजपाने विदर्भातील जनतेचा विश्वासघात केला म्हणून २०१९ मध्ये विदर्भ राज्य आंदोलन समीतीने केलेल्या वेगवेगळ्या आंदोलनामुळे व जनजागृतीमुळे विदर्भातून भाजपाचे १५ आमदार कमी झाले व आतातर विदर्भातील ३ एम.एल.सी. ही विदर्भातून कमी झाले. भाजपा व शिवसेनेची सोडचिठ्ठी झाल्यामुळे विदर्भ राज्य निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या प्रसंगी मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून ॲड. वामनराव चटप (विराआंस अध्यक्ष, पूर्व आमदार), उद्घाटक म्हणून प्रकाश पोहरे (किसान ब्रिगेड प्रमुख) मंचावर उपस्थित होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रंजना मामर्डे (महिला आघाडी अध्यक्ष), पहिल्या सत्राचे अध्यक्ष एड. नीरज खांदेवाले होते, प्रा. प्रभाकर कोडबत्तुनवार (को.क.स.), पूर्व राज्यमंत्री रमेश गजबे, मुकेश मासूरकर , सुरेश वानखेडे (उपाध्यक्ष विराआंस), तात्यासाहेब मते, अहमद कादर, (नाग विदर्भ समिति प्रमुख), नासीर जुम्मन शेख मंचावर होते.

# आर्णी तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे अतोनात नुकसान
## शहरासह तालुक्यातील अनेक गावांची बत्तीगुल

■ महासागर प्रतिनिधी, आर्णी, दि. १० :

शहरासह तालुक्यात सोमवारी वादळी वाऱ्यासह आलेल्या सोसाट्याच्या पावसामुळे अतोनात नुकसान झाले. त्यात आर्णी शहरासह ग्रामीण भागातील बत्तीगुल झाली होती. दरम्यान आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांनी तात्काळ तलाठ्यांना नुकसानीचे पाहणी करण्याचे आदेश दिले.

सोमवारी दिवसभर हवामानात उष्णता होती,पावसाची कोणतीही शक्यता नसताना,सायंकाळी अचानक ५:३० वाजता दरम्यान वातावरणात बदल होऊन, ढगांची दाटी झाली अन जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. यावेळी वाऱ्याचा जोर एवढा होता की, आर्णी शहरासह तालुक्यातील जवळा, कोपरा अशा अनेक गावातील नागरिकांच्या घरावरील टीन-पत्रे उडाले, झाडे उन्मळून पडली दरम्यान आर्णी तालुक्यातील कोपरा येथे दिग्रस - आर्णी मार्गावर रस्त्यालगत असलेले झाड उन्मळून पडल्यामुळे, काहीकाळ वाहतूक ठप्प झाली होती. यामुळे नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून मदत करावी अशी मागणी होत आहे.



आर्णी तालुक्यासह शहरात सोमवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे नागरिकांसह महावितरणचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तालुक्यातील विद्युत वहिनींचे ४० खांब पडून विजेच्या तारा तुटल्याने, लोणी, जवळा, आर्णी, लोणबेहळ व यरमल हेटी या ५ उपकेंद्रावरून होणारा विद्युत पुरवठा खंडित झाल्याने सावळी-सदोबाचा भाग वगळता संपूर्ण आर्णी तालुका अंधारात आहे.

घराच्या भिंती पडल्या तर काही ठिकाणी टीनपत्रे उडाले सोमवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे आर्णी तालुक्यातील पिंपळनेर येथे घराच्या भिंती पडल्या व घरावरील टीन पत्रे उडाले. त्या पत्रावरील दगड डोक्यात पडून एक १४ वर्षीय चिमुकली गंभीर जखमी झाली असून, अश्विनी दिपक देवकर वय १४ वर्ष रा. पिंपळनेर असे जखमी झालेल्या चिमुकलीचे नाव आहे. तिला तात्काळ ग्रामीण रुग्णालय आर्णी येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले.

# अमृत २.० अभियानांतर्गत महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १० :

महानगरात केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत भूमिगत गटार योजनेच्या (मलनिःसारण प्रकल्प) टप्पा एकच्या कामासह अन्य कामांचा भूमिपूजन सोहळा बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अधिकृतपणे होणार आहे. या कामासाठी ६२९ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातील एकूण २१ कामांचे भूमिपूजन व लोकार्पण होणार असून, या कामांची एकूण किंमत २५८८ कोटी रुपये आहे. अमृत योजना अंतर्गत भूमीगत योजना टप्याटप्याने राबवण्यात येत आहे. अमृत २.० अंतर्गत पहिल्या टप्प्याच्या कामाबाबत निविदेसह अन्य प्रक्रिया राबवण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात हद्दवाढ भागात कामे होणार आहेत. यात जल मलजलवाहित्या, मलजल शुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार आहे. दोन टिकाणी वेटवेल (विहिरी) देणार आहे.

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ७ दिवसांचा अल्टीमेटम

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १० :

जिल्ह्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागणार असून सर्व शासकीय, प्रशासकीय यंत्रणा या कामात व्यस्त होणार आहेत. त्यामुळे अतिवृष्टी, पीक विमासह कृषीच्या योजनांच्या लाभापासून शेतकरी वंचित राहिल्यास कृशी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होण्यासाठी प्रयत्न करु, असा इशारा भीमशक्ती संघटना व अशोक प्रतिष्ठानने दिला आहे. यंदा उन्हाळ्यात अवकाळी पाऊस व गारपीटमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले. मे महिन्यात जिल्ह्यात अधून-मधून ढगाळ वातावरण निर्माण झाले. सदर नुकसानीचा प्राथमिक अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनाकडे पाठवला आहे. आता संयुक्त पंचनामे सुरु आहेत. मात्र अद्यापही शेतकऱ्यांना विविध कृषी योजनाचा लाभ व अनुदान रखडले असून, याबाबत सोमवारच्या भीमशक्ती संघटना व अशोक प्रतिष्ठानच्या बैठकित चर्चा झाली. शेतकरी उद्धस्त झाला असून, बळीराजा कृषी योजनांचे अनुदान, पीक विमा, ठिबक सिंचन व विविध प्रकारचे सरकारी योजना व अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. शेतकऱ्यांना मदतीचे वाटप तत्काळ न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा बैठकित देण्यात आला. बैठकित अशोका प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व भीमशक्तीचे नेते प्रा. विजय आठवले, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे, अनिल तायडे, अनिल गवई, विद्याधर मोहोड, संदेश गवई, प्रा. शैलेश इंगळे, पद्माकर वासनिक, अरुणा लबडे आदी प्रामुख्याने होते.

प्रशासकीय यंत्रणेच्या सुस्तपणामुळे शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. केवळ राजकीय सत्ता मिळावी, यासाठी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. परिणामी घाम गाळणाऱ्या शेतकरी कष्टकरी सामान्य जनतेच्या हिताच्या योजनांवर प्रतिकूल परिणाम झाला असून, विविध योजनांचे लाभार्थी कित्येक महिन्यापासून वंचित आहेत असा आरोप बैठकीत करण्यात आला. एका आठवड्याचा अवधी विविध कृषी योजनांचे अनुदान, मे महिन्यात झालेल्या अवकाळीने झालेले नुकसानभरपाई, पीक विमा योजना, संत्रा पिक विमा, ठिबक सिंचन व विविध योजनेच्या लाभार्थ्यांचे खात्यात रक्कम जमा झाली पाहिजे.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **AUGUSTINA MARY ASHWINI.** NOW MY NEW NAME IS **ASHWINI CLINTON.**
**ADD** : FLAT NO 402, GIRISH HEIGHTS,, LIC SQUARE, KAMPTEE ROAD, NAGPUR CITY, 440001

MY OLD NAME WAS **RESHAMA SHAHID VIRANI.** NOW MY NEW NAME IS **RESHMA BANO MOHD FAROOQUE.**
**ADD** : WARD NO.1 JUNI VASTI, BORI, NAGPUR-441108

MY OLD NAME WAS **MOHD SUHAIL / MOHAMMAD SOHAIL HUSSAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SUHAIL HUSSAIN.**
**ADD** : 236B PLOT NO.21B YOGENDRA NAGAR NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **RASHIDA VOHRA.** NOW MY NEW NAME IS **RASHIDA MURTUZA VOHRA.**
**ADD** : BALAJI WARD 36 BOHRA COLONY GOPALPURI, CHANDRAPUR: 442401 (MS)

MY OLD NAME WAS **PATHAN AMJATKHAN RAHIM KHAN.** NOW MY NEW NAME IS **AMJAD RAHIM PATHAN.**
**ADD** : TATARSHAH WARD UMARKHED DISTRICT YAVATMAL, 445206

MY OLD NAME WAS **PATHAN AMJATKHAN RAHIM KHAN.** NOW MY NEW NAME IS **AMJAD RAHIM PATHAN.**
**ADD** : TATARSHAH WARD UMARKHED DISTRICT YAVATMAL, 445206

I **SABRA BEGUM GUL SANAWWAR ALI** DECLARED THAT MY SON AND DAUGHTER MARKSHEET AND SCHOOL LEAVING CERTIF-ICATE IS MY INCORRECT NAME WAS **SABRA BANO.** NOW NEW CORRECT NAME IS **SABRA BEGUM GUL SANAWWAR ALI.**
**ADD:** 1128/J/70, NEAR CHHOTI MASJID, HASANBAGH, NAGPUR 440024 MS

MY OLD NAME WAS **SARFUNNISA BEGUM MOHAMMAD SHAMIM.** NOW MY NEW NAME IS **SARFUNNISA MOHAMMAD SHAMIM RAIN.**
**ADD** : PLOT NO.41,NEAR H.K.COMPUTER, SAI BABA NAGAR, SHANTI NAGAR, NAGPUR - 440002, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HUNAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD HUNAIN MOHAMMAD SHAMIM RAIN**.
**ADD** : PLOT NO.41,NEAR H.K.COMPUTER, SAI BABA NAGAR, SHANTI NAGAR NAGPUR - 440002, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SHAKLAIN RAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHAKLAIN MOHAMMAD SHAMIM RAIN.**
**ADD** : PLOT NO.41,NEAR H.K.COMPUTER, SAI BABA NAGAR,SHANTI NAGAR, NAGPUR - 440002, MAHARASHTRA, INDIA


# ज्ञानगंगा अभयारण्यामध्ये वन्यप्राण्यांसाठी धोकादायक २३९ पोते काचेच्या बॉटल केल्या जमा

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. १० :

ज्ञानगंगा अभयारण्यातील मार्गाच्या दुतर्फा प्रवाशांनी, सहलीसाठी आलेल्या पर्यटकांनी दारुच्या, बिअरच्या व प्लास्टिकच्या बाटल्या फेकल्या आहेत. त्या जमा करण्याचे काम वन्यजीव सोयरे २०१६ पासून सातत्याने करत आहे.२०१६ ते २०२५ या दहा वर्षात एकूण २३९ पोते बाटल्या वन्यजीव सोयरे बुलडाणा यांनी जमा केल्या. सोबतच ३१ मे तंबाखू विरोधी दिन साजरा करत व्यसनमुक्तीची शपथ घेत व्यसनमुक्ती बाबत जनजागृती देखील या कार्यक्रमात करण्यात आली.



ज्ञानगंगा अभयारण्यात या फुटलेल्या दारूच्या काचेच्या बाटल्यांमुळे वन्य जीवास देखील धोका आहे. या काचेच्या बाटल्यांमुळे आता पर्यंत कितीतरी वन्यजीवांना इजा झाल्या असतील. या छोटया छोटया काचेच्या बाटलीच्या जखमांमुळे अनेक वन्यप्राण्यांना आपला जीव गमवावा लागला असेल. या वन्यजीवांना आतापर्यंत झालेल्या जखमांचा उपचार तर करू शकत नाही परंतु या दारूच्या काचेच्या बाटल्यांपासून भविष्यात होणाऱ्या इजा थांबवू शकतो. याचा विचार करून २०१६ पासून दरवर्षी ज्ञानगंगा अभयारण्यातून दारूच्या, बिअरच्या बाटल्या व प्लास्टिकच्या पिशव्या जमा केले. वर्ष २०१६ मध्ये ३५ पोते, वर्ष २०१७ मध्ये २२ पोते, वर्ष २०१८ मध्ये २२ पोते, वर्ष २०१९ मध्ये ३० पोते, वर्ष २०२० मध्ये २८ पोते, वर्ष २०२१ मध्ये १४ पोते, वर्ष २०२२ मध्ये ४० पोते, वर्ष २०२३ मध्ये १४ पोते, ५ जुन २०२४ रोजी २४ पोते जमा केल्या.

५ जून जागतिक पर्यावरण दिनचे औचित्य साधून ८ जून रोजी मोहीम आखली आणि १० पोते दारूची काचेची बॉटल, प्लास्टिक कचरा उचलला. या वर्षी आतापर्यंत सर्वात कमी दारूची काचेची बॉटल, प्लास्टिक कचरा उचलला याचे श्रेय नक्कीच वन विभागाला जाते.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेतील जिल्हास्तरीय जिल्हा नशा मुक्ती समितीचे सदस्य डॉ. लता बाहेकर, जिल्हा हिवताप कार्यालय बुलडाणा, नशा बंदी विभाग महाराष्ट्र राज्य बुलडाणा. प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय शाखा बुलडाणा, जिजामाता महाविद्यालय बुलडाणा या संस्थेने मोलाचे सहकार्य केले. या स्वच्छता मोहिमेला जिल्हा हिवताप अधिकारी, कर्मचारी यांनी मोलाचे श्रमदान करित ९ किलोमीटर सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत ४ तास पायदळ चालले. ऊन वाढत असल्या कारणाने मोहिम वन भोजन करून समाप्त करण्यात आली. या मोहिमेला शिवराज चौहान संतोष पाखरे, प्रदीप वनारे यांनी भेट दिली. या मोहिमेला भारत काटकर, प्रकाश भुतेकर, अलका भुतेकर, लता पाटोळे, प्रियंका पाटोळे, नितीन श्रीवास्तव आदींनी श्रमदान केले. वन भोजनासाठी लागणाऱ्या पळसाच्या पानाच्या पर्यावरण पूरक पत्रावळ्या स्वतः वन्यजीव सोयरे प्रेरणा नितीन श्रीवास्तव आणि पायल सचिन श्रीवास्तव यांनी महिलांसाठी बनवल्या.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको

खेळताना गुडघा वेडावाकडा वाकल्यास किंवा त्याला अचानक मार बसल्यास गुडघ्याच्या दुखापती होतात. गुडघा हा शरीरातील सर्वात महत्त्वाच्या सांध्यांपैकी एक आहे. चालण्यास, धावण्यास, उडी मारण्यास, खाली बसण्यास तसेच उठून उभं राहण्यास गुडघे मदत करतात.

गुडघ्यांच्या आत धाग्यांसारख्या काही ऊती असतात. त्या सांधा मजबूतीने एकत्र जोडून ठेवण्यास मदत करतात. त्यांना अस्थिबंधन (लिगामेंट्स) म्हणतात. हे अस्थिबंधन गुडघ्यांचे सांधे स्थिर राखण्यात मदत करतात. कधीकधी अचानक पडणं, पाय मुरगळणं, गुडघा वाकणं किंवा खेळाच्या दुखापतीमुळे अस्थिबंधनावर ताण येऊ शकतो किंवा ते फाटू शकतात. याला गुडघ्याच्या अस्थिबंधनाची दुखापत असं म्हणतात. या दुखापती व्यायाम करणाऱ्या, मैदानी खेळ खेळणाऱ्या आणि धावताना अचानक दिशा बदलणाऱ्या व्यक्तींमध्ये अधिक सामान्य आहेत.

**उपचार न घेतल्यास दीर्घकालीन समस्या**

गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतींमुळे तीव्र वेदना, सूज आणि हालचालींवर मर्यादा येऊ शकतात. याकडे दुर्लक्ष केल्यास किंवा उपचार न केल्यास गुडघ्याचे सांधे कमकुवत होऊन दीर्घकालीन समस्यांना आमंत्रण मिळू शकतं. योग्य काळजी आणि विश्रांती घेतल्यास या दुखापती बऱ्या होऊ शकतात आणि भविष्यातील समस्यादेखील टाळता येतात.

**गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतींचे प्रकार**

* **एसीएल दुखापत (अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट):** हा गुडघ्याच्या अस्थिबंधनाच्या दुखापतीचा सर्वात सामान्य प्रकार आहे. फुटबॉल, बास्केटबॉल किंवा जिम्नॅस्टिक्ससारखे खेळताना या प्रकारची दुखापत होऊ शकते. अचानक थांबताना, उडी मारताना अनाठायीपणे उतरताना किंवा अचानक दिशा बदलतानाही ती होऊ शकते. अँटीरियर क्रूशिएट लिगामेंट इजा (एसीएल) झाली असेल तर रुग्णामध्ये तीव्र वेदना, दुखापतीनंतर लगेच सूज येणं, वजन सहन न होणं आणि सांधे कडक होणं अशी लक्षणे दिसून येतात.



दुखापत
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

* **पीसीएल दुखापत (पोस्टेरियर क्रूशिएट लिगामेंट):** गुडघ्यामध्ये या विशिष्ट प्रकारच्या अस्थिबंधनाच्या दुखापती गुडघ्याच्या पुढच्या बाजूला असलेल्या जोरदार आघातामुळे होतात. पोस्टरियर क्रूसिएट लिगामेंट दुखापतीमुळे लगेचच तीक्ष्ण वेदना होत नाहीत; परंतु कालांतराने परिस्थिती आणखी बिकट होऊन चालण्यास त्रास होऊ शकतो
* **एमसीएल (मेडियल कोलॅटरल लिगामेंट)** : दुखापत झाल्यावर गुडघा एका बाजूला खूप वाकतो. गुडघे सरळ ठेवणं किंवा वाकवणंदेखील कठीण होऊ शकतं. गुडघ्याच्या आतील बाजूस जास्त दाब पडल्याने बाहेरील भागावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एलसीएल (लॅटरल कोलॅटरल लिगामेंट) दुखापत होऊ शकते. प्रभावित भाग सुजू शकतो आणि चालताना किंवा गुडघे वाकवताना त्रास होऊ शकतो.

**काय करावं?**

गुडघ्याची स्थिरता पुनर्संचयित करण्यासाठी आणि हालचालीची श्रेणी सुधारण्यासाठी रुग्णाला आर्थोस्कोपिक पद्धतीने अस्थिबंधन दुरुस्तीचा सल्ला दिला जातो. ही 'मिनिमली इन्वेजिव्ह' शस्त्रक्रिया आहे. सांध्यातील दुरुस्तीचे मार्गदर्शन करण्यासाठी विविध उपकरणं वापरली जातात. ही उपकरणं आणि कॅमेराच्या मदतीने फाटलेले किंवा खराब झालेले अस्थिबंधन दुरुस्त केले जातात.

## अकाली रजोनिवृत्तीचं व्यवस्थापन

आजकाल महिलांना ऑफिसच्या ताण-तणावामुळे आणि घरातील कामांमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. त्यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या वाढू लागल्या आहेत. त्यातही महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. रजोनिवृत्तीच्या वेळी होणारा त्रास ही एक गंभीर समस्या बनली आहे. शक्यतो ४५ ते ५५ या वयात रजोनिवृत्ती येते; परंतु चुकीची जीवनशैली आणि इतर काही कारणांमुळे काही महिला ३० ते ४० या वयातच या अवस्थेतून जात आहेत. याचा महिलांवर केवळ शारीरिकच नाही, तर मानसिक आणि भावनिकदृष्ट्याही खोलवर परिणाम होतो.



जीवनशैली
डॉ. मेघा दळे

कोणत्याही महिलेला अशी लक्षणे जाणवत असतील, तर ती हलक्यात घेऊ नका. कुटुंबातील महिलांना आधीच वेळेपूर्वीच रजोनिवृत्ती आली असेल तर त्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. वेळेवर निदान, योग्य उपचार आणि काळजी घेतल्यास गुंतागुंत टाळता येते. रजोनिवृत्ती वेळेपूर्वी येण्यासाठी खालील कारणं कारणीभूत ठरतात.

* **आरोग्य समस्या:** थायरॉईड, ऑटोइम्यून डिसऑर्डर.
* **जीवनशैली:** ताणतणाव, खाण्याच्या वाईट सवयी, जास्त धूम्रपान किंवा मद्यपान.
* **शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय कारणं:** अंडाशय किंवा गर्भाशयावर शस्त्रक्रिया, केमोथेरपी.
* **लहान वयात रजोनिवृत्तीची लक्षणं:** मासिक पाळी अनियमित होते किंवा अचानक थांबते. उष्णता आणि घाम येणं.
* **निद्रानाश किंवा झोपेचा अभाव:** मूड स्विंग्स, चिडचिडेपणा आणि नैराश्य. शरीरात थकवा आणि अशक्तपणा जाणवणं. त्वचा कोरडी पडणं आणि केस गळणं. लैंगिक इच्छा कमी होणं आणि वेदनादायक संभोग.

**काय काळजी घ्यावी?**

* **निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा:** संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि तणाव कमी करणं आवश्यक आहे.
* **वैद्यकीय सल्ला घ्या:** हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीची आवश्यकता असू शकते.
* **नियमित तपासणी:** हार्मोन्सची पातळी तपासा आणि हाडांकडे लक्ष द्या.
* **मानसिक आरोग्य काळजी:** ध्यान, योग आणि विश्रांती या तीन बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत.

लहान वयात रजोनिवृत्ती येणें ही गंभीर बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करणं आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं.

## उच्च रक्तदाब धोकादायकच

उच्च रक्तदाबामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळू शकतं. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीचा आहार यामुळे कमी वयातच हा विकार जडू लागला आहे. तसं पाहिलं तर उच्च रक्तदाब हा आजार नाही; परंतु उच्च रक्तदाबामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात आणि ते प्राणघातक ठरू शकतात.

उच्च रक्तदाब ही आधुनिक जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे उद्भवणारी आरोग्य समस्या आहे. हल्लीच्या काळात उच्च रक्तदाबाचे अगदी विशीतले रुग्णही आढळून येत आहेत. काही प्रकरणांमध्ये तर १४-१५ वर्षे वयोगटातील मुलांमध्येही उच्च रक्तदाब दिसून येतो. जास्त चरबीयुक्त आहार आणि कमी शारीरिक हालचाल ही याची मुख्य कारणं आहेत. रक्तदाब जास्त असतो, तेव्हा सुरुवातीला फार गंभीर लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे ते गांभीर्याने घेतलं जात नाही.

शरीराचं मोठं नुकसान काही काळानंतर उच्च रक्तदाब गंभीर बनतो आणि शरीराला मोठं नुकसान पोहोचवू शकतो. सतत वाढणारा रक्तदाब हृदयविकार आणि स्ट्रोक या दोन घातक आजारांना कारणीभूत ठरतो. दोन्ही विकारांमध्ये वेळेवर उपचार मिळाले नाहीत, तर रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो.




व्याधीविकार
डॉ. दत्तात्रय मुळे

हृदयविकाराच्या झटक्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलतं. रुग्णाला आयुष्यभर संतुलित आहार घ्यावा लागतो आणि स्ट्रोक (मेंदूतील रक्तस्राव) झाल्यास, कधीकधी रुग्ण चालण्याच्या स्थितीतही नसतो.

## का मंदावते रोगप्रतिकारशक्ती?

अनेकजण आरोग्याबाबत खूप दक्ष असतात. काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुतात. पोषक आहाराचं आणि जीवनसत्त्वयुक्त गोळ्यांचं नियमित सेवन करतात. आजारी माणसांपासून शक्य तितकं लांब रहातात. स्वतःची प्रत्येक वस्तू बॅक्टेरियामुक्त असेल याची काळजी घेतात. मात्र एवढं करूनही सर्दी, खोकला, तापाचे जंतू त्यांच्या शरीरात प्रवेश करण्यात यशस्वी ठरतात. एवढी काळजी घेऊनही आपण का आजारी पडलो, असा प्रश्न डॉक्टरांना विचारला जातो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होण्यामागे काही वेगळी कारणंही असू शकतात. याच कारणांचा उहापोह करण्याचा हा प्रयत्न...



वेगळं काही

सध्या वायू प्रदूषणाचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. हे प्रदूषण फक्त फुफ्फुसांवरच आघात करतं असं नाही तर रोगप्रतिकारक शक्तीही कमी करतं. प्रदूषित हवा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या 'टी' पेशींवर प्रभाव टाकते. त्यामुळे बराच काळ प्रदूषित वातावरणात घालवल्यानंतर आजारपण येऊ शकतं. वातावरणातला हवेचा दर्जा सुधारणं शक्य नसलं तरी चांगला एअर प्युरिफायर आणि चांगला फेस मास्क विकत घेता येईल.

प्रथिनांच्या अतिसेवनामुळेही रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या प्रथिनांमुळे शरीरात 'वन जीएफ वन' हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोनमुळे वय वाढण्याची प्रक्रिया वेगवान होते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे दुग्धजन्य उत्पादनं, मांस अशा प्राणीजन्य पदार्थांमधून मिळणाऱ्या कॅलरींचं प्रमाण तुम्ही घेत असलेल्या दैनंदिन कॅलरींच्या तुलनेत दहा टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, याची काळजी घ्या. यानंतरही त्रास सुरू राहिला तर प्राणीजन्य पदार्थांमधून घेतल्या जाणाऱ्या कॅलरींचं प्रमाण पाच टक्क्यांवर आणा.

एकाकी आयुष्य जगणाऱ्या लोकांवर अधिक ताण येतो. याच कारणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होते. म्हणूनच एकटेपणा टाळण्यासाठी प्रयत्न करावा. कुटुंबिय, मित्रमंडळी, सहकारी यांच्यासह अधिकाधिक वेळ घालवण्याचा प्रयत्न करावा. सर्वांमध्ये मिळून-मिसळून रहाणारे रोगांचा अधिक चांगल्या प्रकारे सामना करू शकतात.

## तरुणांनाही सतावतेय केसगळती

आजकाल केस गळतीची समस्या गंभीर बनली आहे. बदललेली जीवनशैली, ताणतणाव आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे लोकांच्या डोक्यावरील केस गळत आहेत.

केसगळतीच्या समस्येने ग्रस्त असलेले तरुण केस प्रत्यारोपण करून घेत आहेत. काही आजार आणि पोषणाच्या कमतरतेमुळेदेखील केसगळती होऊ शकते.



केसांचं आरोग्य
डॉ. दीप्ती नेने

केसगळतीमागे पोषणाचा अभाव हे कारणही असू शकतं. केसगळतीवर केस प्रत्यारोपणाच्या पर्यायाचा असलंब केला जातो. ही प्रक्रिया खर्चिक तर आहेच, पण तज्ज्ञ व्यक्तकडून करून न घेतल्यास ती जीवघेणीही ठरू शकते.

**केस का गळतात?**

आजारांव्यतिरिक्त केस गळतीची समस्या पोषणाच्या कमतरतेमुळे उद्भवते. पोषणाचा अभाव पूरक आहारांद्वारे भरून काढता योतो. एखाद्या आजारामुळे केसगळती होत असेल तर चांगल्या डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. आपल्या शरीरात काही जीवनसत्त्वांची कमतरता असू शकते. त्यामुळे केस अकाली गळू लागतात. ड, ब ७, ई या जीवनसत्वांच्या तसंच झिंक आणि लोहाच्या कमतरतेमुळे केस गळतात. केसांच्या आरोग्यासाठी हे घटक आवश्यक असतात. याशिवाय काही आजारांमुळे केस गळू लागतात. विविध तपासण्यांनंतर केस गळतीची मुख्य कारणं ठरवली जातात. जीवनसत्त्वं आणि इतर घटकांची कमतरता लवकर दूर होऊ शकते. केस वेगाने गळत असतील आणि कोणताही आजार नसेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. शरीरातील पोषक तत्वांची कमतरता ओळखून, डॉक्टर तुम्हाला योग्य पूरक आहार सुचवू शकतात.

## तक्रारी दुर करणारं त्रिफळा

आपण त्रिफळा हे नाव बरेचदा ऐकलं आहे. त्रिफळा म्हणजे आवळा, हरीतकी आणि विभितिका या तीन फळांचं मिश्रण. हरीतकी या फळात विविध आजार बरे करण्याची क्षमता आहे. त्यातले अँटिऑक्सिडंट्स खूप प्रभावी असतात.

विभितिका हे सुद्धा एक फळ आहे. यात बॅक्टेरिया आणि फंगसविरोधी गुणधर्म असतात. दाह कमी करण्याच्या गुणधर्मामुळे विभितिका विविध विकारांवर प्रभावी ठरतं. आवळा खूप गुणकारी आहे. यात 'क' जीवनसत्त्व असतं. आवळ्याच्या सेवनाने शरीरातली उष्णता कमी होते. यासोबतच रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. तीन अत्यंत गुणकारी फळांपासून बनलेलं त्रिफळा चूर्ण विविध विकारांवर प्रभावी ठरतं.

आयुर्वेद आणि विकार



यातलं 'क' जीवनसत्त्व, अँटीऑक्सिडंट्स तसंच इतर घटकांमुळे केस आणि त्वचेचं आरोग्य सुधारतं. त्रिफळाच्या नियमित वापरामुळे केसांची मुळं बळकट होतात.

केस आणि त्वचेशी संबंधित समस्या असतील तर त्रिफळाचा नियमित वापर करता येईल. त्रिफळामुळे केस गळणं कमी होतं आणि केस छान वाढू लागतात. त्रिफळायुक्त टॉनिक्समुळे कोंड्याचं प्रमाण कमी व्हायला मदत होते. तसंच केसांच्या इतर तक्रारीही दूर होतात. त्रिफळामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स राखला जातो. परिणामी केस मजबूत होतात.


## कोलेस्टेरॉल वेळीच ओळखा

कोलेस्टेरॉलबद्दल बरेच समज-गैरसमज पाहायला मिळतात. ते वाईटच असतं हा ही एक गैरसमजच. शरीरासाठी कोलेस्टेरॉलदेखील आवश्यक आहे. कोलेस्टेरॉलचे दोन प्रकार असतात. एक चांगला आणि दुसरा वाईट. जर वाईट कोलेस्टेरॉल वाढलं, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

**लक्षणं कोणती?**

चांगलं कोलेस्टेरॉल वाईट कोलेस्टेरॉलला नियंत्रित करतं. म्हणून शरीरात चांगल्या कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. चांगलं कोलेस्टेरॉल अधिक असेपर्यंत वाईट कोलेस्टेरॉल फार नुकसान करत नाही. वाईट कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर काही बदल दिसून येतात. यामध्ये त्वचेवर पिवळे किंवा पांढरे डाग पडणं, त्वचेचा रंग बदलणं आणि डोळ्यांभोवती गाठी येणं यासारखी लक्षणं असू शकतात.

याशिवाय त्वचेवर इतर अनेक ठिकाणीही गाठी दिसू शकतात.



आराग्यचर्चा
डॉ. कुंदन गायकवाड

उपचारानंतर गाठी कमी होत जातात. कोलेस्टेरॉल वाढतं तेव्हा डोळे, कोपर, गुडघे किंवा टाचांभोवती पिवळे किंवा पांढरे डाग पडतात किंवा गाठी तयार होऊ शकतात. त्वचेवर लाल पुरळ येऊन खाज सुटते. पापण्या आणि त्वचेवर मेणासारखे पिवळे-केशरी रंगाचे डाग दिसू शकतात.

**लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**


ही लक्षणं जाणवल्यास ताबडतोब कोलेस्टेरॉलची पातळी तपासायला हवी. दिनक्रम आणि आहारात याग्य बदल करायला हवा.

## आहार मधुमेहींचा

मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य आणि पोषक आहार घेणं गरजेचं असतं. रक्तातली साखरेची पातळी वाढू नये यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.

मधुमेहींनी तळलेल्या पदार्थांऐवजी भाजलेल्या किंवा बेक केलेल्या पदार्थांची निवड करावी. तळकट पदार्थांमध्ये कॅलरी आणि मेदाचं प्रमाण अधिक असतं तर भाजलेल्या पदार्थांमधली पोषकमूल्यं टिकून रहातात.

मधुमेहींनी फळांचे रस पिण्याऐवजी फळ खाण्याला प्राधान्य द्यायला हवं. मधुमेहींना मर्यादित प्रमाणात फळं खाता येतील. तसंच ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणारी फळं खाणं अधिक आरोग्यदायी ठरतं.



आहारतंत्र

फळांच्या रसात फायबर नसतं. तसंच रस काढण्यासाठी अधिक फळांचा वापर झाल्याने साखरेचं प्रमाण वाढतं. मात्र फळामधून आवश्यक ते पोषक घटक मिळू शकतात.

वेफर्स, बिस्किटांऐवजी बदाम, आक्रोड, पिस्ता, शेंगदाणे खाता येतील. यातल्या पोषक घटकांमुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहील.

नवसंशोधन

### फायबरमुळे कॅन्सरला प्रतिबंध!

आहारातल्या तंतूमय पदार्थांचं म्हणजे फायबरचं महत्त्व आपण जाणतोच. फायबरमुळे पचनशक्ती सुधारते. रक्तातलं कोलेस्टरॉल नियंत्रणात ठेवण्यातही फायबर महत्त्वाची भूमिका बजावतं. मधुमेहींच्या आहारात फायबरचा समावेश असणं गरजेचं असतं. फायबरमुळे हे लाभ होतातच. शिवाय फुफ्फुसाच्या कर्करोगाची शक्यता अनेकपटींनी घटत असल्याची बाबही एका संशोधनातून समोर आली आहे. वॅडरबिल्ट विद्यापीठातल्या संशोधकांनी यावर प्रकाश टाकला आहे.




जामा ऑन्कोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे. या संशोधनाच्या निष्कर्षासाठी अमेरिका, युरोप आणि आशिया खंडातल्या सुमारे १.४ दशलक्ष प्रौढांचा अभ्यास करण्यात आला.

दंतारोग्य

### एनॅमलचा थर टिकवण्यासाठी...

दातांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची संख्या कमी नाही. पण दातांकडे झालेलं दुर्लक्ष तुम्हाला चांगलंच महागात पडू शकतं. नियमित दात घासल्यानंतरही त्यावरचा एनॅमलचा थर नष्ट होण्याचा धोका असतो. गोड पदार्थ आणि आहारातल्या कर्बोदकांमुळे हा थर कमी होत जातो. गोड पदार्थ आणि कर्बोदकांमुळे आपल्या लाळेत आम्लाचं प्रमाण वाढतं आणि हे आम्ल दातांवरचं एनॅमलचं प्रमाण कमी करतं. एनॅमल कमी झाल्यामुळे आपले दात संवेदनशील होतात. थंड किंवा गरम पदार्थांचं सेवन केल्यानंतर झिणझिण्या जाणवतात. दातांची झीज, पिवळेपणा अशा समस्यांना सामोरं जावं लागतं. हे टाळण्यासाठी खाल्ल्यानंतर खळखळून चूळ भरायला हवी. यासोबतच फ्लोराइडयुक्त टूथपेस्ट तसंच माउथवॉशचा वापर करायला हवा.




काळजी त्वचेची

### ब्लीच करताय?

बऱ्याच महिला नियमित ब्लीच करतात. बरेचदा घरच्या घरी ब्लीच केलं जातं. ब्लीचमुळे चेहऱ्यावरची लव झाकली जाते. शिवाय त्वचेचा रंग उजळतो. मात्र घरीच ब्लीच करणाऱ्यांनी अधिक काळजी घ्यायला हवी. बाजारात अनेक कंपन्यांची ब्लीच मिळतात. आपल्या त्वचेला साजेशा ब्लीचची निवड करा. महत्त्वाची बाब म्हणजे ब्लीच हातांऐवजी ब्रशने लावा. ब्लीच चेहऱ्यावर १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेऊ नका. वाळलेले ब्लीच टिश्यू पेपर किंवा कापसाने काढून टाका. यानंतर ब्लीच केल्यानंतर लावायच्या क्रीमने चेहऱ्याला मसाज करा. ब्लीच १५ मिनिटांपेक्षा अधिक काळ ठेवल्यामुळे त्वचेचा दाह होऊ शकतो. ब्लीचमधल्या काही घटकांमुळे त्वचेवर पुरळ येऊ शकतं. त्यामुळे ब्लीच फार वेळ ठेऊ नये.



आजीबाईचा बटवा

### पोषक घटकांनी समृद्ध खजूर

थंडीत खजूर खाल्ला जातो. खजूर आरोग्यदायी आणि पोषक घटकांनी समृद्ध आहे. खजुरात फायबर, प्रथिनं, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबं, मँगनिज, लोह आणि बी ६ हे जीवनसत्त्व हे घटक असतात. खजुरांमुळे झटपट ऊर्जा मिळत असल्यामुळे अशक्तपणा दूर करण्यासाठी त्यांचं सेवन करायला हवं. खजूर शक्यतो सकाळच्या वेळेत खायला हवा. खजुरात विरघळणारं फायबर असल्यामुळे पचनसंस्थेच्या तक्रारी, बद्धकोष्ठता दूर होते. खजुरातल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. खजुरातले घटक कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी करून हृदयाला बळकटी देतात. खजुरांच्या नियमित सेवनामुळे हाडांना बळकटी मिळते. यातल्या 'क' जीवनसत्त्वामुळे हाडांची घनता वाढते. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेतही खजुराची महत्त्वाची भूमिका असते. सकाळी व्यायाम करणारे दिवसाची सुरूवात खजुराने करू शकतात. खजुरामुळे मेंदूला चालना मिळते. विस्मरणाची तीव्रता कमी होते.



# विकासासाठी भाजपसोबत!

## वर्धापन दिनी अजित पवारांचे स्पष्टीकरण



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**
राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्धापन दिन आज साजरा होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर पक्षाचे दोन वेगवेगळे वर्धापन दिन साजरे झालेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बालेवाडीत वर्धापन दिन साजरा केला. यावेळी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी निधी वाटपावरील आरोप, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या रणनीतीवरही भाष्य केले.

आजच्या वर्धापन दिन मेळाव्यात त्यांनी भाजपासोबत जाण्याच्या प्रश्नाचे थेट आणि जाहीर उत्तर दिले. राज्याचा विकास, राज्यातील शेवटच्या माणसाचा विकास हाच मुख्य हेतू होता, असे अजित पवार म्हणाले.

मला काहीजण विचारतात की तुम्ही भाजपसोबत का गेले? आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २०१९ साली शिवसेनेसोबत गेला होता. आपण शिवसेनेसोबत सरकार स्थापन केले होते. त्यावेळी आपण काही तडजोडी केल्या होत्या. फक्त विरोधीपक्षात बसून, मोर्चे काढून, आंदोलन करून चालत नाही, आपण काही साधूसंत नाही. आपण लोकांना दिशा दाखवणारे, लोकांचे प्रश्न सोडवणारे आणि त्यातून बेरजेचे राजकारण करणारे लोक आहोत. त्यामुळेच आपण भाजपसोबत, एनडीएसोबत तसेच महाराष्ट्रात महायुतीसोबत जायचे ठरवले, असंही अजित पवार यांनी सांगितले.

अजित पवार म्हणाले की, राज्यात मागासलेला समाज आहे. त्यांना निधी द्यायचे ठरवले, तर संख्येच्या प्रमाणात निधी दिला जातो. आदिवासी समाज असेल, मागासवर्गीय समाज असेल त्याना लोकसंख्येप्रमाणे मी निधीचे वाटप करत असतो. त्याचे सूत्र आपण सर्वांनी स्वीकारले आहे. मात्र काही लोक जाणीवपूर्वक आपले सरकार आल्यापासून बदनामी करत आहेत.

काही जण म्हणतात की, मी सामाजिक न्याय विभागावर अन्याय केला. अजित पवारांनी बजेट वळवले. अजितदादा पैसे देत नाहीत, निधी देत नाहीत. अरे पण मी माझ्या खिशातले पैसे देतो का?

एकदा अर्थसंकल्प मांडला की त्यासाठी टप्प्याटप्प्याने पैसे दिले जातात. निधी काही एकदम दिला जात नाही. यावेळी ७ लाख २० कोटी रुपयाचा अर्थसंकल्प सादर करताना ४१ टक्के निधी आदिवासी विभागाला दिला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ३८ टक्के जास्त निधी यंदा दिला आहे. हे कधीही पुढे येतच नाही. कोणी तरी सांगते अजित पवारांनी अन्याय केला. कार्यकर्ता हे ऐकून खचतो. मात्र त्याला सत्य माहीत नसते.

अजित पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी राज्यभर सदस्य नोंदणी अभियान राबवण्याचे निर्देश दिले. पुणे पिंपरी चिंडवडमध्ये १० लाख सदस्य नोंदणी झाली पाहिजे. नाशिकमध्ये पाच लाख झाली पाहिजे. अशा पद्धतीने एक कोटीचे टार्गेट आपण ठेवले आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना सभासद करून घ्या. प्रत्येकाला आपल्या विचारधारेशी जोडा. तुम्ही लोकांशी संपर्क करा, असे अजित पवार म्हणाले.

# ८४ वर्ष जुन्या वडाच्या झाडाचे अभिनव प्रत्यारोपण

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**
पर्यावरण संरक्षणाच्या आणि हरित नागपूरच्या दिशेने नागपूर महानगरपालिकेतर्फे एक पाऊल उचलण्यात आले आहे. मनपाने ८४ वर्ष जुन्या हेरिटेज झाडाचे वृक्ष ट्रान्सप्लान्टर मशीनच्या सहाय्याने प्रायोगिक तत्वावर यशस्वीपणे प्रत्यारोपण केले.

मनपाच्या उद्यान आणि वर्कशॉप विभागाने भांडे प्लॉट, येथील पिंपळाचे झाड या मशीनच्या सहाय्याने शीतला माता मंदिर जवळ, भविष्य निर्वाह निधी कार्यालय जवळ यशस्वीपणे प्रत्यारोपण करण्यात आले.

या मशीनच्या खरेदीसाठी जिल्हा नियोजन निधीतून ५ कोटी ४७ लक्ष रुपयांची तरतूद झाली आहे. मनपातर्फे खरेदी करण्यात आलेल्या या मशीनला प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहन क्रमांक सुद्धा प्राप्त झाला आहे.

भांडे प्लॉट चौकात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणतर्फे फ्लाय ओव्हर बांधण्यात येत आहे. या रस्त्यावर मुखर्जी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलजवळ पिंपळाचे मोठे ८४ वर्ष जुने झाड वाहतुकीसाठी अडथळा होता.

या ३० फूट उंच झाडाला वृक्ष ट्रान्सप्लान्टर मशीनच्या सहाय्याने जमिनीतून उचलून दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आले. हे करताना झाडाच्या मुळांना आणि खोडाला नुकसान न करता दुसऱ्या ठिकाणी नेण्यात आले.

डकोटा कंपनीची ही मशीन महाराष्ट्रातील दुसरी मशीन आहे. ठाणे महानगरपालिकाकडे सुद्धा ही मशीन आहे. या मशीनचे काम रिमोटद्वारे केले जाते. अगोदर जेसीबीने झाडाच्या जवळ मोठा खड्डा करण्यात आला. त्यानंतर या मशीनच्या सहाय्याने झाडाला उचलून दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आले. या मशीन मध्ये १६०० लिटर पाण्याची टाकी सुद्धा आहे. जे झाड काढतांना आणि लावतांना पाणी टाकून झाडाच्या मुळांना पाणी देत राहते.



## फडणवीसांनी टोचले राणेंचे कान

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**



भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी धाराशिव येथे संवाद मेळाव्यात केलेल्या भाषणात, स्थानिक शिवसेना नेत्यांना उद्देशून भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे, असे विधान केले होते.

या वक्तव्याचे महायुतीत तीव्र पडसाद उमटले असून, शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीतही यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर तुमच्या मनात काहीही असेल, पण कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना खडसावले.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत नितेश राणेंच्या 'बाप' वक्तव्याचा मुद्दा उपस्थित झाला. शिवसेनेच्या मंत्र्यांनी आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण? असा थेट सवाल करत राणेंच्या विधानावरून नाराजी व्यक्त केली. त्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नितेश राणे यांच्याकडे नाराजी व्यक्त करत, या प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे, असा सल्ला दिला. तसेच, कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, संबंधित मंत्र्यांशी मी बोललो, ते म्हणाले माझा बोलण्याचा तसा अर्थ नव्हता, पण मी त्यांना सांगितले, तुमच्या मनात जो काही अर्थ असेल त्यापेक्षा जे परसेप्शन जाते ते राजकारणात महत्त्वाचे असते, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली.

धाराशिव जिल्हा नियोजन समितीमधील निधीवाटपाला मिळालेल्या स्थगितीवरून भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी घटकपक्षांवर जोरदार हल्ला चढवला होता. कुणी कितीही ताकद दाखवली, कसेही नाचले तरी सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री बसलाय हे लक्षात ठेवा, अशा शब्दांत राणे यांनी स्थानिक शिवसेना नेत्यांना दम भरला होता.

## महायुती सरकारची शेतकऱ्यांसदर्भात भूमिका बदलली

### अनिल देशमुख यांचा हल्लाबोल



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :**
सरकारने मतदान मागताना शेतकऱ्यांना कर्जमाफी करु, सातबारा कोरा करु असे जाहीर सभांमधून देवेंद्र फडणवीस सांगत होते. पण आता त्यांच्या सरकारमधील उपमुख्यमंत्री शेतकऱ्यांना ३१ तारखेपूर्वी पैसे भरा असे म्हणत आपली भूमिका बदलली आहे, असे म्हणत माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी महायुतीवर टीकास्त्र डागले आहे.

अनिल देशमुख म्हणाले, शरद पवारांना या वयात देखील इतका आत्मविश्वास आहे की ते पक्ष फुटीच्या वेळी ज्यांना जायचे त्यांनी जावे मी तरुणांच्या सोबतीने हा पक्ष उभारेल असे सांगत लढण्याची तयारी दर्शवत होते. आज परिस्थिती वेगळी आली असेल तरी तुम्हाला माहिती आहे की मधल्या काळी विधानसभेच्या निवडणूकामध्ये काय झाले? जे चित्र लोकसभा निवडणुकीच्या वेळी होते त्यानंतर विधानसभेवेळी मतदारसंघाच्या याद्या, एश्ट आणि मतदारांचे ओळखपत्र खोटे आणि म्हणून विजयही खोटा आहे. हे सरकार ईव्हीएम सरकार आहे.

अनिल देशमुख म्हणाले की, ज्या पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभा निवडणुकीवेळी शेतकऱ्यांची कर्जमाफी यावर बोलत होते, ती त्यांची भाषा आता सत्तेनंतर बदलली आहे. त्यांना शेतकरी कर्जमाफीचा विसर पडला असून, शेतकरी व या राज्यातील जनतेप्रती प्रेम उरले नाही . देशमुखांनी यावेळी आपल्या भाषणात पक्षफुटीवेळीचा किस्सा सांगितला.

## जिल्हाप्रमुखाचा शिवसेनेला जय महाराष्ट्र



■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. १० :**
शिवसेना ठाकरे गटाला अमरावती जिल्ह्यात लागलेली गळती थांबण्याची चिन्हे दिसत नसून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला.

ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. सुनील खराटे यांनी बडनेरा विधानसभा मतदारसंघातून युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती, पण त्यांना पराभव पत्करावा लागला होता.

विरोधी पक्षात असताना माझ्या आवाजाला दुर्लक्ष करण्यात आले. मात्र भाजपमध्ये सामील झाल्यानंतर या विषयावर ठोस पावले उचलण्यासाठी मी प्रयत्नशील राहील, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. भाजप प्रवेशाच्या वेळी कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि इतर नेते उपस्थित होते.

भाजपचे स्थिर नेतृत्व, विकासाभिमूख धोरणे आणि राष्ट्रप्रेमाची विचारसरणी यामुळे आपण भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, असे सुनील खराटे यांनी सांगितले. त्यांनी सुनील खराटे यांनी शिवसेना नेतृत्वावर टीका करण्याचे टाळले. सुनील खराटे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांचे नेतृत्व आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची कार्यक्षमता हीच देशाच्या विकासाची खरी दिशा आहे.



**लोकरंजन**

: सिनेरंग :

## मैने प्यार किया फिरसे चित्रपटाचा भव्यदिव्य मुहूर्त संपन्न

दोन दशकापूर्वी सलमान खान भाग्यश्री यांच्या मैने प्यार किया या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. आता अनेक वर्षानंतर याच शिर्षकाचा परंतु वेगळ्या कलाकारांच्या संचात नवा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

पर्ल ग्रुप ऑफ कंपनी आणि सिनेबस्टर मॅगझीन या कंपनीचे मालक रॉनी रॉड्रिक्स यांनी आता चित्रपट निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले असून त्यांच्या पहिल्या वाहिल्या सिनेमाचा मैने प्यार फिरसे किया चा भव्यदिव्य मुहूर्त नुकताच मुंबईत एका शानदार सोहळ्यात संपन्न झाला.

चित्रपटाच्या या मुहूर्ताला जेष्ठ अभिनेते धर्मेंद्र आवर्जून उपस्थित होते. तर अरबाज खान,विद्या माळवदे, राजपाल यादव या कलाकारासोबतच चित्रपटाचे संगीतकार दिलीप सेन आणि गायक उदित नारायण आणि नृत्य दिगदर्शक गणेश आचार्य देखील उपस्थित होते. याच सोहळ्यात रॉनी यांच्या जुळ्या मुलांचा चार्ल्स आणि काढेन यांचा वाढदिवस देखील मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. निर्माता रॉनी रॉड्रिक्स यांनी त्यांचा मुलगा काढेन यांच्यासह फॅटमार करून चित्रपटाचा मुहूर्त केला. पीबीसी मोशन पिक्चर्स लिमिटेड या बॅनरच्या मैने प्यार फिर से किया या चित्रपटाचे दिगदर्शन साबीर शेख करणार आहेत. तर एक्शन दिग्दर्शन हिमांशू झुनझुनवाला करणार आहेत. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

■ ■ ■

## समसारा' चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच



गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या समसारा या हॉरर चित्रपटाची टीजरमुळे उत्सुकता निर्माण झाली आहे. नुकत्याच लाँच करण्यात आलेल्या ट्रेलरमुळे या चित्रपटाविषयीची उत्कंठा आता अजूनच शिगेला पोहोचली आहे.

चित्रपटातील प्रमुख व्यक्तिरेखांचा इतिहास काय? त्यांच्या आयुष्यातलं गूढ काय? असे अनेक प्रश्न या ट्रेलरने निर्माण केले असून, समसारा हा चित्रपट येत्या २० जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

संचय प्रॉडक्शन्सच्या पुष्कर योगेश गुप्ता यांची निर्मिती असलेल्या ₹समसारा₹ या चित्रपटाचं दिग्दर्शन सागर लढे यांनी केले आहे.

जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यान घडणारी एक गूढरम्य गोष्ट समसारा हा चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. गूढरम्य गोष्टीला अनुभवी अभिनेत्यांची साथ लाभली आहे. सायली संजीव, ऋषी सक्सेना, डॉ. गिरीश ओक, पुष्कर श्रोत्री यांच्या नेमक्या व्यक्तिरेखा, त्यांना असलेला गूढ इतिहास अत्यंत रंजक असल्याचं ट्रेलरमधून जाणवतं आहे. त्याशिवाय पार्श्वसंगीत, छायांकन, व्हिज्युअल इफेक्ट्सही उत्तम दर्जाचे असल्याचं ट्रेलर मधून जाणवतं आहे. त्यामुळेच चित्रपटाचा ट्रेलर अत्यंत गुंतवणारा, भयाचा आणि रहस्याचा अनुभव देणारा असल्याचंही दिसतं आहे. मराठी चित्रपटांत हॉरर प्रकार फारसा हाताळला गेलेला नसल्यानं समसारा एक वेगळा प्रयोग ठरणार हे नक्की. ■ ■

### नवं रूप, नव्या नात्यांसह झी मराठी एक प्रेक्षकांच्या भेटीला

आपली झी मराठी नवीन ओळख आणि एक नवा अध्याय सुरू करत आहे. 'सदैव तुमची झी मराठी' , या ओळींमागे आहे एक साधा पण खोलवर जाणाऱ्या भावनेचा विचार. सदैव तुमची ही भावना आहे आपलेपणाची, एकत्रतेची आणि छोट्या-छोट्या क्षणांमधून निर्माण होणाऱ्या मोठ्या भावनिक बंधांची. झी मराठी आपल्या महाराष्ट्रातील संस्कृती, भावना, आणि दैनंदिन जीवनातल्या सत्य घटनांना सिनेमॅटिक रूप देते.

या संदर्भात झी मराठीच्या चीफ चॅनेल ऑफिसर व्ही. आर. हेमा म्हणाल्या, ह्लसदैव तुमची झी मराठी हे वाक्यच आपल्या नात्यांमधील भावनिक गुंतवणूक दाखवते. इथं एकमेकांच्या सुखदुःखात खांदा देऊन उभं राहणं ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. झी मराठी ही केवळ एक वाहिनी नाही, तर घराघरातली आपुलकीची एक भावना आहे. आता प्रेक्षकांसोबतचे नातं आणखी दृढ करण्यासाठी 'झी मराठी' नवीन रूपात नवीन ढंगात आली आहे.

या प्रवासात नव्याने सुरु झालेली 'देवमाणूस' आणि लवकरच सुरु होणारी 'कमळी' ह्या मालिका प्रेक्षकांना नक्कीच भावतील. पुन्हा नव्याने सुरु होणारा 'चला हवा येऊ द्या' हा कथाबाह्य कार्यक्रम सुद्धा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल यात शंकाच नाही. हे आणि असे अनेक नवनवीन सरप्राइझेस येत्या वर्षात झी मराठी तुमच्यासमोर घेऊन येणार आहे. झी मराठी ही लोकांच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग बनली आहे. इथे झी मराठी पाहिली जातेच, पण ती अनुभवलीही जाते. या नव्या प्रवासात आपली साथ हेच आमचं बळ आहे.



या माध्यमातून झी मराठीने आपल्या प्रेक्षकांसोबतचं नातं आणखी घट्ट केलं आहे आणि एक असा सांस्कृतिक क्षण निर्माण केला आहे, जो प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करून जाईल.

■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# सारंगगार गणनेत आढळली पाणपक्ष्यांची ९१५ घरटी







■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १० :**
जिल्ह्यातील हिंगणघाट शहरातील तहसील कार्यालय, पंचायत समिती, जि. प. उप-अभियंता कार्यालय परिसरात असलेल्या ३६ झाडांवर पाणपक्षांची मिश्र विणवसाहत आहे. पाणपक्ष्यांच्या या विणवसाहतीला मराठीत सारंगगार तर इंग्रजीमध्ये हेरॉनरी म्हणतात. हे विदर्भातील मोठे सारंगगारा पैकी एक आहे. दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्याला पाणपक्षी या परिसरामध्ये घरटी बांधायला सुरुवात करतात.

दोन दिवसांपूर्वी सारंगगारातील घरट्यांची गणना करण्यात आली. घरट्यांची गणना करून त्यांचे संरक्षण करणे. त्याबद्दल माहिती गोळा करणे या हेतूने आयोजित या प्रजातीनिहाय घरटी गणनेच्या कार्यक्रमात हिंगणघाट येथील निसर्गसाथी फाउंडेशन, नगरपरिषद, हिंगणघाट व महाराष्ट्र पक्षिमित्र वर्धा जिल्हा शाखा सहभागी झाले होते.

हिंगणघाट शहरातील ही सारंगगार पन्नास वर्षे जुनी आहे. प्रथम ती पंचायत समितीच्या प्रांगणात असलेल्या कवट वृक्षावर मर्यादित होती. प्रजननातून होणारे पिल्लं मोठे झाले की परत प्रजानासाठी या ठिकाणावर येत असे. नैसर्गिकरीत्या ही जागा त्यांच्या प्रजननाची आहे. असे नैसर्गिक संकेत या पक्ष्यांना मिळत असते.

या संकेताप्रमाणे ते प्रजननासाठी इथे दरवर्षी येथे येऊन घरटी करत असतात. एकट्या कवट वृक्षावर जास्त घरटी करता येत नाही म्हणून त्यांनी इतर झाडावर घरटी करायला सुरुवात केली.

आज ते कवट वृक्ष पडल्यानंतर या परिसरातील ३६ प्रकारच्या विविध झाडांवर पक्षांची घरटी होत आहे. यामध्ये आंबा, खोटा अशोक, शिशम, करंजी, वड, पिंपळ, केशिया सेमिया, सप्तपर्णी, गुलमोहर, देशी बाबूळ या झाडांवर ही घरटी आहे.

**: घरटी गणनेचा अहवाल :**
गाय बगळा (कॅटल इग्रेट) ८१०
छोटा बगळा (लिटील इग्रेट) २७
छोटा पानकावळा (लिटील कॉमोरंट) ०९
भारतीय पानकावळा (इंडिअन कॉमोरंट) ११
रात ढोकरी (ब्लॅक-क्राउंड नाईट हेरॉन) ५८

याप्रमाणे पाच प्रजातींच्या पाणपक्षांची घरटी या वसाहतीमध्ये आढळून आली. निसर्गासाथीचे अध्यक्ष प्रवीण कडू, महाराष्ट्र पक्षीमित्राचे राहुल वकारे, वन विभागाचे माजी वनपाल अशोक भानसे, डॉ. संदीप मुडे, पंचशील थुल, प्रशांत भोयर, यशवंत शिवणकर, अंजोर कडू यांनी घरटी गणनेच्या कार्यात सहभाग घेऊन गणना अधिकारी म्हणून कार्य केले. या सारंगगाराचे संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे व ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे आवाहन करण्यात आले.




महासागर
नागपूर वृत्तसागर
■ बुधवार, दि. ११, जुन २०२५ ■

# केबल वायर चोरी करून तांब्याची विक्री

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** गोदाम आणि बांधकाम स्थळावरून केबल वायर चोरी केल्यानंतर ते जाळून तांब्याचा तार वेगळा करीत त्याची विक्री करणाऱ्या आरोपीच्या गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने मुसक्या आवळल्या. तसेच त्याच्याकडून चोरीचे तांबे खरेदी करणाऱ्या 3 भंगार व्यवसायिकांनाही अटक करण्यात आली. पोलिसांनी अटकेतील आरोपींकडून एकूण 1 लाख 75 हजार रुपयांचा माल जप्त केला आहे.

योगेश उर्फ लकी रमेश शाहू (27) रा. दसरा रोड, महाल, रूपेश लक्ष्मण पिंपळधरे (45) रा. मानेवाडा, शेखर नरेश नशीने (43) आणि प्रफुल नरेश नशीने (53) दोन्ही रा. संजयनगर, पांढराबोडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. लकी हा सराईत चोरटा असून त्याच्याविरुद्ध चोरीच्या अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. गत 18 ऑक्टोबर 2024 रोजी लकीने लकडगंज ठाण्यांतर्गत गंगाबाई घाट चौकातील मंगेश वाघमारे यांच्या गोदामातून 2.25 लाख रुपये किंमतीचा वायर चोरी केला होता. वायर जाळून तांब्याचा तार वेगळा केल्यानंतर लकी त्याची बाजारात विक्री करण्याच्या तयारीत होता. दरम्यान गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाला याबाबत माहिती मिळाली. या माहितीवरून त्याला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला. सोमवारी अशोक चौकातून पोलिसांनी लकीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने लकडगंजच नाहीतर सोनेगाव, सदर आणि धंतोली ठाण्यांतर्गतही गुन्ह्याची कबुली दिली. चोरीच्या मालाबाबत विचारले असता लकीने वरील तिन्ही भंगार व्यवसायिकांची नावे सांगितले. हे सर्वजण लकीकडून चोरीचे तांबे खरेदी करीत होते.

## आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत देशाला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या श्रृती गांधी यांचा सत्कार

# श्रृती गांधी यांचा सत्कार म्हणजे स्त्री शक्तीचा सत्कार : विजय डागा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** आंतरराष्ट्रीय स्विमिंग स्पर्धेत 100 मीटर व 200 मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सुवर्णपदक व 50 मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सिल्वर पद्धत पटकाविणाऱ्या श्रृती गांधी यांनी स्त्रीत्वाची बुरसट सामाजिक चौकट मोडत आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाला प्रतिष्ठाच मिळवून दिली नाही तर स्त्रीला मोठा आदर मिळवून दिला आहे. असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती विजय डागा यांनी आयोजित सत्कार समारंभात केले.




10 जून 2025 ला महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा शंकरराव देव संवाद कक्ष शंकर नगर चौक नागपूर येथे विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा आयोजित छोटे खाणी सत्कार समारंभामध्ये माजी न्यायमूर्ती विजय डागा यांच्या हस्ते श्रृती गांधी यांना शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा डॉक्टर गिरीश गांधी, दैनिक महासागराचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, बाळ कुलकर्णी, विनोद गांधी उपस्थित होते.

यावेळी विजय डागा आपल्या भाषणात म्हणाले की मारवाडी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या श्रृती गांधी यांनी वीस पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा जलतरणाचा सराव सुरू केला असेल तेव्हा त्याकाळी मारवाडी समाजाचा स्त्रियांविषयी जो दृष्टिकोन असेल त्या विचारांची चौकट त्यांना मोडावी लागली असेल. ही चौकट मोडून त्यांनी स्वतःला आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध केले आहे आणि त्यांचा सन्मान म्हणजे संपूर्ण स्त्रीशक्तीचा सन्मान आहे. त्यांनी केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिष्ठाच उज्वल केली नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री शक्तीचा आदर वाढवला आहे. यावेळी दैनिक महासागर चे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक कौतुकाची थाप देताना म्हणाले की मारवाडी समाज हा उद्योगी समाज आहे. आणि या समाजाच्या रचनेतच स्त्री ही प्रापंचीक आहे. अशा या वहिवाटेत श्रृती गांधी सारखी स्त्री घराचा अंबरठा ओलांडून थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर केवळ स्वतःचाच नाही तर समाजाचाही पताका उंचावते ही आमच्यासाठी खरोखरच अभिमानाची बाब आहे.

यावेळी आपल्या मनोगत बाळ कुलकर्णी म्हणाले की जगाच्या मोठमोठ्या लढाया तोच जिंकू शकतो ज्याला घराच्या उंबरठ्याचा गड चढता येतो. या परीक्षेत एकदा पास झालो तर आकाश आपल्याला पेलता येते. विजय हा पुरस्कारासाठी मिळवायचा नसतो तर स्वतःहून ठरवलेले ध्येय साकारून स्वतःला सिद्ध करण्यासाठी मिळवायचा असतो. यावेळी डॉक्टर गिरीश गांधी आपल्या भाषणात म्हणाले की जे जे उदात्त, सुंदर, अनुकरणीय, अवलोकनीय, कर्तुत्वशाली आहे अशा सर्वच गोष्टींना पुरस्कृत केल्या गेले पाहिजे. यातून जी प्रेरणा मिळते ती प्रतिभावंतांमध्ये चेतना निर्माण करते. माणसांमध्ये प्रतिभा नसेल तर तो तिथेच संपतो. आणि ही प्रतिभा त्याच माणसाजवळ थांबते ज्याच्याजवळ साधना शक्ति आहे. श्रृती गांधी यांनी आपल्या प्रतिभेला साधनेची जोड दिली आहे त्यामुळेच त्या एवढे मोठे शिखर गाठू शकल्या.

यावेळी श्रृती गांधी यांनी सत्काराला उत्तर देताना त्यांनी या प्रवासात पती, परिवार, समाज यांनी दिलेल्या प्रेमळ साथीचे त्यांनी आभार मानले. पुढे प्रकृतीने अशीच साथ दिली तर अनेक शिखरे मी पादाक्रांत करेल असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाला नरेंद्र गांधी, डॉक्टर हरीश राठी, प्रशांत वराडे, निलेश खांडेकर, प्रशांत डाळिंबकर व मारवाडी फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस व आभार प्रदर्शन रूपाली मोरे यांनी केले.

# डॉ.जयंत देवपुजारी यांची चिकित्सा आयोगावर नियुक्ती

## न्यायालयाकडून थेट निर्णय रद्द

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** डॉ. जयंत देवपुजारी हे प्रसिद्ध आयुर्वेदिक वैद्य आणि शैक्षणिक व प्रशासनिक क्षेत्रातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.



त्यांनी बीएएमएस नंतर पीएच.डी. प्राप्त केली असून, अनेक वर्षे आयुर्वेदिक शिक्षण व संशोधन क्षेत्रात कार्यरत राहिले आहेत. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत त्यांनी केंद्रीय आयुर्वेदिक चिकित्सा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. याशिवाय, त्यांची नियुक्ती भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या ( एनसीआयएसएम) अध्यक्षपदी करण्यात आली होती. मात्र, दिल्ली उच्च न्यायालयाने डॉ. देवपुजारी यांची ही नियुक्ती रद्द केली.

यामागचं कारण म्हणजे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत झालेला वाद. एनसीआयएसएम अध्यक्षपदासाठी कायद्यानुसार एमडी किंवा समकक्ष पदव्युत्तर पदवी असणं आवश्यक आहे, मात्र डॉ. देवपुजारी यांच्याकडे पीएच.डी. असली तरी पदव्युत्तर पदवी नव्हती. त्यामुळे त्यांची नियुक्ती नियमबाह्य असल्याचं न्यायालयाने नमूद केलं.

नागपूरचे प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. जयंत यशवंत देवपुजारी यांची भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्ष पदावरील नियुक्ती दिल्ली उच्च न्यायालयाने अवैध ठरवून रद्द केली. डॉ. देवपुजारी या पदाकरिता पात्र नाहीत, असे निर्णयात स्पष्ट करण्यात आले. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय व न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांनी हा निर्णय दिला.

डॉ. देवपुजारी यांच्या नियुक्तीला डॉ. वेद प्रकाश त्यागी व डॉ. रघुनंदन शर्मा यांनी आव्हान दिले होते. भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग कायद्यातील कलम ४(२) अनुसार आयोगाच्या अध्यक्ष पदी नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे भारतीय चिकित्सा पद्धतीच्या कोणत्याही विषयामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी आणि भारतीय चिकित्सा पद्धती व शिक्षणाचा विकास, प्रगती व आरोग्य सेवा विभागाचे प्रमुख म्हणून किमान दहा वर्षे काम करण्याच्या अनुभवासह एकूण २० वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असणे बंधनकारक आहे. परंतु, डॉ. देवपुजारी यांच्याकडे पदव्युत्तर पदवी व आरोग्य सेवा प्रमुख पदी कार्य करण्याचा आवश्यक अनुभव नाही, असे न्यायालयाला आढळून आले.

# मान्सूनपूर्व कामांसाठी काही भागांत आज वीज बंद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** मान्सून आता काही दिवसांवर आला असताना, शहरातील वीजपुरवठा अधिक सुरक्षित आणि अखंडित ठेवण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. याच पार्श्वभूमीवर, बुधवार, 11 जून रोजी नागपुरातील विविध भागांमध्ये मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी वीजपुरवठा काही काळासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना तात्पुरती गैरसोय होऊ शकते, मात्र दीर्घकाळासाठी निर्बाध वीजसेवेसाठी ही कामे अत्यंत आवश्यक आहेत. नागरिकांनी याची नोंद घेऊन महावितरणला सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.

कॉंग्रेसनगर विभागात - सकाळी 8 ते दुपारी 12: नरसाळा, जयहिंगनगर, निलगगन. सकाळी 8 ते सकाळी 11: बहादुरा, गोधनी सीम, जगन्नाथनगर, लोकमान्य सोसायटी, जयंती नगरी झ 6, पद्मावतीनगर, राजेश्वरी पार्क, मेश्राम लेआऊट, मनोहर सोसायटी, जयराम कॉलनी, ढोबीनगर, चिंतामनी 1 व 2, एन्सारा सिटी, रचना मिथीला, अथर्वनगरी 4 व 7, पिपळा गाव. सकाळी 8 ते सकाळी 11: अभ्यंकरनगर, हिंदुस्तान कॉलनी, पंकजनगर, फुटाळा चौक आणि परिसर, एलआयटी परिसर व वसाहत, अंबाझरी टेकडी.

सकाळी 8 ते दुपारी 12: आरबीआय कॉलनी, महालक्ष्मी मंदिर, अभिनव कॉलनी, धरमपेठ सोसायटी, सितानगर. सकाळी 7.30 ते सकाळी 11: पी टी कॉलनी, अत्रे लेआऊट, अरविंद अपार्टमेंट. सकाळी 8.30 ते सकाळी 11.30: फुलसुंगे लेआउट, अमरशा लेआउट, परफेक्ट सोसायटी, पायोनियर ओरियन, आनंदनगर, प्रगतीनगर, घरकुल सोसायटी, राही इस्टेट, जयताळा बाजार चौक, केशवमाधवनगर, प्रसादनगर, हिरणवार लेआऊट, नागपूर विद्यापीठ सोसायटी, सौदामिनीनगर, पठाण लेआऊट, बंडू सोनी लेआऊट, गजानन नगर, पारेख लेआऊट, सरस्वती विहार कॉलनी, डंभारे लेआऊट, त्रिमुर्तीनगर, कॉसमॉस टाऊन, गोरले लेआऊट, द्रोणाचार्यनगर या भागात वीजपुरवठा बंद राहील.

सिव्हिल लाईन्स विभागात सकाळी 7 ते सकाळी 11: नई बस्ती, टेका, बाबा बुधाजीनगर, फारुकनगर. सकाळी 9.30 ते दुपारी 12.30: पॉवर ग्रिड चौक, रिंगरोड, कमाल चौक, वैशालीनगर, सॉ मिल, लष्करीबाग, इंदोरा, भीम चौक या भागात वीजपुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात सकाळी 8.30 ते सकाळी 10.30: वर्धमाननगर कॉलनी, पूर्व वर्धमाननगर, सकाळी 8.30 ते दुपारी 1: नवीननगर, श्यामनगर, दुर्गानगर, निर्भया सोसायटी, सकाळी 9 ते सकाळी 11: तांडापेठ, नाईक तलाव, बांग्लादेश, बंगालीपंजा, पाचपावली, सकाळी 8 ते दुपारी 12: मेहंदीबाग, जामदारवाडी, कंजी हाऊस, कांजी चौक, जोशीपुरा, जयभोलेनगर, मटन मार्केट, होलसेल मार्केट, गांधीबाग बगीचा परिसर या भागात वीजपुरवठा बंद राहील.

# गुंडांच्या घरातून शस्त्रास्त्र जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** गुन्हे शाखा युनिट 5च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर गुन्हेगारीत सक्रीय दोन भावंडांच्या घरावर धाड टाकली. झडतीमध्ये त्यांच्याकडे तलवार, चाकूसह इतर शस्त्रास्त्रे मिळाली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून एकाला अटक केली तर दुसरा भाऊ फरार आहे. शक्ती प्रकाश शिंदे (20) रा. गौरीशंकरनगर, कळमना असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. त्याचा भाऊ उमेश प्रकाश शिंदे (32) हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

शक्ती आणि उमेश हे दोघेही गुन्हेगारीत सक्रीय असून त्यांच्याविरुद्ध गुन्ह्यांची नोंद आहे. गुन्हे शाखेचे पथक कळमना ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान माहिती मिळाली की, शिंदे बंधूंनी त्यांच्या घरी शस्त्रास्त्रे गोळा करून ठेवली असून ते काहीतरी मोठा गुन्हा करण्याच्या तयारीत असू शकतात. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्यांच्या घरावर धाड टाकली. झडतीमध्ये पोलिसांना त्यांच्या घरी तलवार, चाकू, सत्तूर आणि भाल्याचे पाते मिळाले. पोलिसांनी सर्व शस्त्रे जप्त करून शक्तीला अटक केली, मात्र उमेश घरी नसल्याने पोलिसांच्या हाती लागू शकला नाही.

# अट्टल चोर भजन बनसोड पोलिसांच्या जाळ्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** गत 10 वर्षांपासून चोरी आणि घरफोडीत सक्रीय सराईत गुन्हेगार दीपक उर्फ बजरंग उर्फ भजन ब्रम्हदास बनसोड (40) याला अटक करण्यात हुडकेश्वर पोलिसांना यश आले आहे. बनसोडविरुद्ध विविध ठाण्यांत चोरी व घरफोडीच्या 68 गुन्ह्यांची नोंद आहे. गत काही महिन्यांपासून तो हुडकेश्वर ठाण्यांतर्गत सक्रीय होता. हुडकेश्वर पोलिसांनी त्याच्याकडून 6 गुन्हे उघडकीस आणले आहेत. भजन मुळचा बालाघाटच्या खैरलांजी येथील रहिवासी आहे, मात्र गत काही वर्षांपासून तो वाठोडा ठाण्यांतर्गत पंतप्रधान आवास योजनेच्या क्वॉर्टरमध्ये राहात आहे.

फिर्यादी डोमाजी सोनवणे (50) रा. इंगोलेनगर हे गत 25 मेच्या सायंकाळी घराला कुलूप लावून कुटुंबासह कार्यक्रमानिमित्त साळ्याकडे बहादुरा फाटा येथे गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख व दागिने चोरी करून फरार झाला. दुसऱ्या दिवशी सोनवणे कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार हुडकेश्वर पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. परिसरातील शासकीय आणि खासगी संस्थांमध्ये लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता पोलिसांना आरोपीच्या मोटारसायकलचा नंबर मिळाला.

या नंबरच्या आधारावर पोलिस भजन बनसोडपर्यंत पोहोचले. चौकशीत त्याने सोनवणे यांच्या घरी चोरीची कबुली दिली. न्यायालयातून त्याची पोलिस कोठडी घेऊन सखोल चौकशी केली असता बनसोडने हुडकेश्वर ठाण्यांतर्गत वेगवेगळ्या परिसरातून 5 दुचाकी वाहन चोरी केल्याचीही कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचे वाहन आणि 43 ग्रॅम सोन्यासह एकूण 6.55 लाख रुपये किंमतीचा माल जप्त केला आहे.

भजनविरुद्ध नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा येथे वाहन चोरी, चोरी, घरफोडी आणि मंदिरात चोरीचे एकूण 68 गुन्ह्यांची नोंद आहे. 2017 मध्ये त्याने बौद्धांचे श्रद्धा स्थान ड्रेगन पॅलेसमध्येही चोरी केली होती. या प्रकरणात त्याला अटक ही झाली होती. विशेष म्हणजे भजन बनसोड याला आतापर्यंत चोरीच्या तीन प्रकरणात शिक्षा झाली आहे. तुरूंगातून बाहेर येताच तो पुन्हा चोरी, घरफोडीत सक्रीय होतो. ही कारवाई वपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, पोनि नागेशकुमार चातरकर यांच्या मार्गदर्शनात सपोनि पंकजकुमार चक्रे, पोउपनि शैलेष ठवरे, पोहवा सतीश मानके, गणेश बोंदरे, राजेश मोते, मुकेश कन्हाके, राजेश धोपटे, गौरव गजभिये आणि चंदना काटोले यांनी केली.

# भगवान बिरसा मुंडा यांच्या १२५ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** आदिवासींचे आराध्य दैवत भगवान बिरसा मुंडा यांच्या १२५ व्या पुण्यतिथीनिमित्त शहरभर त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी बिरसा मुंडा युवा दलाचे अध्यक्ष राहुल मडावी यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. राहुल मडावी म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी लढा दिला आणि त्यांचा संघर्ष कधीही विसरता येणार नाही. हक्कांची जाणीव करून देण्याचे आणि त्यांना सक्षम करण्यासाठी काम करण्याचे आवाहन केले.

श्रद्धांजली वाहणाऱ्यांमध्ये आदिवासी समुदायातील लोक, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांचे चरित्र आणि त्यांच्या योगदानावर चर्चा करण्यात आली आणि त्यांचे आदर्श स्वीकारण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली.

# देशातील स्मार्ट सिटी प्रकल्प सुरू राहणार

## केंद्र सरकारचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :** देशातील १०० शहरांमध्ये नागरी सुविधांची बळकट करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून समोर आलेली स्मार्ट सिटीची आर्थिक मयार्दा ३१ मार्च २०२५ संपल्यानंतरही कार्यरत राहणार आहेत. केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि १०० स्मार्ट शहरांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेत ही माहिती दिली आहे. यामुळे नागपूरचा स्मार्ट सिटी प्रकल्प सुद्धा पूर्ववत सुरू राहणार आहे.

केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन (एससीएम) अंतर्गत नागपुरात नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड (एनएसएससीडीसीएल) या संस्थेची या अंतर्गत गठन झाले आहे. या स्मार्ट सिटी मिशनची मुदत गेल्या ३१ मार्च २०२५ रोजी संपली होती. परंतु केंद्र सरकारने सर्व राज्यांच्या नगरविकास खात्याच्या मुख्य सचिवांची तसेच स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यात स्मार्ट सिटी मिशन यापुढेही सुरू ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याचे स्पष्ट केले. ही बैठक केंद्र गृहनिर्माण व नागरी विकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. केंद्र सरकारने स्मार्ट सिटी मिशन कार्यक्रम यापुढेही सुरू ठेण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत देशभरात ८००० हून अधिक बहुक्षेत्रीय प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत. या एसपीव्ही नी शहरांच्या स्थानिक गरजा आणि आवश्यकतेनुसार जटिल, बहुक्षेत्रीय आणि अभिनव प्रकल्पांची अंमलबजावणी केली आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये एसपीव्ही मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी मौल्यवान अनुभव मिळवला आहे. मिशनसाठी एकूण ४८,००० कोटी रुपयांचा निधी आतापर्यंत वितरित करण्यात आला आहे.

केंद्र सरकारने मिशन अंतर्गत हाती घेण्यात आलेले सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचे, तसेच विकसित केलेल्या सर्व मालमत्तांचे हस्तांतरण आणि कामकाज व देखभाल सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत चालू असलेले सर्व प्रकल्प डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करायचे आहेत. पूर्ण झालेले प्रकल्प एकतर संबंधित विभागांना हस्तांतरित केले जाऊ शकतात किंवा एसपीव्ही संबंधित विभागांकडून सेवा शुल्क आकारून सुरू ठेवू शकते.

केंद्र सरकारने असेही म्हटले आहे की संबंधित राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने त्यांच्या प्राधान्यानुसार संबंधित एसपीव्ही ची भूमिका ठरवावी. हे एसपीव्ही शहरी व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञान सहाय्य, वछइ साठी सायबर-स्वच्छता/सुरक्षा यासारख्या भविष्यातील भूमिका बजावू शकतात. याशिवाय, हे एसपीव्ही विविध योजनांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी सेवांमध्ये मदत करू शकतात, चांगल्या शहरी व्यवस्थापनासाठी इतर राज्य विभागांना सल्लागार सहाय्य देऊ शकतात आणि शहर स्तरावर पुरावा-आधारित नियोजन आणि निर्णय घेण्यासाठी संशोधन आणि मूल्यांकन सहाय्य प्रदान करू शकतात. हे एसपीव्ही शहर स्तरावरील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी गुंतवणूक सुलभता सहाय्य म्हणून ही कार्य करतील. सरकारने त्यांच्या अधिसूचनेत आयसीसीसीच्या उन्नतीकरणाची देखील शिफारस केली आहे.

महासागर
: प्रभाग मित्र :




धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?
पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?
या... महासागर प्रभाग मित्र व्हा!

अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.

आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.
महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.
**अर्जाच्या पाकिटावर ‘महासागर प्रभाग मित्र’ असा उल्लेख आवर्जून करा.**
आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.


: अधिक माहितीसाठी :
9881717811, 9881717816

# हातात कागदपत्रे घेवून निराधारांचे हेलपाटे

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १० :

बँकेत गेले तर एंट्री करून देत नाहीत, तहसील कार्यालयात कागदपत्रे ठेवून जा म्हणतात, खात्यावर पैसे जमा झाले की, नाही समजत नाही, किती वेळा हातात मोबाईल अन् आधार कार्ड घेऊन चकरा मारायच्या, डोळ्यांचे स्कॅनिंग जुळेना, बोटाचे ठसे उमटेना, अशा व्यथा आहेत तालुक्यातील निराधारांच्या आहेत. त्यांच्या समस्या सोडवीण्या कोण समोर येणार हा प्रश्न पडला आहे.

राज्य शासनाने आता थेट डीबीटीवरून निराधारांचे पेन्शन अनुदान खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. श्रावण बाळ, संजय गांधी निराधार योजनेतील ज्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी व आधार सिडींग प्रक्रिया पूर्ण केली नाही अशा लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित असून अनुदान कधी मिळणार अशी प्रतीक्षा लागली आहे.



केंद्र व राज्य शासनाच्या वतीने निराधार लाभार्थ्यांना दर महिन्याला अनुदान दिले जाते शासनाकडून आता थेट डिबीटी मार्फत जमा केले जाणार आहे. यातील ज्या लाभार्थ्यांनी आधार सिडींग केले नाही आशा लाभार्थी वंचित राहिले आहेत. अनुदान बंद होणार असल्याच्या भीतीने वृद्धांची ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मोबाईल नंबर, आधार कार्ड, बँक पासबुक घेऊन तहसील कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. अनेक लाभाथ्यर्थ्यांचे मोबाईल नंबर आधार कार्ड, बँकेशी लिंक असूनही पैसे जमा झाले नाहीत म्हणून कागदपत्रांची तपासणी न करता तुम्ही आधार सेंटरवर जाऊन आधार कार्ड अपडेट करून घ्या असे सांगून बँकचे अधिकारी अनेक नागरिकांना परत पाठवतांना दिसत आहेत.

सध्या गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे आशा प्रसंगी ग्रामीण भागातून शेकडो लाभार्थी अनुदानासाठी चकरा मारत आहेत.

निराधारांची इ-केवायसी पूर्ण झालेली नाही ते लवकर करून न घेतल्यास शासनाकडून मिळणारे अनुदान बंद होईल अशी भिती पसरलेली आहे. त्यामुळे तालुक्यातील जेष्ठ निराधार, अनेक दिव्यांग अबालवृद्ध महिला, पुरुष सध्या तहसील कार्यालय या ठिकाणी चकरा मारताना दिसत आहेत. तर कागदपत्रे जमा करूनही आपले अनुदान का जमा झाले नाही, बँकेत जाऊनही एंट्री करून मिळत नाही, कागदपत्रे देऊन एक महिना झाले असतानाही पैसे जमा होत नाहीत अशा तक्रारी निराधार लाभाथ्यर्थ्यांना कडून केल्या जात आहेत. निराधारांच्या समस्या सोडवीण्यासाठी तहसील कार्यालयाकडून प्रयत्न होतांना दिसत नाहीत.

**निराधारांना वाली नाही**

निरधारांचे प्रश्नावर शासन आणि प्रशासनाला जाब विचारण्याची हिंमत जेष्ठ समाजसेवक स्व. डॉ. व्दारकादासजी लोहिया यांच्यात होती. निराधारांच्या हक्कासाठी झगडणारे लोहिया "बाबुजी" या नावाने प्रसिद्ध होते. ते निराधारांचे समस्या घेऊन कार्यालयात येणार आहेत हे कळताच अधिकाऱ्याची पाचावर धारण बसायची. परंतू त्यांच्या निधनानंतर निराधारांचा वाली हरवल्याची खंत लोक व्यक्त करीत आहेत.

# गणेश मंदिर कमेटीच्या माध्यमातून महिलांनी दिला प्लास्टिक बंदीचा संदेश

■ महासागर प्रतिनिधी हिंगणा, दि. १० :

जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन करण्यासाठी (पर्यावरण पूरक जीवनशैली या अभियाना अंतर्गत नगरपरिषद वानाडोंगरी प्लास्टिक मुक्त वानाडोंगरी बनविण्यासाठी विविध प्रकारच्या उपक्रमांच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक कार्यवाही करत आहे. 10 जून वटसावित्री पौर्णिमा निमित्त महिलांनि विविध ठिकाणी एकत्र येऊन दृढनिश्च केला कीं प्लास्टिकप्रदूषण हि जागतिक समस्या बनली आहे.

दररोज, लाखो टन प्लास्टिक कचरा नैसर्गिकरित्या पर्यावरणात मिसळत आहे, ज्यामुळे हवा, पाणी, वायू, आकाश, धरती पंचतत्वावर आधारित या वसुंधरेला वाचविण्यासाठी लोकसंवादाच्या माध्यमातून जनजागृती मोठ्या प्रमाणात व्हावी याउद्देशाने गणेश मंदिर श्री नगर, बाबडे लेआऊट महाजन वाडी प्रभाग 10 मध्ये प्लास्टिक बंदिवर आधारित



सेमिनार चे आयोजन करण्यात आले होते.

महिलांनी पुढाकार घेऊन विविध माध्यमातून पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करण्यासाठी वानाडोंगरी मध्ये महाजनवाडी, विजयनगर, मातोश्री नगर, वैभव नगर, शहकार ले आऊट येथे लोकसंवाद, शपथ इत्यादीच्या माध्यमातून जनजागृती सुरू आहे पर्यावरण पूरक वस्तूंचा मोठ्या प्रमाणात वापर करून प्लास्टिक बंदी करण्यासाठी एकल उपयोगात येणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंना प्रतिबंध करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. नगरपरिषद वानाडोंगरीचे मुख्याधिकारी राहुल परिहार यांच्या मार्गदर्शनाखाली सदर अभियान राबविल्या गेले तसेच स्वच्छता विभाग प्रमुख निलेश नंदनवार, स्वच्छता निरीक्षक करण चौहान, विनय व्यास, सिटी कोऑर्डिनेटर आचल चव्हाण गणेशमंदिर कमिटीचे पदाधिकारी, छाया पाटील, गजेंद्र काकडे, दीपक बाबडे, शेलूकर, येवले, चित्रा शेळके, नंदिनी कोरड, ज्योती खराबडे हिराबाई काकडे, सहयोगी संस्था गोदरेज, फीडबॅक फाउंडेशन च्या प्रकल्प अधिकारी सविता गजभिये, आणि सहकर्मी यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बहादुरा येथे वृक्षारोपण




■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १० :

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नगर पंचायत बहादुरा तर्फे परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये नगर पंचायत बहादुरा हद्दीत स्मशान भूमी व खरबी परिसरात स्थानिक प्रजातीचे वृक्ष लावण्यात आले.

याप्रसंगी नगरपंचायत बहादुराचे मुख्याधिकारी राजेंद्र चिखलखुंदे, प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, पाणी पुरवठा अभियंता श्रीकांत समर्थ, कर व प्रशासकीय अधिकारी साहस कनाळे, लेखाधिकारी प्रसाद कोरमकर, शहर अभियंता अक्षय झिरपे, शहर समन्वयक सुमित गव्हाळे, अजय भोयर,जीवन बावणे, महेश मांढरे, भावना घुगुसकर, माजी जि. प सदस्य सुभाष गुजरकर, माजी पं. स. सदस्य शुभांगी गायधणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यानंतर वर्षभर नगरपंचायत हद्दीमध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम नगरपंचायत बहादुरा तर्फे घेण्यात येणार असून याकरीता नगरपंचायत बहादुरा तर्फे रोपवाटिका तयार करण्यात आली आहे.

नगरपंचायत क्षेत्रामध्ये नागरीकांनी वृक्ष लागवड करून हरित आच्छादन तयार करण्याचे आवाहन करण्यात आले.

# आदिम रंगभूमि व सांस्कृतिक प्रतिष्ठानास आर्थिक मदत

**नागपूर :** हलबा समाजात नाट्य चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी व नाट्य कलावंतांना रंगमंच ऊपलब्ध करून देण्यासाठी आदिम रंगभूमी व सांस्कृतिक प्रतिष्ठान द्वारा बेसा व वैशाली नगर येथे आयोजित नाट्य प्रशिक्षण शिबिर व सी पी एंड बेरार तुळशीबाग येथे आयोजित नाट्य संमेलनास आर्थिक मदतीचा हात म्हणून आदिम यूथ फाऊंडेशन तर्फे रुपए अकरा हजाराचा मदतनिधी आदिम रंगभूमीचे संस्थापक, तरूण रंगकर्मी, आकाश पौनीकर यांना देण्यात आला. या शिबिराच्या समापन कार्यक्रमात फाऊंडेशनचे सचिव ओमप्रकाश पाठराबे,कोषाध्यक्ष विनायक वाघ, सदस्य गण धनराज पखाले सहित गणमान्य नागरिक ऊपस्थित होते.

# सावित्रीबाई फुलेंच्या आदर्शासह व्हावे वटसावित्रीचे पूजन : प्रगती पाटील



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

वटसावित्री पौर्णिमेचे औचित्य साधून मरार टोली ग्राउंड शिवमंदिर येथे स्त्री सशक्तीकरण उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महिला मोर्चा अध्यक्ष प्रगती पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित महिलांना प्रगती पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

प्रगती पाटील म्हणाल्या, सावित्रीच्या पौराणिक कथेतील निष्ठा आणि समर्पणाच्या भावनेने प्रेरित होऊन आजही अनेक स्त्रिया हा सण साजरा करतात. असे असले तरी स्त्री शिक्षण व सामाजिक सुधारणांसाठी झटणा-या सावित्रीबाई फुले यांचा आदर्शदेखील महिलांना ठेवला पाहिजे. सावित्रीबाईंचे विचार समानता, शिक्षण आणि महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारे असून त्यांची प्रतिमा प्रत्येकीने आपल्या घरी लावून तिचे पूजन करावे व त्यांचा आदर्श आत्मसात करावा, असे आवाहनदेखील त्यांनी केले.

या कार्यक्रमाला सुचिता नशीने, कविता सरदार, विशाखा जोशी, राखी शिंगारे, कल्पना गजबे, सुचित्रा नशीले, साधना पापडकर, सिमरन कौर, कविता केळवदे, रोशाली बावनकुळ, कविता मेश्राम, प्रीती कश्यप, श्वेता ठाकूर, नीता नेवारे, आरती मसराम, रूपल दोडके यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## अभ्यंकरनगरात द बर्निंग कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

अभ्यंकर नगरातून माटे चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अचानक एका चालत्या कारने पेट घेतला. चालकाने वेळीच कारमधून बाहेर निघून स्वःताचा जीव वाचवला. ही घटना रविवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. काही मिनिटांतच अग्निशमन दलाचे दोन बंब पोहचले. त्यांनी पाण्याचा मारा करुन आग विझवली. मात्र, कार पूर्णपणे जळून खाक झाली होती. लक्ष्मीनगर ते माटे चौकाकडे जाताना मध्ये असलेल्या अभ्यंकर नगर चौकातून एक कार भरधाव जात होती. मात्र, कारमध्ये आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे चालत्या कारने पेट घेतला. चालकाच्या लगेच लक्षात आले. त्याने कार रस्त्याच्या कडेला उभी केली.

# नागरिकांनी घरकुल योजनेचा लाभ घ्यावा : आ. समीर मेघे




■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :

पंतप्रधान योजनेअंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत वेगवेगळ्या प्रकारचे लाभ मिळतात. शहरी भागासाठी 'पीएम आवास योजना - शहरी' आणि ग्रामीण भागासाठी 'पीएम आवास योजना - ग्रामीण' अशी विभागणी केली आहे. या सर्व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार समीर मेघे यांनी केले. वाडी येथील फ्लॅट क्रमांक १०४, कुमार रेसिडेन्सी -५, टोल प्लाझा समोर, काटोल बायपास मार्गावरील आरंभ बिल्डकॉनचे उदघाटन आमदार समीर मेघे यांनी केले. त्यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक व संचालन आरंभ बिल्डकॉनचे संचालक जितेंद्र रहांगडाले यांनी तर आभार गायत्री रहांगडाले यांनी मानले. सर्वप्रथम आरंभ बिल्डकॉनचे संचालक जितेंद्र रहांगडाले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी वाडी न.प. चे माजी उपाध्यक्ष नरेश चरडे, माजी नगरसेवक राकेश मिश्रा, कमल कनोजे, बापू लिमकर, राकेश शिवणकर, अरुण सिंग, मनोज चोपडे सुमेल पमा, नाना चोपडे ,विक्रम तिजारे, रोशन खोडे, रवी चौधरी, सोनाली सामरे, प्राची शुक्ला, योगिनी इंगोले, नूतन रामटेके उपस्थित होते.

# प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि रेल्वे विभागामार्फत पर्यावरण जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

पर्यावरण दिनानिमित्त, पर्यावरण संरक्षणात जबाबदारीने आपली भूमिका बजावण्यासाठी, आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागाने विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली, पर्यावरण संरक्षण जागरूकतेसाठी विभागातील प्रमुख स्थानके आणि रेल्वे परिसर/रेल्वे वसाहतींमध्ये दररोज थीमनुसार जागरूकता, संवाद आणि वर्तन बदल यावर केंद्रित उपक्रम आणि पर्यावरण जागरूकता कार्यक्रम आयोजित केले, ज्यांचा उद्देश लोकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवणे आणि संवर्धनाला प्रोत्साहन देणे हा होता. याचं अनुषंगाने, दि. ०९ जून रोजी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय नागपूर-१ च्या प्रादेशिक अधिकारी धन्यश्री पाटील आणि उपप्रादेशिक अधिकारी नागपूर-१, शीतल उधाडे (क्षेत्र अधिकारी) यांनी विभागातील अधिकारी/कर्मचारी/



स्थानक व्यवस्थापक यांच्या सहकार्याने नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी स्थानकावर संयुक्त पर्यावरण जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले

रेल्वे कर्मचारी आणि प्रवाशांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शपथ घेतली, ज्यामध्ये त्यांनी प्लास्टिकचा वापर कमी करून हिरवेगार वातावरण निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली. प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करण्यासाठी प्रवाशांना कापडी पिशव्या वाटण्यात आल्या. एकूण १२३० कापडी पिशव्या वाटण्यात आल्या.

रेल्वे स्थानकावरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सच्या चालकांना एकदाच वापरता येणारे प्लास्टिक न वापरण्याची जाणीव करून देण्यात आली. त्यांना पर्यावरणाप्रती जबाबदार राहण्याचा आणि पयार्यी पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्ला देण्यात आला.

या कार्यक्रमाचा उद्देश रेल्वे परिसर प्लास्टिकमुक्त करणे आणि सामान्य लोकांना पर्यावरणाविषयी जागरूक करणे हा होता.

# ३८ उत्कृष्ट तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकीट तपासणी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ३८ कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी दीपककुमार गुप्ता यांनी अशा उपक्रमांमुळे केवळ रेल्वेच्या महसुलात वाढ होणार असे नाही, तर प्रवाशांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा अनुभवही मिळेल. इतर कर्मचाऱ्यांनीही कायार्तून प्रेरणा घ्यावी व निष्ठेने कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या नेतृत्वात विभागात सतत तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येते. या मोहिमेद्वारे विनातिकिट प्रवासाला आळा घालण्याबरोबरच अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई केली जाते. या मोहिमेत तिकिट तपासणी भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्यांच्या कायार्ची दखल घेत विभागाकडून त्यांना सन्मानित करण्यात आले. नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या हस्ते अधिक महसूल मिळविण्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मुख्य वाणिज्य निरीक्षक, उप मुख्य वाणिज्य निरीक्षक, वरिष्ठ तिकिट तपासणी कर्मचारी अशा १५ कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. या उद्देशाने विश्व पर्यावरणदिनानिमित्त दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून पर्यावरणाबद्दल जनजागृती करण्यात आली. दपूम रेल्वे नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता मार्गदर्शनात विभागातील विविध रेल्वेस्थानकांवर आणि रेल्वे परिसरात पोस्टर्स व माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

# समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत करार कर्मचारी यांना शासनसेवेत कायम सामावून घेण्यात यावे : भाऊराव पत्रे

■ महासागर प्रतिनिधी बेला, दि. १० :

राज्यात केन्द्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत सन 2001-02 पासून राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता, संगणक प्रोग्रामर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, जिल्हा समन्वयक (बालरक्षक), जिल्हा समन्वयक (मुलींचे शिक्षण), संशोधन सहाय्यक, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वरीष्ठ सहाय्यक (आस्थापना), वरीष्ठ सहाय्यक (लेखा), वाहन चालक, एमआयएस को ओर्डीनेटर, विषय साधनव्यक्ती अशा विविध पदावर करार पध्दतीने कर्मचारी कार्यरत आहेत.

या सर्व कर्मचाऱ्यांना शासनसेवेतून कायम सामावून घेण्याची मागणी शिक्षक भारती नागपूर विभागीय अध्यक्ष भाऊराव पत्रे यांनी मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री यांना पाठवलेल्या निवेदनातून केली आहे. शिक्षण विभागातील



प्रत्येक उपक्रम यशस्वी करण्यात समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.

त्यांची निवड जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून जाहिरातीव्दारे बिंदूनामावलीनुसार करार पध्दतीने नियुक्ती झाली असून या कर्मचाऱ्यांनी इतरत्र नोकरीसाठीची वयोमर्यादा ओलांडलेली आहे. या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन अत्यल्प असून महागाईच्या काळात कुटूंबातील गरजा पुर्ण करणे अत्यंत कठीण होत आहे.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत करार कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासंबंधाने दि. 22 जुलै, 2024 रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे सदर कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत अभ्यास समिती गठीत करण्यास्तव निर्देशित करण्यात आलेले आहेत. तसेच दि. 06.08.2024 रोजी मुख्यमंत्री यांनी समग्र शिक्षा अंतर्गत दिव्यांग विद्याध्यर्थ्यांना सेवा देणारे जिल्हा समन्वयक समावेशित शिक्षण, तालुका समन्वयक व विशेष शिक्षक असे एकूण 3105 कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत धाडसी निर्णय घेण्यात आला आहे. राज्यामध्ये सदर अभियानात सुमारे 6176 अधिकारी/ कर्मचारी कार्यरत असून उर्वरित अधिकारी/ कर्मचारी यांच्यामध्ये व्यवस्थापन अंतर्गत 551 व कार्यक्रम (उपक्रम) अंतर्गत 2520 असे एकूण 3071 कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.

# अवैध देशी दारुची वाहतुक करणारा आरोपीला अटक

## वाहनासह ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी कन्हान, दि. १० :

अवैध देशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीला कन्हान पोलीसांनी पकडुन त्याचा जवळुन ५३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त माहिती नुसार शनिवार (दि.७) जुन रोजी सायंकाळी ६:३० वाजता च्या दरम्यान पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, अमोल नागरे, जीवन विघे, मोहित झाडे, अश्विन गजभिए सह आदि पोलीस कर्मचारी अवैध धंद्यावर कारवाई



करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि गांधी चौक कडुन एक इसम बजाज चेतक मोपेड दुचाकी वाहन. क्रमांक एम. एच.४०.सी.के.८०३० वर लाल रंगाचे बोरीत देशी दारु बाळगुन आंबेडकर चौक कडे येत आहे.

अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी आंबेडकर चौक येथे नाकाबंदी केली असता एक इसम बजाज चेतक मोपेड वाहनाने वाहतुक करतांनी मिळुन आला, थांबण्याचा ईशारा केला असता चालकाने वाहन थांबविले. पोलीसांनी वाहनाची पाहणी केली असता एक लाल रंगाची प्लॅस्टीकची बोरी दिसुन आली. बोरी खोलुन पाहिले असता बोरीमध्ये एकुण १०० प्लॅस्टीकचा निपा देशी दारु भिंगरी संत्रा नं. 1 च्या सिलबंद प्रत्येकी १० एम. एल. चा प्रत्येकी किंमत.३५ रुपए प्रमाणे एकुण ३५००रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. चालक शुभम नामदेव रंगारी (वय २२) रा.कन्हान याला दारु बाबत परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगीतल्याने पोलीसांनी चालकास अटक करुन त्याचा जवळुन १०० प्लॅस्टीकचा देशी दारु निपा ३५०० रुपए आणि बजाज चेतक मोपेड वाहन किंमत ५०,००० रुपए असा एकुण ५३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.


## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपुर

एम.जे.सी. नं. ४५/२०२५ — पे.ता.: ०२/०७/२०२५

प्रोसेस नं. ६५६/२०२५ (दि. ०२/०६/२५)

Applicant's : 1. Kunal S/o Anil Gajway, Aged 36 Years, Occu. Private,
2. Ashishkumar S/o Anil Gajway, Aged 37 Years, Occu. Private,
3. Vijay S/o Padamchand Gajway, Aged 75 Years, Occu. Retired,
All R/o. Near Porwal College Gautam Nagar, Juni Chawani, Kamptee Th. Kamptee Distt. Nagpur - 441111,

---- V/S ----

Non applicant :- NIL

मयत:- १. Late Padamchand S/o Gourishankar Gajway, मयत दि २४/१२/१९७८ ठिकाण - गौतम नगर कामठी तह कामठी जि नागपूर २. Late Jaywanti w/o Padamchand Gajway, मयत दि.२०/०९/१९८० ठिकाण - गौतम नगर, कामठी तह कामठी जि. नागपूर ३. Late Anil s/o Padamchand Gajway, मयत दि २३/१२/२०२३ ठिकाण - गौतम नगर कामठी तह कामठी जि नागपूर ४. Late Smita w/o Anil Gajway, मयत दि १९/०३/२०२१ ठिकाण - गौतम नगर, कामठी तह कामठी जि. नागपूर

सदरहु अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत १.Late Padamchand S/o Gourishankar Gajway, मयत दि.२४/१२/१९७८ ठिकाण गौतम नगर, कामठी तह कामठी जि नागपूर २.Late Jaywanti w/o Padamchand Gajway, मयत दि २०/०९/१९८० ठिकाण गौतम नगर, कामठी तह कामठी जि नागपूर ३.Late Anil s/o Padamchand Gajway, मयत दि २३/१२/२०२३ ठिकाण गौतम नगर कामठी तह कामठी जि नागपूर ४.Late Smita w/o Anil Gajway, मयत दि १९/०३/२०२१ ठिकाण गौतम नगर, कामठी तह कामठी जि नागपूर यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क स्तर, कामठी यांनी दि.०२/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीराद्वारे सर्व सबधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराना 1. Late Padamchand S/o Gourishankar Gajway, 2. Late Jaywanti w/o Padamchand Gajway, 3. Late Anil s/o Padamchand Gajway, 4. Late Smita w/o Anil Gajway, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक / / २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार,
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहीर सूचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री राघो जानबा भोयर रा. धवळपेठ, ता. जि. नागपुर यांनी १) श्री. रविंद्र पांडुरंग बानाइत, २) श्री. सुनिल पांडुरंग बानाइत, ३) श्री. अनिल पांडुरंग बानाइत सर्व रा. गोटाळ पांजरी, तह. जिल्हा- नागपुर यांच्या संयुक्त मालकी कब्जातील खालील वर्णनाची शेतजमीन विकत घेण्याचा सौदा केलेला आहे.

-: स्थावर शेतजमीनचे वर्णन :-

ग्रामपंचायत- शेडेश्वर, तालुका-उमरेड, जिल्हा-नागपूर येथील

| मौजा | भू. क्र. | खाते क्र. | प.ह.न. | हे. आर. | जमा रु. | भोगवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| बोरगांव (मजरा) | ६८/१ | ८१ | ३० | २.२८ हे.आर. | रु. ४.५० | १ |

वरील स्थावर मालमत्तेबाबत कुणाचे कर्ज, बोझा, वारसान हक्क, न्यायालयीन वाद व इतर हक्क, दावा असल्यास हि जाहीर सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुळ कागदपत्र व लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर येउन भेटावे. मुदतीनंतर माझे पक्षकार विक्रीपत्र करून घेतील याची नोंद घ्यावी.

दि.१०.०६.२०२५

संजय टी. मून, अधिवक्ता
110, विसडम अपार्टमेंट,
रामेश्वरी बस स्टॉप जवळ,
काशी नगर, नागपुर-440027.

# लाव्हयात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

लाव्हा ग्रामपंचायत येथे शिवप्रेम आणि संस्कृती जपणारा शिवराज्याभिषेक दिन उत्साहात सरपंच जोत्सना नितनवरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भगवा ध्वजारोहण व शुभ गुढी उभारून करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त गावामध्ये एकात्मतेचा व देशभक्तीचा संदेश देणारा हा उपक्रम राबविण्यात आला.



यावेळी उपसरपंच रॉबिन शेलारे, माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे, कृषी संचालक महेश चोखांद्रे, ग्रामपंचायत सदस्य संतोष शेंडे, रामेश्वर ढवळे, कपिल खडसे, महिला ग्रामपंचायत सदस्य मनीषा कुमरे,आशा वर्कर उज्वला तभाने, अंगणवाडी सेविका भारती डोईफोडे,सरिता गवई, ग्रामपंचायत जेष्ठ लिपीक सुभाष डोईफोडे, ग्रामपंचायत कर्मचारी सुभाष डोईफोडे, रामकृष्णा धुर्वे, अनुराग वानखेडे, चरणदास धोंगडे, सूर्यवंशी पाटील, प्रतिभा मेश्राम, रुपाली वानखेडे, स्वाती सोनबावणे, सारिका सलामे उपस्थित होते.

या उपक्रमात ग्रामपंचायतीने शिवराज्याभिषेक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व सांगणारे माहितीपर भाष्य सादर केले.

गावकऱ्यांनी राष्ट्रनायक शिवाजी महाराजांचे स्मरण करत उत्साहात सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे गावामध्ये एकात्मता, संस्कृतीचे भान व छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार घडून आला. ग्रामपंचायत लाव्हा यांनी केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आदिवासी विकास परिषदेतर्फे बिरसामुंडा शहीद दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १० :

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग द्वारा दि. 9 जून 2025 रोजी जनायक बिरसा मुंडा यांच्या शहीद दिना निमित्त अंबाझरी टेकडी,नागपूर येथील क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत उईके, विदर्भ अध्यक्ष अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, दिनेश शेराम, जनरल सेक्रेटरी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद विदर्भ विभाग,प्रमुख अतिथी राहुल मसराम, माजी उपसभापती, मुकुंदा उईके,माजी नगरसेवक, सरस्वती सलाम,माजी नगरसेविका, शंभू गोंड कोहचाडे, वनश्री सिडाम ,केंद्रीय महिला सचिव, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, रंजना पुरके, विजय परतीके, राहुल मडावी, सुरेंद्र नैताम, यशवंत मसराम, राम कोडापे, शाम कोडापे, राहुल खंडाते, गोपीचंद गेडाम, रविंद्र पुरकाम, आदी उपस्थित होते.

# नरखेड तहसीलमध्ये अनुदान वाटपात महाघोटाळा

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १० :

खरीप 2024 मध्ये संत्रा मोसंबी फळगळ झाली असल्याने शासनाने ज्या शेतकऱ्यांचे ३३% पेक्षा नुकसान झाले आहे त्यांना हेक्टरी 36000 रुपये अनुदान जाहीर केले होते. या अनुदानामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. परंतु अनुदानाचा आनंद काहींच्या नशिबी घोषणेपुरताच राहिला तर काही सर्वे करणाऱ्या नागपूर जिल्ह्यामध्ये नरखेड तालुक्यातील कर्मचाऱ्यांची मात्र महादिवाळी झाली.

जे शेतकरी गावात राहत नाही,जमीन पडीक आहे किंवा ज्यांची झाडे लहान असून अनुदानास पात्र नाही अशा शेतकऱ्यांना शोधून त्यांच्या नावे संत्रा मोसंबी झाडे नसताना मोठ्या प्रमाणात अनुदान त्यांच्या बोगस खात्यावर वर्ग केले तर काहींना आराजी वाढविण्याकरिता दुसऱ्याच्या ७/१२ जोडून अनुदान देण्यात आले

> अनुदान वाटपात मोठी अफरातफर करून शासकीय कर्मचारी वसुली करत आहेत, दोषींवर कारवाई होईपर्यंत पाठपुरावा करू.
> **सागर दुधाने, क्रांतिकारी शेतकरी संघटना**

> लेखी अर्ज तहसीलदार यांना दिले परंतु काहीच कारवाई केली नाही.
> **धनराज खाडे, शेतकरी शाबासपूर**

व त्यात सर्वे करणाऱ्यांनी 50% भागीदारी ठेवली.

तसेच ज्या पात्र शेतकऱ्यांकडून चिरीमिरी मिळाली नाही त्यांना जाणीवपूर्वक लाभापासून वंचित ठेवल्या गेले.

वरील बाब काही शेतकऱ्यांनी तहसीलदार नरखेड यांना तोंडी व लेखी माहिती देऊन लक्षात आणून दिली असता शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे.

काही पात्र शेतकऱ्यांनी अन्याय झाल्याच्या भावनेतून शेतकरी नेते सागर दुधाने यांची भेट घेतली त्यामुळे त्यांनी या घोटाळ्याचे पाळेमुळे शोधून काढले असता हा जवळपास १६ कोटी रुपयांचा महाघोटाळा उघडकीस आला.

सदर प्रकरण अंगलट येताना दिसताच तहसीलदार नरखेड यांनी असहकार पुकारले व याद्या देण्यास टाळाटाळ करणे सुरू केले होते, परंतु ठिय्या आंदोलनाचे अस्त्र वापरून याद्या मिळवण्यात शेतकरी संघटना यशस्वी झाली.



सदर बाब, ज्या पात्र शेतकऱ्यांना वगळले व ज्यांच्या नावे बोगस पैसे काढण्यात आले अशा शेतकऱ्यांसहित उपविभागीय अधिकारी यांना लक्षात आणून दिली असता त्यांनी कठोर कार्यवाही करण्याची भूमिका दाखवली, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात तत्काळ कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. परंतु अद्यापही नरखेड तहसील प्रशासन "जो होगा, देख लेंगे" याच अहंकाराच्या भूमिकेत असल्याने ही कार्यवाही "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी" अशी शंका शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सर्वे सुरू असताना लक्षात आणून दिले असता टाळाटाळ करून मला जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले- **पुरुषोत्तम रामपुरे, शेतकरी सिंजर**

# महिलांनी "सावित्रीबाईच्या अदम्य निष्ठेचे" केले स्मरण

## सौभाग्याची प्रार्थना करत वडाच्या वृक्षाची पूजा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

वाडी परिसरात वटसावित्री व्रत पारंपरिक पद्धतीने व श्रद्धेने साजरे करण्यात आले. विवाहित महिलांनी सौभाग्य व पतीच्या दीघार्युष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करून वटसावित्री व्रताचे पालन केले.

सकाळी ११ वाजता पासूनच महिला पारंपरिक वेशभूषेत, हातात पूजेच्या सामग्रीसह वडाच्या झाडाजवळ जमल्या. वडाच्या फांद्या दोरीने सात फेऱ्यांत गुंडाळत पूजन, कथा वाचन व आरती करण्यात आली.

वटसावित्रीच्या निमित्ताने काही ठिकाणी सामूहिक पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी "सावित्रीबाईच्या अदम्य निष्ठेचे" स्मरण करत सामाजिक ऐक्याचा आणि स्त्रीशक्तीचा आदर्श संदेश दिला.

या व्रतामुळे स्त्रियांच्या श्रद्धा, निष्ठा आणि परंपरेशी असलेल्या नात्याचे दर्शन घडते. अनेक महिलांनी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही आपले अनुभव आणि पूजनाचे फोटो शेअर केले.

## जेंडर इक्वलिटी ऑर्गनायझेशनने केले स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १० :

पुरुष आयोग झाला पाहिजे या मागणीसाठी बाईक रॅलीच्या माध्यमातून फरीदाबाद वरून निघालेली रॅली ही पवित्र दीक्षाभूमीवर पोहचली आणि जेंडर इक्वलिटी ऑर्गनायझेशन च्यावतीने त्यांचं नागपूर शहरात स्वागत केलं आणि त्यांच्या सोबतच नागपुरातील 15 बाईक रायडर्स सहित दिल्लीला रवाना झाले. देशभरात पुरुषांवर अन्याय अत्याचाराविरुद्ध बाईक रॅली फरीदाबाद वरून निघाली त्यात लखनऊ पटना राची कोलकत्ता भुवनेश्वर विशाखापट्टण नागपूर हैदराबाद बेंगलोर चेन्नई मदुराई कन्याकुमारी बेंगलोर, गोवा -कोल्हापूर, पुणे ,मुंबई -सुरत अहमदाबाद, उज्जैन-भोपाल - ग्वालियर- पानिपत चंदिगड- जम्मू -कारगिल- लदाख -मनाली व दिल्लीपर्यंत ही बाईक रॅली काढण्यात आली आहे. पुरुषांवरही अन्याय होतो त्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुष आयोग ही झाला पाहिजे यासाठी दिल्लीला रवाना झाले.

# माजी विद्यार्थ्यांची २५ वर्षांनी पुन्हा भरली शाळा



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १० :

पंचवीस वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली. विद्यार्थ्यांनी त्याकाळी बाकांवरच्या मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. काटोल येथील बनारसीदास रुईया हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे. 2001, 2002 साली दहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे रौप्यमहोत्सवी स्नेहसंमेलन नुकतेच बनारसीदास रुईया हायस्कूल पार पडले.

यावेळी उपस्थित शिक्षक धांडे, राठी, बोडखे, जीरापुरे, पिंपलकर, सोमकुवर, चोपडे, यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी जीवन अंभोरे, अमीत हाटेकर, हर्षद धवड, ऋषिकेश काळे, नीलिमा ढोणे, राजश्री पंचभाई, मंगेश गुड्धे, यांनी केले तर संचालन प्रतीक सूर्यवंशी, राजश्री कठाने, तर आभार धनश्री पाबळे, दिनेश बानाबाकोडे, यांनी केले त्याचप्रमाणे शाळेतील कर्मचारी ढगे बाबूजी, सुनील खोब्रागडे, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नीलिमा ढोणे, रूपाली धवड, राजश्री कठाने, पुनम राऊत, दीना चरडे, राजश्री पंचभाई, दिपमाला चापके, उज्वला ठाकरे, धनश्री पाबळे, मिताली खडसे, समीक्षा क्षीरसागर, रजनी वाघमारे,पुनम राऊत, ऋषिकेश काळे, हर्षद धवड, अमित हाटेकर, मोरेश्वर पंचभाई, मनोज आगरकर, जीवन अंभोरे, मंगेश गुड्धे, दिनेश बानाबाकोडे, किशोर वाळके,धनंजय थोटे, मनोज सांबारे, सारंग निर्मल, मनोज डंभाळे, प्रतीक सूर्यवंशी, राजश्री कठाने उपस्थित होत्या.

# निर्मयी माहुरे इंडियन फोल्क श्रेणीत द्वितीय



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

पणजी ( गोवा ) येथे पार पडलेल्या कला अकॅडमी नृत्य स्पर्धेत ब्लॉसम नृत्य अॅकेडमीची विद्यार्थीनी निर्मयी मंगेश माहुरे हिने इंडियन फोल्क श्रेणीत द्वितीय क्रमांक पटकवला आहे. बॉलीवूड नृत्य कोरियोग्राफर वैभव घुगे, लावणी किंग शुभम बोराडे यांच्या हस्ते निर्मयीला ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी अखिल नटराजन आंतर सांस्कृतिक संघ, नागपूर यांनी सहकार्य केले. या स्पर्धेत वेगवेगळ्या राज्यातील मुला मुलींनी भाग घेतला होता.

यामध्ये इंडियन फोल्क, बॉलीवूड, मॉडर्न बॉलीवूड, क्लासिकल, लावणी, भारतनाट्यम अशा वेगवेळ्या श्रेणीत नृत्य सादर केले.बॉलीवूड स्पर्धेत प्रथम जीविका मयूर येंडे, द्वितीय क्रमांक पर्णवी वानखेडे, सान्वी देशपांडे, रिदान भोयर यांनी पटकावला.

# विकसित कृषि संकल्प अभियान अंतर्गत

## सुकळी (घा.) येथे जैविक निविष्ठा संसाधन केंद्राचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १० :

केंद्र शासनाच्या विकसित कृषि संकल्प अभियान अंतर्गत हिंगणा तालुक्यात कृषि विज्ञान केंद्र नागपूर, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, आत्मा, कृषि विभाग व अंबुजा फाऊनडेशन यांनी संयुक्तपणे लखमापूर, सुकळी (घा) व पिपलळधरा या गावात शेतकरी सभेचे आयोजन केले.

सदर कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया, पीक नियोजन, एकात्मिक किड व खत व्यवस्थापन तसेच कृषि क्षेत्रातील विविध उपक्रम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी सुकळी (घा) येथे नैसर्गिक शेती मिशन या योजने अंतर्गत "श्री.गजानन महाराज नैसर्गिक शेतकरी गटास" अनुदानत्त्वावर देण्यात आलेल्या जैविक निविष्ठा संसाधन केंद्राचे उद्घाटन आत्माच्या प्रकल्प संचालक डॉ.अर्चना कडु यांच्या हस्ते करण्यात आले. याकार्यक्रमाचे अध्यक्ष रजनी टोंगे तसेच उपसरपंच जयंत दहीकर उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून कृषी विज्ञान केंद्रचे विषय विशेषज्ञ सुनीता चौहान, डॉ. मयुर मेश्राम केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. रचना पांडे, तसेच कृषि महाविद्यालय नागपूरचे डॉ. विनोद खडसे उपस्थित होते.

हिंगणा तालुक्याच्या तालुका कृषी अधिकाऱ्यांनी अॅग्रीसटॅक अंतर्गत शेतकरी आयडी बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन आत्मा चे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक संदिप चिंचुलकर, सहाय्यक कृषि अधिकारी प्रणय फुले, सुनील गायधनी गटाचे अध्यक्ष मनोज पोहनकर, उपाध्यक्ष वैजयंती गोखले, रमेश वराडकर यांनी यशस्वीरीत्या केले. सदर कार्यक्रमात हिंगणा कृषि कार्यालयातील सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सह गावातील मोठ्या संख्येने शेतकरी व महिला उपस्थित होते.

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक दि. १० :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक तर्फे गुरुवार, दि. ५ जून २०२५ रोजी पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विश्वविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



विश्वविद्यालयाचा परिसर हा हरितप्रणित आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुरस्कृत केलेल्या एक पेड माँ के नाम या अभियानाला प्रतिसाद देत, कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या माननीय कुलगुरूंनी रामटेक परिसरात वृक्षारोपण केले. विश्वविद्यालयाचा रामटेक मधील परिसर हिरवागार आहे व तो तसा राहिल याची सर्वतोपरी काळजी घेतली जाते. यासाठी पारंपरिक वृक्षारोपणासह मियावाकी जंगल ही संकल्पना राबवून एका विशिष्ट भूभागावर झाडांची लागवड करण्यात आली आहे. शुद्ध प्राणवायू मिळावा आणि परिसर हरित राहावा यासाठी ही विशेष योजना आहे. याशिवाय स्वतंत्र जागेवर फलपाखरांसाठी बाग तयार करण्यात आली आहे. विश्वविद्यालयाच्या हरितपरिसराचे लक्ष्य विश्व पर्यावरण दिनाच्या निमित्ताने पुनश्च पूर्ण करण्यात आले.

विश्वविद्यालयात पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापिठाचे कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण अभियानाकरिता सामाजिक वनीकरण विभागातर्फे वनपाल वनपाल एन.एन. केन्द्रे, आर.आर.शुक्ला व त्यांचे सहकारी धारणे यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या विशेष उपस्थितीत आणि शुभहस्ते आंब्याच्या रोपटांचे रोपण करण्यात आले.

याप्रसंगी विश्वविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी उपकुलसचिव डॉ. रोशन अलोणे, डॉ. स्मिता फडणवीस, सहायक कुलसचिव श्रीपाद अभ्यंकर, उपअभियंता संतोष वाडीकर आणि विजय जामणकर यांनीही वृक्षारोपण अभियानात सोत्साह सहभाग घेवून रोपटे लावले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाच्या उद्यान विभागाचे विशेष सहकार्य लाभले.

## नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना 90 टक्के अनुदानावर 9 ते 18 अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. चालू वर्षाकरीता पात्र ठरलेल्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे. योजनेच्या अटी व शर्ती - अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान 80 टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमला मर्यादा ३.५० लाख रुपये इतकी राहील.

## विवाह करणाऱ्या दाम्पत्यांसाठी

# कन्यादान योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेतर्गत सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या वधूच्या पालकास पंचवीस हजार व संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे चार हजार रुपये अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत २०२५-२६ वषार्साठी 30 जूनपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सामूहिक विवाह सोहळयात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांनी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या संस्थेमार्फत आवश्यक कागदपत्रांसह 30 जूनपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. समाज कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. लाभार्थ्यांनी वेळेपुर्वीच अर्ज सादर केल्यास या योजनेंतर्गत लाभ मिळू शकतो. यासाठी कुठल्याही अमिषाला बळी न पडता लाभार्थ्यांनी थेट संपर्कही साधल्यास माहिती देण्याची व्यवस्था आहे. पात्रतेचे निकष - वधू व वर महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आसावेत. नवदाम्पत्यातील वधु वरापैकी दोन्ही किंवा एकजण हे अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवगार्तील असावेत. दांपत्यापैकी वराचे वय 21 व वधूचे वय 18 वषार्पेक्षा कमी असू नये. वधु व वर यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. योजनेचा लाभ विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरिता देखील अनुज्ञेय राहील. जातीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे.

स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, स्थानिक नोंदणी अधिनियम, 1960 व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1850 अंतर्गत नोंदणीकृत असावी. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी किमान 10 दाम्पत्ये (20 वधू व वर) असणे आवश्यक राहील. सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी क्षेत्रबंधन लागू होणार नाही. अर्ज असा करावा - ज्यांना सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह करावयाचा आहे त्या संस्थेमध्ये शासन निर्णयात दिलेल्या अर्जाच्या नमून्यानुसार शासन निर्णयात नमूद निकषानुसार परिपूर्ण अर्ज सादर करावा.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४० प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १० :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. मंगळवार (ता.10) रोजी शोध पथकाने 40 प्रकरणांची नोंद करून ४४,५००/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत २१ प्रकरणांची नोंद करून ८४००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून १६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 19 प्रकरणांची नोंद करून २५,५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्क शॉप, गॅरेज व इतर दुरुस्तीचे व्यवसायिकांने रस्ता, फूटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.



सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १० प्रकरणांची नोंद करून २,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 5 प्रकरणांची नोंद करून 5,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या श्री. प्रियदर्शन हांडे यांनी अस्थायी स्वरुपात फुटपाथवर हंट उभारल्या प्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले. धरमपेठ झोन अंतर्गत मे. गुरुनानक हार्डवेअर प्रिंट अँड इलेक्ट्रिकल यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. हनुमान नगर झोन अंतर्गत येणाऱ्या दुर्गा बिल्डर्स यांच्यावर रस्त्यालगत सी अँड डी कचरा टाकल्या प्रकरणी रु. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. शुभम किराणा शॉप आणि राज प्लास्टिक यांच्याकडून प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल प्रत्येकी रु. 5,000/- असे एकूण 10,000/-हजार रुपयांचा दंड वसुल केला.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत निनावे किराणा शॉप यांच्याकडून प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. लकडगंज झोन अंतर्गत मे. मितवा रेस्टोरेंट यांच्याकडून रस्त्यालगत कचरा पसरविल्या प्रकरणी कारवाई करीत रु. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तर मंगळवारी झोन अंतर्गत डॉ. विजयपाल सोनटक्के यांनी मोठ्या प्रमाणात रस्त्यालगत झाडांच्या फांद्या टाकल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने 8 प्रकरणांची नोंद करून रू. 40,000/- दंड वसूल केला.

# मनपा शाळेच्या बोलक्या भिंतींचा विद्यार्थ्यांशी संवाद

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १०

मनपा शाळांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेने ठोस पावले उचलली असून, नव्या शैक्षणिक सत्राच्या तयारी लागली आहे. शाळेतील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांकरीता सकारात्मक आणि सुंदर वातावरण तयार होईल याकरिता शाळेच्या भिंतीवर सुंदर आणि आकर्षक चित्रे काढण्यात आली आहे. यामुळे या भिंती जूण काही बोलत आहेत असे वाटत आहे. बोलक्या भिंतीचा हा उपक्रम विद्यार्थी व पालकांना आकर्षित करीत आहेत.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी मार्गदर्शनानुसार अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या नेतृत्त्वात आणि शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार बनविण्यावर भर दिला जात आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण यश मिळविल्याने मनपा शाळेबाबत विद्यार्थ्यां आणि पालकांमध्ये आशा जागृत झाली आहे. स्वःत मनपा अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी पालकांशी संवाद साधत मनपा शाळेत आपल्या पाल्यांचे प्रवेश करण्यासाठी प्रेरित केले.

यावर्षी जूनच्या अखेरीस नवीन मनपाच्या शैक्षणिक सत्र सुरु होणार आहे. याकरीता शाळेत जोरदार तयारी सुरु आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागातील मनपाच्या 5 शाळांना




### भिंतीवर सुंदर आणि आकर्षक चित्रांमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये उत्साह

विद्यार्थ्यांसाठी अधिक आकर्षक आणि प्रेरणादायी बनवण्याच्या उद्देशाने भिंतींवर रंगीत चित्र काढण्यात आली आहेत. द हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट अंतर्गत डब्लयूसीएल सीएसआर निधी अंतर्गत जिचकार फाऊंडेशनच्या माध्यमातून मनपा शाळेतील शैक्षणिक वातावरण सुधारण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी मनपाच्या 5 शाळांचे चित्र बदलविण्यात आले आहे. शाळेमधील विविध दुरुस्ती कामासह, रंगरंगोटी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवसापासून शाळा आकर्षक वाटावी, यासाठी शाळेच्या भिंती बोलक्या करण्यात आल्या आहेत.

शाळेत काही ठिकाणी विज्ञानाच्या शोधाचे चित्र आहेत, तर काही ठिकाणी विमान, गणित, विज्ञान, खगोल, कार्टून, जंगल, वन्यजीव आणि अक्षरज्ञानाने सजवलेली चित्रे काढण्यात आली आहे. बोलक्या भिंतींमुळे शाळेचे वातावरण अधिक आकर्षक, उत्साहवर्धक, ज्ञानवर्धक आणि मनोरंजनात्मक बनवून विद्यार्थ्यांना नवीन शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविणे हा या मागे उद्देश आहे. शिवाय काही शाळांचे मैदानात सुद्धा दुरुस्ती करण्यात आले आहेत. याशिवाय नवीन सत्रात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उत्साह अधिक कायम रहावा याकरीता वर्गखोल्यांची स्वच्छता, विद्यार्थ्यांकरीता बसण्याची चांगली व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे. शाळांमधील हे रंग मुलांच्या मनात शिक्षणाबद्दल आवड निर्माण करण्यास उपयुक्त ठरणार आहे. अशा प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण झाली आहे. तसेच शिक्षकांनाही दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अधिक समक्ष बनविण्यास हातभार लावले आहे.




### मार्ट क्लासेस आणि कृती आधारित शिक्षणावर भर

नागपूर महापालिकेतर्फे नवीन वर्षाच्या नवीन सत्रात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता नवीन गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. काही शाळांमध्ये डिजिटल स्मार्ट क्लासेस सुरू होत आहेत. काही ठिकाणी कृती-आधारित शिक्षण पद्धतीवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विद्यार्थी फक्त पाठ्युपस्तकांपुरते मर्यादीत राहू नये याकरीता शाळेत क्रीडा, कला आणि हस्तकला, संगीत आणि ग्रंथालयाच्या वापरालाही प्रोत्साहन दिले जात आहे.

# गोवंशांची तस्करी करताना मालवाहू पकडला

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १० :

पाचपावली पोलिसांनी मोतिबाग परिसरात एकामागेएक दोन कारवाई करून 10 गोवंशांचे प्राण वाचवले. गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून पोलिसांनी गोवंशांनी भरलेले मालवाहू पकडले. तर माताटोली परिसरात धाड टाकून 5 गोवंशांची सुटका केली. पोलिसांनी दोन्ही प्रकरणात गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. दोघे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. जावेद खान नासिर खान (40) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

रविवारी सकाळी 7.10 वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एका मालवाहूतून गोवंशांची कत्तलीसाठी तस्करी केली जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. 8.40 वाजताच्या सुमारास पोलिसांनी मोतिबागच्या राय आशियाना सोसायटीजवळ एमएच-31/सीक्यू-6790 क्रमांकाचे मालवाहू संशयितरित्या जाताना दिसले. पोलिसांनी वाहन अडवून पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता त्यात 5 लहान-मोठ्या गोवंशांना अत्यंत क्रुरतापूर्ण बांधून ठेवलेले आढळले. तेथे त्यांच्यासाठी चारा-पाण्याचीही व्यवस्था नव्हती. पोलिसांनी वाहन चालक जावेद याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने, ते गोवंश गांधीबाग परिसरात राहणाऱ्या सलमान कुरेशी याने डोबीनगर येथे पोहोचविण्यासाठी दिली असल्याची माहिती दिली. पोलिसांनी वाहन आणि गोवंशासह 5 लाख 25 हजार 200 रुपये किंमतीचा माल जप्त करून सलमान आणि जावेदविरुद्ध प्राणी क्रुरता अधिनियम आणि प्राणी संरक्षण अधिनियमाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला.

दुसरी कारवाई मोतिबागच्या माताटोली परिसरात करण्यात आली. वरील कारवाई सुरू असतानाच पोलिसांना माहिती मिळाली की, छोटी रेल्वे लाईन परिसरात काही गोवंशांना कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आले आहे. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तेथे धाड टाकली असता 5 गोवंशांना चारा-पाण्याविना अत्यंत निर्दयतेने बांधून ठेवलेले होते. पोलिसांनी गोवंशांची सुटका करून गोरक्षणमध्ये पाठवले.

# मेडिकलमध्ये २५० रोबोटिक शस्त्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १०



रोबोटने आता वैद्यकीय क्षेत्रातही प्रवेश केला असून मेडिकल रुग्णालयात त्याचा वापर केव्हाच सुरू झाला आहे. रोबोटने शस्त्रक्रिया करणारे मेडिकल राज्यातील पहिलेच शासकीय रुग्णालय ठरले आहे, हे विशेष. सामान्य शस्त्रक्रियेतील रोबोटिक्स एक परिवर्तनकारी झेप आहे. तिचे वैशिष्ट्य म्हणजे रुग्णांची अधिक काळजी घेण्यासाठी तंत्रज्ञान, अचूकता व कमीत कमी आक्रमक तंत्रांचे मिश्रण केले जाते. रोबोटिक सिस्टीम त्रिमितीय दृश्यमानता, थरथर कमी करणे व लहान चिरांमधून ऑपरेट करण्याची क्षमता प्रदान करते.

2000 च्या दशकाच्या सुरुवातीला भारताला रोबोटची ओळख होऊन रोबोटिक सर्जरी सुरू झाली. सध्या देशभरातील फक्त 220 रुग्णालयांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रिया आहे. रोबोटिक्सचा मर्यादित अवलंब होण्याची कारणे म्हणजे उच्च प्रारंभिक खर्च, 2 स्तरीय व 3 स्तरीय शहरांमध्ये मर्यादित प्रवेश, प्रशिक्षण व जागरूकतेचा अभाव.

यकृत, कोलोरेक्टल, हर्निया, बॅरिएट्रिकसह बहुतांश सामान्य शस्त्रक्रिया हा रोबोट करतो. एचपीबी रोबोटिक दृष्टिकोनामुळे अधिक अचूकता व नियंत्रण मिळते. शल्यचिकित्सक सुधारित कौशल्याने प्रक्रियाकरू शकतात, ज्यामुळे कमी गुंतागुंत व पुनर्प्राप्तीचा वेळ 250 कमी होतो. सर्जन हायडेफिनिशन,व्हिज्युअलायझेशनमुळे नाजूक रचनांमध्ये विशेषतः कॅन्सरसारख्या जटिल प्रकरणांमध्ये अधिक सहजपणे नेव्हिगेट करू शकतात.अत्यंत मदतीची रोबोटिक आर्म्स शिवण व जाळीच्या प्लेसमेंटसाठी वाढीव अचूकता प्रदान करतात. दीर्घकालीन परिणाम चांगले होतात. विशेषतः जटिल शरीररचना असलेल्या रुग्णांसाठी अधिक अचूकता प्रदान करतात. सर्जन अधिक अचूकतेने काम करू शकतात, अधिक जटिल हालचाली करू शकतात व आजूबाजूच्या ऊतींना कमी दुखापत होऊन पोहोचण्यास कठीण भागात प्रवेश करू शकतात. शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात झूम इन करण्याची क्षमता, हाताच्या थरथरण्याचा प्रभाव कमी करणे व शस्त्रक्रियेच्या जागेचे 3डी व्हिज्युअलायझेशन प्रदान करणे हे ऑपरेटिंग रूममध्ये या प्रणालीच्या वाढत्या वापरात योगदान देणारे काही प्रमुख घटक आहेत, असे ज्येष्ठ सर्जन तसेच मेडिकलचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी सांगितले.

रोबोटिक शस्त्रक्रियेपुढील आव्हानेही अनेक आहेत. रोबोटिक प्रणालींचा उच्च खर्च व त्यांची देखभाल ही व्यापक अवलंबनात सर्वात महत्त्वाची अडचण आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण ही दुसरी अडचण. ही प्रणाली सर्जनच्या कौशल्यांना मदत करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी डिझाईन केली गेली असली तरी, त्यांच्या वापरात प्रवीण होण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. सध्या रोबोटिक सर्जरीला जागा मोठी लागते. त्यामुळे कमी जागा लागेल, अशी ही प्रणाली हवी.

# सव्वा दोन कोटीच्या सिमेंट रस्त्याला एका महिन्यातच गेले तडे

■ स्वप्निल राऊत, काटोल, दि. १०

नगरपरिषद हद्दीतील आय.यु.डी.पी. मधील सव्वा दोन कोटीच्या काँक्रिट रस्त्याचे सदोष बांधकाम केल्यानंतर एका महीण्यातच सिमेंट रस्त्याला खड्डे पडणे, तडा (क्रॅक) गेल्यानंतर त्यावर थातूरमातूर लिपापोती करणे या बाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

याबाबत सविस्तर वृत असे की स्थानिक आय.यु.डी.पी. मधील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत आरघोडे चौक ते ग्रामीण रुग्णालय व पेठबुधवार पुलाच्या पलीकडे जवळपास ७००मीटर सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकाम बांधकाम मार्च महीण्यात पुर्ण झाले करण्यात आले. रस्त्याच्या कामाची अंदाजीत (इस्टीमेटेड कॉस्ट)किंमत सव्वादोन कोटी होती. रस्त्याचे सदोष काम झाल्याने रस्त्याचे सिमेंटीकरण केल्यावर एक महीण्याच्या कालावधीत रस्त्याला काही ठिकाणी तडे गेले व काँक्रिट थर खडबडीत होऊन खड्डे सुध्दा पडले होते . त्यावर नगरपरिषदेने संबधीत कंत्राटदारास दिनांक- 07/04/2023. च्या( क्र.नपका/वि.यो./03/2025 नोटीस देऊन रस्त्याचे वरील पृष्ठभागावरील सिमेंट काँक्रिट थर खडबडीत झाल्याचे व रस्त्यामध्ये काही भागात निर्माण निर्माण झाल्याचे म्हटले होते.



सदर नादुरुस्त काँक्रिट रस्त्याची दुरुस्ती करून रस्ता पुर्ववत करण्यात यावा. सदर कामात निर्माण झालेल्या त्रुट्या व त्याची दुरुस्ती विना विलंब करण्यात यावी

### थातूरमातूर लिपापोती करून निकृष्ठ बांधकाम झाकण्याचा नगरपरिषदेने केला प्रताप

.त्यावर ठेकेदाराने काहीच कारवाई न केल्याने ( दिनांक25/ 04/2025 रोजी क्र.नपका/वि.यो./ 305/2025) दुसरा नोटीस दिला. त्यानंतर नंतर संबधीत कंत्राटदाराने नव्यानेच सिमेंटीकरण झालेल्या रस्त्याची थातूरमातूर दुरुस्ती करतांना कोणत्याच तांत्रिक बाबी ची पुर्तता न करता लिपापोती केली.

यावर सिटीझन फोरम काटोल ने मुख्याधिकारी काटोल यांना दिलेल्या तक्रारीत तीव्र आक्षेप नोंदवित काँक्रिट रस्त्याचे सदोष बांधकाम व त्यानंतर तांत्रिक बाबी नाकारुन केलेली थातूरमातूर दुरुस्ती यावर हरकत घेतली आहे.

सिटीझन फोरमने तक्रारीत म्टल्याप्रमाणे सातशे मीटर लांबीच्या रस्त्याचे सिमेंटीकरण झाल्यावर त्याला एक महीण्यात तडा कशा गेल्या? ( क्रॅक) जातात. त्यावरून रस्त्याचे बांधकाम सदोष असल्याचे स्पष्ट होते.

बांधकामानंतर एका महिन्यात रस्त्याला तडा गेल्या खड्डे पडले. तरी नगरपरिषदेने सदोष रस्ता बांधकामाचे सक्षम शासकीय (व्हिएनआयटी किंवा तत्सम) यंत्रणेमार्फत ऑडीट का केले नाही? डागडुजी करण्यापुर्वी ऑडीट केले असते तर खड्डे पडण्याचे कारण काय हे स्पष्ट झाले असते. सदर काँक्रिट रस्त्याची डागडुजी करण्यापुर्वी सक्षम यंत्रणेकडून डिझाईन केले होते काय? डिझाईन न केल्यास वरचा थर टाकण्याला आधार काय? भविष्यात उखडल्यास याला जबाबदार रस्त्याच्या डिझाईन मध्ये काही त्रुट्या होत्या काय? डिझाईन योग्य असेल तर हा बांधकामाचा दोष नाही का? याची चौकशी का केल्या गेली नाही? भविष्यात लिपापोती केलेल्या रस्त्याची दुरावस्था झाल्यास याला जबाबदार कोण राहील? रस्त्याच्या सदोष बांधकामाची जबाबदारी संबधीत कंत्राटदार व न.प अधिकारी/ इंजिनिअर वर निश्चित कारवाई व्हावी अशी मागणी सिटीझन फोरम ने तक्रारीत केली आहे. सिटीझन फोरम ने आक्षेप विचारात घेऊन चौकशी व्हावी.

# हुक्का पार्लरवर छापा

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १०

नागपुरात अनेक हुक्का पार्लर नियम धाब्यावर बसवून सुरू आहेत. शंकरनगर परिसरात निंबस हुक्का पार्लरवर पोलिसांनी सोमवारी रात्री छापा टाकला. येथे उच्चभ्रू कुटुंबातील तरुणींना हुक्का घेतांना बघून पोलिसही थक्क झाले. पोलिसांकडून या हुक्का पार्लरच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागपूर शहर पोलिसांकडून ऑपरेशन थंडरच्या नावावर मागील काही दिवसांपासून बेकायदेशीर व्यवसयाविरूध्द कारवाई केली जात आहे. सोमवारी रात्री शंकरनगर येथील निंबस लाउंज हुक्का पार्लरवरही पोलिसांनी छापा टाकला. अंमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या या कारवाईत, अंबाझरी पोलिस ठाण्यात हुक्का पार्लर ऑपरेटरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या छाप्यादरम्यान, उच्चभ्रू कुटुंबातील मुलींनाही पोलिसांनी धूम्रपान करताना पकडले.

पोलिसांच्या माहितीनुसार, हा छापा पहाटे तीन वाजता टाकण्यात आला, खरे तर पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की हे पार्लर रात्रभर बेकायदेशीरपणे चालवले जात आहे. उच्चभ्रू कुटुंबातील मुली आणि गुन्हेगारी प्रवृत्ती असलेले तरुण येथे जमतात अशीही टिप होती. पोलिसांनी छापा टाकला यावेळी हुक्का पार्लरचा दरवाजा आतून बंद होता, परंतु आतील दृश्य धक्कादायक होते. संपूर्ण हुक्का पार्लर ग्राहकांनी भरलेले होते.

# जगदंबा पॉलीक्लिनिक येथे रोग निदान शिबिर

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १०

रामटेक शहरातील प्रसिध्द जगदंबा पॉलीक्लिनिक येथे भव्य रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शीला श्याम नाईक यांच्या हस्ते रोग निदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. नचिकेत जोशी, डॉ. प्रकाश गणवीर व डॉ. शिवाजी कातकडे यांनी निशुल्क रोगनिदान करून सेवा दिली.या डॉक्टरांची चमू जगदंबा पॉली क्लीनिक येथे सेवा देण्यास उपलब्ध राहतील. यावेळी १६५ गरजू लोकांनी या संधीचा लाभ घेतला.



डायग्नो प्लस पॅथॉलॉजी च्या सहकार्याने माफक दरात सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या उपलब्ध करून देण्यात आल्या. श्यामटेक हेल्थकेअर च्या वतीने अमोल शेंद्रे व सुखविंदर सिंह यांनी सर्व रुग्णांना मोफत औषधी वाटप केले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशाल नाईक,विवेक नाईक, श्रीकांत नवघरे व रितिक अल्लाडवार यांनी सहकार्य केले.

# अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १०

अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या विरुद्ध कन्हान पोलीसांनी कारवाई करुन ४६५ ग्राम गांज्यासह एकुण ६,६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त माहिती नुसार रविवार (दि.८) जुन रोजी सायंकाळ च्या दरम्यान कन्हान पोलीस परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि शिवनगर कांद्री येथे नंदकिशोर चंदाजी सहानी नावाचा इसम हा त्याचा राहते घरा मध्ये अंमली पदार्थ गांजा त्याचेजवळ बाळगुन गिऱ्हाईकास विक्री करत आहे .

अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता आरोपी नंदकिशोर चंदाजी सहानी , वय २२ वर्षे, रा.शिवनगर, कांद्री हा पोलीसांना पाहुन पळुन गेला. पोलीसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली असता घरात ४६५ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ गांजा किंमत ४,६५० रुपये आणि इलेक्ट्रॉनिक वजन काटा किंमत २,००० रुपए असा ६,६५० रूपयांचा मुद्देमाल मिळुन आला. कन्हान पोलीसांनी आरोपी नंदकिशोर सहानी याचा विरुद्ध एनडी पीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# दृढनिश्चय, विश्वास आणि कठोर परिश्रमामुळे चिरस्थायी यश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

कोणताही व्यवसाय दृढ विश्वास आणि कठोर परिश्रमाने यशस्वी होऊ शकतो, असे शाइनेक्स मोजॅकचे सह-संस्थापक उद्योजक सचिन आणि स्नेहा पळसोकर यांनी चिटणवीस सेंटर येथे विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशन (व्हीएमए) च्या रविवारच्या सत्रात त्यांचा प्रेरणादायी यशोगाथेचे कथन करताना सांगितले.

माय स्टोरी बाय कपल-प्रेन्युअर्स - आह से आहा तक या सत्राचे सूत्रसंचालन सौरभ मोहता यांनी केले. मुलाखतीच्या माध्यमातून मोहता यांनी सचिन आणि स्नेहा यांचा व्यावसायिक प्रवास उलगडत नेला. तांत्रिक पार्श्वभूमी असलेले सचिन आणि स्नेहाचा कल कायम उद्योजकतेकडे होता. परदेशात आकर्षक नोकरीच्या ऑफर असूनही, त्यांनी भारतात राहण्याचा आणि नागपूरच्या बुटीबोरी येथे मोजॅक टाइल्स उत्पादन युनिट सुरू करून त्यांच्या स्वप्नांना आकार देण्याचा निर्णय घेतला. त्यांची कंपनी, शाइनेक्स मोजॅक, आता व्यवसायात २५ यशस्वी वर्षे पूर्ण करत आहे.

सुरुवातीला आयात केलेल्या साहित्याच्या ट्रेडिंग ने व्यवसाय सुरू करणाऱ्या या जोडप्याने नंतर स्वतःच्या मोजॅक टाइल्सच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित केले आणि वैज्ञानिक प्रयोगशाळेचा आधार घेऊन ग्लॉसी मोजॅक चे मार्केटिंग केले. या प्रवासात एका टप्प्यावर डॉलरच्या दरात प्रचंड वाढ झाल्यामुळे प्रकल्प खर्च वाढला, तेव्हा या जोडप्याला अत्यंत कठीण परिस्थितिचा सामना करावा लागला. दिवाळखोरीच्या परिस्थितीतून त्यांना जावे लागले. परंतु एकमेकांवरील विश्वास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर तसेच कुटुंबाच्या पाठिंब्याने त्यांनी पुन्हा उभारी घेतली.



सचिन आणि स्नेहा पळसोकर यांनी व्हीएमए सत्रात विषद केली यशोगाथा

# पंढरपूर आषाढी एकादशी वारी मेळ्यासाठी चार विशेष गाड्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

आषाढी एकादशी (मुख्य दिवस - ६ जुलै २०२५) निमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या वारी मेळ्यादरम्यान यात्रेकरूंची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर आणि मिरज दरम्यान चार विशेष गाड्या (गाडी क्र. 01205/01206) चालविण्यात येणार आहेत. या गाड्या ट्रेन ऑन डिमांड योजनेअंतर्गत @1.3 भाडे दर योजना राबवून चालविण्यात येतील.

गाडी क्र. 01205 (नागपूर - मिरज विशेष) दिनांक 04.07.2025 आणि 05.07.2025 रोजी सकाळी 08:50 वाजता नागपूर स्थानकावरून प्रस्थान करील व दुसऱ्या दिवशी 11:55 वाजता मिरज स्थानकावर आगमन करेल. गाडी क्र. 01206 (मिरज - नागपूर विशेष) दिनांक 06.07.2025 आणि 07.07.2025 रोजी दुपारी 12:25 वाजता मिरज स्थानकावरून प्रस्थान करील व दुसऱ्या दिवशी 12:55 वाजता नागपूर स्थानकावर आगमन करेल. मागार्तील थांबेः अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा,मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुडूवाडी, पंढरपूर, सांगोला,म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठे महांकाळ, सलगर, अरग आणि मिरज. कोच संरचनाः 10 शयनयान डबे, 4 सामान्य श्रेणी डबे, 2 वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे व 2 गार्ड-कम-लगेज डबे , एकूण 18 डबे. यात्रेकरूंनी प्रवासाची योग्य वेळी आखणी करून या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा.



**नागपूर :** वटपौर्णिमेचा सण आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी महिला जन्मोजन्मी हाच पती लाभावा म्हणून आराधना करीत वडाच्या झाडाला दोरा गुंडाळतात. नागपूर शहरातही वटपौर्णिमेचा सणानिमित्त महिलांची अशी गर्दी उसळली होती.